

सारविस्तार

भाग : दोन

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

सारविस्तार

भाग : दोन

(चिंतनक्षण : वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* शब्दांकन *

श्री. प्रकाश जोशी

* सारविस्तार - भाग : दोन

पुस्तकरूपाने प्रकाशित पहिली आवृत्ती : एप्रिल २०१४

डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

प्रास्ताविक

श्रींच्या कृपेनं लाभलेल्या जगण्याच्या, अनुभवांच्या, त्यांवरच्या चिंतनांच्या शक्तीचा मी सदैव ऋणी आहे. त्यामुळं लाभलेले अनुभव आणि अभ्यास - हे अत्यंत संक्षेपानं सूत्ररूपानं वचनबद्ध झाले. त्यांतल्या तीनशेपासष्ट वचनांचे एकूण बारा भाग २००६ सालापासून 'चिंतनक्षण' या शीर्षकानं यथावकाश प्रसिद्ध झाले.

घरच्या कौटुंबिक उपासनेत मासिक ज्ञानेश्वरीबरोबर, शनिवार संध्याकाळचं साप्ताहिक निरूपण हा अनेक उपक्रमांतला वर्षानुवर्षं चाललेला एक भाग आहे. त्यासाठी त्यात्या वेळी श्रींच्या आज्ञेनुसार सद्गुरुलीलामृत, ईशावास्य, विष्णुसहस्रनाम इथंपासून अलीकडच्या समर्थसंकीर्तन, निरंजनसंकीर्तन, निवृत्तिनाथसंकीर्तन-अशी अनेक निरूपणं झाली. त्यातच एकदा याच चिंतनवचनांचं निरूपण घ्यायला श्रींनी सांगितलं. ते सांगण्यात, त्यावेळच्या श्रोत्यांना काही लाभ होण्याबरोबरच, स्वतः ज्या चिंतनाचं सार सूत्ररूपानं काढलं होतं, त्याचं माझंच पुन्हा एकदा चिंतन आणि विवरण घडावं, अशी श्रींची इच्छा लक्षात आली. त्यानुसार मध्यंतरी दोन वर्षं पहिल्या साठ वचनांची निरूपणं त्यांच्या कृपेनं झाली. त्या वचनसारांचा पुन्हा एकदा विस्तार झाला. म्हणून हा 'सारविस्तार' आहे. पूर्वी फार थोर ऋषींच्या आणि भगवद्भक्तांच्या वाट्याला आलेलं हे आपल्याच सूत्रांचं विवरण करण्याचं भाग्यच नव्हे तर, त्या विवरणाच्या शब्दांकनाचं संस्करण करण्याचं भाग्यही श्रींच्या कृपेमुळं मला मिळालं, याबद्दल मी कृतज्ञ आहे. अनेकदा वेळेअभावी आणि विवरणाच्या ओघामध्ये विस्तारात राहिलेल्या त्रुटी या संस्करणात दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. याचे पुढचे भाग श्रींच्या इच्छेनुसार यथाकाल प्रसिद्ध होतील.

ज्या परगावच्या साधकांना या शनिवार-निरूपणांना येता येणं व्यवहारानं अवघड आहे पण, ज्यांची ते श्रवण करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा साधकांपैकी एक ज्येष्ठ साधक श्री.प्रकाश जोशी यांनी या निरूपणांचं ध्वनिमुद्रण तर नंतर सातत्यानं ऐकलंच पण एक स्वयंअभ्यास आणि साधना म्हणून ते शब्दबद्ध करून स्वयंस्फूर्तीनं आणूनही दिलं. या सगळ्या कामाच्या निमित्तानं आपण स्वतः दूर असूनही साधनेत राहायला किती मदत झाली, याचं प्रांजळ निवेदनपत्रही त्यासोबत त्यांनी दिलं.

साधनेसाठी त्यांना झालेली ही मदत पाहाता, या शब्दांकनावर संस्कार करून, हे सर्वच जिज्ञासूंसाठी पुस्तकरूपानं देण्याचा निर्णय झाला. या निष्ठेच्या कामाबद्दल मी श्री.जोशीसाहेब यांचा कृतज्ञ आहे. पण, या प्रयत्नांचा ज्यांना साधनेला पुढं उपयोग घडेल, ते भावी वाचकही श्री.जोशी यांच्या या सेवेबद्दल ऋणी राहातील, असा मला विश्वास वाटतो. त्यांची ही सेवा श्रींनी रुजू करून घ्यावी आणि त्यांना विपुल नामप्रसाद द्यावा, अशी मी संतचरणी प्रार्थना करतो.

अशा तऱ्हेनं संतांच्या कृपेनं आणि साधकांच्या साहाय्यानं घडणारी ही विवरणसेवा वाचकांच्या चरणी शुभेच्छापूर्वक अर्पण करतो...

- सुहास पेठे

सारविस्तार : भाग २

अनुक्रम

निरूपण

क्र. १० - वचन क्र. ९ : वैज्ञानिक दृष्टिकोनाने परमेश्वर जास्तीच सिद्ध झाला आहे. .. ५

क्र. ११ - वचन क्र. १० : कामनेचा भक्त असणं गैर नाही, पुढं भगवंताचा भक्त न होणं गैर आहे. ..१८

क्र. १२ - वचन क्र. ११ : (निरूपण - पूर्वार्ध) नामाच्या चिंतनाची सहा अंगे - अर्थ, शक्ती, स्थान, संबंध, प्रयोग, अनुभव ..३५

क्र. १३ - वचन क्र. ११ : (निरूपण - उत्तरार्ध) नामाच्या चिंतनाची सहा अंगे - अर्थ, शक्ती, स्थान, संबंध, प्रयोग, अनुभव ..४५

क्र. १४ - वचन क्र. १२ : (निरूपण - पूर्वार्ध) परमार्थाचे नुकसान जेवढे मनाने केले तेवढे शरीराने कधीच केले नाही. ..६४

क्र. १५ - वचन क्र. १२ : (निरूपण - उत्तरार्ध) परमार्थाचे नुकसान जेवढे मनाने केले तेवढे शरीराने कधीच केले नाही. ..७८

क्र. १६ - वचन क्र. १३ : शब्दशक्तीचा यथायोग्य वापर म्हणजे मौन. ..९५

*

चिंतनक्षण

वचन क्र. ९ * निरूपण : क्र. १०

वैज्ञानिक दृष्टिकोनाने परमेश्वर जास्तीच सिद्ध झाला आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोनानं परमेश्वर जास्तीच सिद्ध झाला आहे. हे वचन असल्यामुळं खूप शब्दांचा संकोच करून, कितीतरी अर्थांच्या दिशा आणून ते मांडावं लागतं. त्यामुळं अशा वचनातले शब्द अनेकदा अभिप्रेत अर्थ देऊ शकत नाहीत. वर वर पाहता असं वाटतं की, वैज्ञानिक दृष्टिकोनानं परमेश्वर जास्तीच सिद्ध झाला आहे, याचा अर्थ असा होतो की, हा दृष्टिकोन येण्यापूर्वी परमेश्वर जरा कमी सिद्ध होता. सूर्य उगवला तेव्हाही सूर्यच होता, माथ्यावर होता तेव्हाही होता व मावळला तेव्हाही होता. मावळल्यानं त्याचं अस्तित्व संपलं नाही आणि उगवल्यामुळं नवीन निर्माण झालं नाही. असं ज्या शक्तीबद्दल आहे, तिला परमेश्वर असं म्हणू.

एखाद्या आजारी माणसाच्या अंधाऱ्या खोलीत प्रकाशाचा किरणसुद्धा येत नाही. त्याच्या दृष्टीनं सूर्य उगवला काय किंवा मावळला काय, असं असतं. कदाचित त्याच्या दृष्टीनं, त्याच्या अनुभवाप्रमाणं सूर्य नाही - उगवणं नाही, मावळणंही नाही. म्हणजेच सूर्य नाही, असं म्हटलं तर कसं होईल ? तो पण अर्थ या वचनामध्ये आहे. मला कळत नाही, याचा अर्थ परमेश्वर नाही, असं समजता येत नाही. हे जसं आहे, तसंच सूर्य उगवण्यानं, मावळण्यानं, नसण्यानं, पुन्हा असण्यानं - कमी जास्त होत नाही किंवा तो असणं - नसणं सिद्ध होत नाही. आता परमेश्वर जास्तीच सिद्ध झाला आहे, असं म्हणण्यामध्ये - काय अभिप्राय असावा, तेवढा थोडासा अधिक समजावून घेतला, तर योग्य होईल.

सध्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आग्रह धरण्याचा कालखंड आहे आणि ती चांगली गोष्ट आहे. विज्ञानाची एखाद्या गोष्टीकडे पाहण्याची जी पद्धत आहे, ती आपल्याला खरंच गरजेची आहे, यात शंकाच नाही. त्यामुळं परमेश्वर सिद्ध झाला आहे, हे म्हणण्यापेक्षा परमेश्वराबरोबर अकारण जोडल्या गेलेल्या गोष्टी निघून गेल्या. एखाद्या खूप पुटं चढलेल्या मूर्तीवरची पुटं काढून टाकल्यावर मूळ मूर्ती दिसायला लागते. त्या अर्थानं परमेश्वर दिसायला लागला आहे, असं इथं अभिप्रेत आहे.

आज विज्ञानाची संशोधनं शेवटी जिथं येऊन थांबतात, त्याची उत्तरं देता येत नाहीत, असे प्रश्न आता निर्माण झालेत. आत्तापर्यंत जे- जे प्रश्न निर्माण झाले आहेत, त्या-त्या प्रश्नांची उत्तरं देता आली आणि अजूनही देता येतील. पण असे काही प्रश्न निर्माण झाले आहेत की, जे विरोधाभासात्मक आहेत. तिथं परमेश्वराचं अस्तित्व, या अर्थानं सिद्ध व्हायचं आहे आणि ते अस्तित्व आपण सिद्ध करण्यावर अवलंबूनच नाही. सूर्याचं अस्तित्व मी बाहेर जाऊन बघण्यावर किंवा माझ्या घरात प्रकाश येण्यावर अवलंबून नाही. तसंच माझ्या घरी अंधार असल्यानं किंवा रात्रीची वेळ असण्यावरही ते अवलंबून नाही. मला सूर्याचं अस्तित्व केव्हा जाणवतं, हा प्रश्न आहे. मी बाहेर गेल्यावर उगवलेला दिसतो, तेव्हा जाणवतं. ते मला रात्रीच्या वेळेला जाणवत नाही, याचा अर्थ सूर्य नाही, असं मी छातीठोकपणे सांगू शकत नाही. रात्रीच्या वेळी म्हटलं, त्याला रात्र आणि मी जबाबदार आहे, सूर्य जबाबदार नाही. परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल घोटाळा असाच होतो. तो घोटाळा दूर करणं वैज्ञानिक दृष्टिकोनाबाहेरचं काम आहे. अर्थात हे ओळखता आलं पाहिजे, कारण वैज्ञानिक दृष्टिकोन जसा येतो तशा त्याच्या प्रभावामुळं बेसावध राहिलं तर, वैज्ञानिक दृष्टिकोनानंच प्रत्येक गोष्ट सिद्ध झाली पाहिजे, असा एक वैज्ञानिक भाबडेपणा,आग्रह-अशा वैज्ञानिक अंधश्रद्धासुद्धा जन्माला

येतात आणि अशा काही काही गोष्टी त्या प्रकारच्या अंधश्रद्धेमध्ये मोडतात.

विज्ञान ही एक अतिव्यापक अशी ज्ञानाची शाखा मानली जाते. विज्ञान म्हणजे शास्त्र. त्या अर्थानं एक शास्त्र म्हणून आपण त्याला विज्ञान शब्द जास्त वापरतो. आपल्याकडं विज्ञान शब्द फार पूर्वीपासून वापरला गेला आहे की, जे जड जगत आहे, त्याच्या मुळाशी जाऊन कार्यकारण संबंध शोधून, त्यातल्या त्यात जे सूक्ष्म आहे, पण दृश्य आहे - तिथपर्यंत जायचे सर्व प्रयत्न म्हणजे विज्ञान होय. सातशे वर्षांपूर्वी श्री ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितलं, 'येर प्रपंचु हे विज्ञान'. तेव्हा, त्याच्यामागं लागणं किंवा त्याची कास धरून विचार करणं म्हणजे विज्ञान होय. विज्ञानाच्या सिद्ध करण्याच्या पद्धती चांगल्या आहेत. विज्ञानामध्ये जास्तीत जास्त संशोधन आणि विचार झाला आहे. त्यामध्ये ज्या वास्तव गोष्टी आहेत, जी वस्तुस्थिती आहे, ज्या आजूबाजूला निरीक्षण करून पाहता येतात, नंतर त्यांचं वर्गीकरण करणं, त्यांच्यामधले परस्पर संबंध शोधणं, त्यांचे काही नियम शोधून काढणं, परिणाम शोधून काढणं, ते सूत्रबद्ध करणं, त्याचं व्हेरिफिकेशन-खातरजमा करणं, ते सार्वत्रिक असणं- असं समाविष्ट आहे.

त्याचे टप्पे बघायचे झाले तर, निरीक्षण, मापन, वर्गीकरण, तर्कशुद्ध रितीनं त्याचा अभ्यास, मग प्रयोग, मग काही हायपोथेसिस-परिकल्पना मांडणं, गणित - तर्कबुद्धी यांचा योग्य वापर करणं आणि मग त्यातून नियम आणि सिद्धांत निर्माण करणं - हे विज्ञानाचं स्वरूप आहे. जी संशोधनं आतापर्यंत झालीत आणि आज चालली आहेत, त्यामध्ये असं आढळतं.

वरुणाचा शोध कसा लागला, हे आपल्याला माहीतच आहे. प्रजापतीच्या ग्रहाच्या गुरुत्वाकर्षणाचे आणि गतीचे जे नियम आहेत, त्या नियमांचा अंमल या ग्रहावर चालत नाही, असं लक्षात आलं. आतापर्यंत गुरुत्वाकर्षणाचे आणि गतीचे जे नियम होते, त्याप्रमाणं सगळे ग्रह चालतात,

असं समजलं जायचं. पण या वरुणावर दुसरं कुठलं तरी आकर्षण आणि गतीचा परिणाम होत असला पाहिजे. म्हणून हा या नेहमीच्या गतीच्या बाहेर जातो. ते जेव्हा शोधायला गेले, तेव्हा वरुणाचा शोध लागला.

अवकाशातल्या सगळ्या वस्तू म्हणजे पृथ्वी, ग्रह, सूर्य जे आपल्यासमोर दिसतं, जे आजूबाजूला पसरलं आहे, त्या सर्वाला आपल्याकडं जड ही संज्ञा आहे. तर विज्ञानाच्या पद्धतीनं जिथं कुठं आपल्याला शंका वाटते त्या-त्या ठिकाणी त्या जड वस्तूंचा अभ्यास करायचा. त्यांतला कार्यकारण भाव शोधायचा आणि त्या कार्यकारण भावाच्या साहाय्यानं त्या जड वस्तूंवर किंवा निसर्गावर नियंत्रण मिळवता येतं का, हा माणसाचा प्रयत्न चाललेला आहे. आणि त्या नियंत्रणातून नवीन काही वस्तू, साधनं निर्माण करता येतील का, की, जी या नियंत्रणाच्या नियमाप्रमाणं चालतील. आज आपल्या घरामध्ये, आजूबाजूला जी सगळी मशिनरी पसरली आहे, ती त्या वैज्ञानिक संशोधनाची कृपा आहे. उदाहरणार्थ, इथल्या ध्वनिवर्धकाची बटणं कमी-जास्त करून हा आवाज मोठा किंवा कमी करता येतो. ध्वनिवर्धक त्याच्या नियमाप्रमाणं काम करतो. माणसाचा आवाज मात्र कमी-जास्त नाही करता येत.

तोच फरक आपल्याला लक्षात घ्यायचा आहे. अशा तऱ्हेनं जे नियम शोधून काढले, त्या नियमांचा वापर करून त्यातून सुखाची जी साधनं निर्माण केली आणि त्या साधनांच्या सहाय्यानं आपलं दैनंदिन जीवन जास्तीत जास्त सुखसोयीचं करण्याचा प्रयत्न केला, त्याला आपण विज्ञान म्हणतो. तेव्हा सुखसोयीचे प्रयत्न ही विज्ञानाची आताची शेवटची अवस्था आहे, पुढची माहीत नाही. विज्ञान प्रगती करण्यासाठी मोकळं आहे, असं आपण समजतो.

विज्ञानानं असंख्य क्षेत्रं व्यापली. विज्ञानाला क्षेत्रांची मर्यादा नाही.

विज्ञानात कार्यकारण भाव गृहीत धरला आहे. पण अशा काही वस्तू समोर यायला लागल्या आहेत की, त्या कार्यकारण भावाच्या पलीकडं काम करत आहेत, असं वाटायला लागलं. आइनस्टाईननं लिहून ठेवलं आहे की, पदार्थाचा सूक्ष्म घटक इलेक्ट्रॉन हा जम्प घेतो आणि ती विचित्र, वेगळ्या पद्धतीनं घेतो. मध्ये काहीतरी काल येतो, त्यानंतर तो जम्प घेतो. तो कसा वागतो, ते कळत नाही. या वेगळ्या पद्धतीनं का वागतो, त्याचं कुठल्या कार्यकारण पद्धतीनं उत्तर देता येत नाही. तो कार्यकारण भावाच्या मर्यादेत काम करत नाही. असे काही नवीन विरोधाभास निर्माण झाले.

आता हे सगळे परमेश्वराकडं बोट करतात, असं मला म्हणायचं आहे. अज्ञाताकडं बोट करतात. विज्ञानामध्ये नेहमीच ज्ञात-अज्ञात हा खेळ चालूच असतो. पण अज्ञेय नावाची तिसरी गोष्ट आहे, ती आपल्या लक्षात आली, जिला आपण परमेश्वर म्हणून मानलं आहे. विज्ञान सगळं कार्यकारण भाव गृहीत धरून उभं आहे. त्या कार्यकारण भावाच्या पलीकडं काहीतरी अजून कुठला तरी भाव या विश्वात असला पाहिजे, असं म्हणण्याची वेळ आली. आणि ती आइनस्टाईनच्या काळातच आलेली आहे.

कार्यकारण भावाचा आपल्या दृष्टिकोनातून विचार करू. कार्यकारण भावसुद्धा निर्माण झाला आहे, असं मानलं आहे. त्या अर्थी त्याचा निर्माता आहे. आता विज्ञानाची कक्षा कार्यकारण भावाबरोबर संपली. त्यातून दोन गोष्टी निर्माण झाल्या. एक, या कार्यकारण भावाचा निर्माता याच्या पलीकडं आहे. दोन, या कार्यकारण भावाच्या पलीकडं जाऊन काही घटक वागतात त्यांचा नियंत्रक हाही या वैज्ञानिक कक्षेच्या बाहेर आहे. या अर्थांनी विज्ञानाच्या प्रगतीमुळं परमेश्वर आणखी एकदा सिद्ध झाला आहे. की, जो हा कार्यकारण भाव निर्माण करतो आणि त्याच्या पलीकडं जाऊन वागणाऱ्या वस्तूंनाही नियंत्रित करतो.

आपण निर्माता कोणाला म्हणतो, जो निर्माण करतो. आता चालवतो कोण, नाश कोण करतो आणि पुन्हा वेगळंच निर्माण कोण करतो. हे जे प्रश्न आहेत, त्यालाच आपल्याकडं 'कर्तुम् अकर्तुम् अन्यथा कर्तुम्'अशी शक्ती मानलेलं आहे. ते परमेश्वराचं एक स्वरूप आहे. तो एखादी गोष्ट निर्माण करू शकतो, नाहीशीपण करू शकतो, तो केलेलं मोडून बदलून नवीन करू शकतो, अशा तीनही शक्ती परमेश्वराच्या मानल्या आहेत.

आता विज्ञानातला तो इलेक्ट्रॉन पहा. तो कार्यकारण भावाप्रमाणं चालत होता. पण तो आणखी सूक्ष्मसूक्ष्म झाल्यावर तो तसा चालेनासा झाला. म्हणजे आता तो कशामुळं चालतो, ते शोधणं हे काम आलं. ते कारण सापडत नाही, अशी परिस्थिती आहे. संशोधन पण अशा शक्तीकडे बोट करतं आहे की, ते कारण विज्ञानाच्या कक्षेत सापडत नाही, कुठल्याही नियमात बसत नाही.

कारण कार्यकारण भाव एकदा ओलांडला की, विज्ञानाची कक्षा थांबली, असं होतं. एकदा कार्यकारण भाव सोडला तर, मग कशावर उभं राहायचं, हा प्रश्न आहे. असं प्रत्येक बाबतीत येऊन थांबलं आहे. कितीतरी विरोधाभास समोर येत आहेत. ते असे - ज्या गोष्टी शक्य आहेत, ज्या अशक्य आहेत, ज्या गोष्टी नियमित आहेत, ज्या गोष्टी अनियमित आहेत, ज्या गोष्टी निश्चित आहेत, ज्या गोष्टी अनिश्चित आहेत - अशा गोष्टी एकत्र सापडत आहेत, सिद्ध होत आहेत. साधं व्यवहारातलं उदाहरण म्हणजे पेशंट का गेला, ते सांगता येत नाही. तो का जगला, हे पण सांगता येत नाही. तज्ज्ञ डॉक्टर्स सांगू शकतील का, की हे असं कसं घडतं ? ते का घडतं, ते कळत नाही. कारण दोन्हीही बाजूंना कार्यकारण भाव दिसतो. म्हणजेच एका अर्थानं ते कार्यकारण भावाच्या पलीकडं आहे. शोधलेल्या औषधांच्या-डायग्नोसिस-प्रेडिक्शन अशा विज्ञानाच्या पलीकडं आहे.पेशंट बरा कसा झाला, ते सांगता

येत नाही. या क्षणी वैद्यकीय नियमांप्रमाणं तो बरा नसायला पाहिजे. किंवा जो पेशंट बरा व्हायला पाहिजे, तो बरा होत नाही. जे निश्चित आहे, ते निश्चित नाही, असं लक्षात येतं. असे विरोधभास एकदम निर्माण होतात आणि त्यांची सुसंगतता-रिकन्सिलिएशन करता येत नाही.

या सगळ्या मार्गांनी विज्ञानाची मर्यादा स्पष्ट होत चालली आहे आणि तीच त्या पलीकडं असलेल्या अज्ञेय परमेश्वराची बाजू अधिक अधिक वेगवेगळ्या अंगांनी सिद्ध करते आहे, त्यावर प्रकाश पाडते आहे. परमेश्वर आपण 'कर्तुम् अकर्तुम्' असाच मानला आहे. कार्यकारण भाव हा विश्वव्यवस्था चालावी, म्हणूनच परमेश्वरानं आपल्याला लावून दिला आहे. आणि परमेश्वर त्याच्याही पलीकडं असल्यानं, कार्यकारण भावाचं बंधन त्याच्यावर नाही.

संतांच्या चरित्रामध्ये किंवा भगवंताच्या वाङ्मयामध्ये ज्या अशा स्वरूपाच्या घटना घडलेल्या दिसतात, त्या एवढंच दाखवतात की, 'तुम्ही' कार्यकारण भावामध्ये मर्यादित आहात, 'भगवंत' नव्हे. परमेश्वर सिद्ध झाला म्हणजे काय, तर या अर्थानं तो कळायला लागला की, या मर्यादेच्या पलीकडं अजून काहीतरी आहे, जे अजून लक्षात येत नाही. आपण ज्ञात, अज्ञात आणि अज्ञेय अशा तीन गोष्टी मानतो. अज्ञेय स्वरूपाचा प्रांत आहे तिथपर्यंत आता विज्ञान जाऊन पोचलं आणि तिथून पुढचं आता कळत नाही, असं झालेलं आहे - म्हणजेच वेगळ्या अर्थानं अज्ञेय सिद्ध झालं आहे. काही महिन्यांपूर्वी विश्वनिर्मिती कशी झाली असावी, यासंबंधी प्रयोग केलेत, ते आपल्याला माहीतच आहे. ते अयशस्वी झालेत. ते शोधलं जावं, अशी इच्छा आहे. तरीसुद्धा आजवरच्या अशा मूलभूत प्रश्नांपर्यंत पोचायचा प्रयत्न केला, तर वाटेतल्या काही गोष्टी सापडतात. पण मूळ मूलभूत गोष्ट सापडत नाही. ती अज्ञेय आहे, एवढं मात्र सिद्ध होतं.

जाता जाता एक गोष्ट जरूर लक्षात ठेवावी की, विज्ञान झालं तरी सारी धडपड माणसाची - अधिकाधिक बुद्धिमान माणसांची आहे. त्यांना मनं आहेत. ती गढूळ-अशुद्ध असू शकतात. या माणसांच्या जगतामध्ये राजकारणं, कुरघोड्या, वर्चस्वांच्या प्रवृत्ती, दिशाभूल करण्याचे प्रयत्न, असंख्य प्रकारचे स्वार्थ - अशा असंख्य गोष्टी आहेत. आपल्या हातात पडणारी 'वैज्ञानिक' माहिती ही, या सगळ्या गोष्टींनी मर्यादित व प्रभावित असू शकते, हे विसरून चालणार नाही, कारण तशाही घटना घडतात, हे आपण जाणतोच.

त्याचबरोबर दुसऱ्या बाजूनं आता विचार करू. विज्ञानानं सुखसोयीची सगळी साधनं निर्माण झाली आहेत. तो आपण अनुभव घेतोच आहोत. पण या सर्व शोधांनी श्रीमहाराज म्हणतात तसं, माणूस सुखी झाला का ? विज्ञानानं माणसाला सुखाची साधनं दिलीत. पण विज्ञान माणूस सुखी करू शकत नाही, ही विज्ञानाची मर्यादा आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनानं ही चूक दाखवून दिली आणि आणखी एक सिद्ध झालं की, कितीही सुखाची साधनं झाली तरी, माणूस समाधानी आणि शांत राहू शकेल, अशी परिस्थिती विज्ञान निर्माण करू शकत नाही.

समाधान, शांती या सगळ्या मूल्यांसाठी माणसाला परमेश्वराचं शास्त्र समजावून घ्यावं लागेल. आपण वैज्ञानिकदृष्ट्या उत्तम अवस्थेत, संपन्न अवस्थेत जगूनसुद्धा शांती आणि समाधान मिळवण्यासाठी वेगळं काहीतरी करावं लागतं ते ज्याच्या बाबतीत करतो, त्यालाच आपण परमेश्वर म्हणतो, आणि ते करण्याला उपासना म्हणतो. संतांच्याकडं खूप पैसे, सर्व सुखसोयींनी युक्त असं मोठं घर - असं काही नसतानाही ते अत्यंत आनंदात होते. साध्या आपल्या घरातही एका माणसाचं दुसऱ्यावर प्रेम आहे, तर ही कोणतीही वैज्ञानिक सुखसोयीची साधनं नसतानाही, तो माणूस त्या प्रेमामुळं आनंदात राहू शकतो.

अलीकडं समाधानापर्यंत जाण्याचं संशोधन चाललंय. माणसाच्या मेंदूमध्ये अशा काही जागा आहेत, त्या ठिकाणी इलेक्ट्रिक करंटनं शॉक देऊन ती उद्दीपित केली की, सुखाची संवेदना निर्माण होते, समाधानाचा आभास होतो. पण जोपर्यंत अशा तऱ्हेचे शॉक दिले जातात, तोपर्यंतच समाधानात असल्यासारखं वाटतं, एवढंच होतं. खरं समाधान होतच नाही. आपल्याकडं गमतीचा भाग म्हणजे, विजेचं लोडशेडिंग असेल तर, असलं इलेक्ट्रिक शॉकवर अवलंबून असलेलं समाधान मिळू शकणार नाही, हे उघडच आहे. असं हे परावलंबी संशोधन आहे. त्यामुळं समाधान शोधण्याची मर्यादा दिसून आली.

असा कुठला करंट नसतानाही, मनुष्य समाधानात राहू शकतो आणि त्याचं शास्त्र हे परमेश्वराच्या उपासनेच्या शास्त्रामध्ये आहे, हे आता अधिक समजून आलं, आणि त्यामुळं योग्य तेच झालं. या सर्व शोधांमुळं मूळ परमेश्वराची मूर्ती दिसायला लागली - जी निर्गुण आहे, सत्स्वरूप आहे, शांततेचा स्रोत आहे, जी आनंदमय आहे. असा हा मूळ परमेश्वर स्वच्छ, स्पष्ट दिसायला लागला ही विज्ञानाचीच कृपा होय.

विज्ञानामध्ये निरीक्षण, प्रयोग अशा अनेक योग्य, उपयुक्त पायऱ्यांचा उपयोग पद्धतशीरपणे केला जातो. परंतु संशोधन करणारा जो कर्ता आहे, संशोधक आहे, त्याची अडचण विज्ञानाला सोडवता आलेली नाही. तो संशोधक शांत, तटस्थ, निरपेक्ष असा पाहिजे. त्याच्या अंतरंगाची जी काही सगळी घटना आहे, तिच्यापर्यंत अजून जाता येत नाही. त्यामुळं होतं काय की, निरीक्षणांमध्ये फरक पडतो, तफावत निर्माण होते आणि त्या तफावती मिटवता येत नाहीत. शेवटी माणसं जशी तडजोडीनं काहीतरी करार करून गोष्टी मिटवतात, तसं असल्या तफावती संशोधनातसुद्धा मिटवतात. वैज्ञानिक हा शेवटी माणूसच आहे ना ! त्यालाही राग, लोभ, स्वार्थ, अपेक्षा,

वरच्या पदाची इच्छा असते.

ते सगळं संशोधन करताना बाजूला हे कसं ठेवायचं, ते अजून कळलेलं नाही. आणि हा प्रश्न सुटण्याची शक्यता पण नाही. कारण त्याचं उत्तर परमेश्वराकडं आहे. हा जो कर्ता, संशोधक, शास्त्रज्ञ - त्याची अवस्था कशी आहे आणि ती कशी बदलता येईल, याचं उत्तर विज्ञानामध्ये नाही. त्यामुळं आणखी एका बाजूनं परमेश्वरावर प्रकाश पडला आणि आणखीन एका बाजूनं परमेश्वर सिद्ध झाला.

विज्ञानामधली एक मोठी अडचण म्हणजे निरीक्षणाची साधनं, ही आहे. ती सगळी इंद्रियाधार आहेत. इंद्रियांच्या ताकदी वाढवून अशा साधनांनी निरीक्षणं केलीत. डोळ्यांची ताकद दुर्बिणीनं वाढवली. त्या मूळ डोळ्यानं इथं जवळ बघू शकतो. त्याऐवजी एक मैल लांब, दहा मैल लांब, अगदी दहा हजार मैल लांब बघून निरीक्षण करता येतं. त्यात भ्रमाचे भाग आहेतच. मला जे दिसतं ते दिसतं. दुसऱ्याला दिसेलच असं नाही. हा दृष्टिदोष निश्चितच नाही. मग अनेक प्रयोग करून बहुमतानं त्याचे निष्कर्ष ठरतात. कानांची ताकद वाढवली. दहा हजार मैलांपेक्षा लांब अमेरिकेत मी फोनवरून बोलू शकतो, अशी क्षमता निर्माण झाली. पण घरातल्या माणसाचा दुःखाचा आवाज ऐकण्याची क्षमता आणण्याची शक्ती मात्र विज्ञानात नाही आणि तो त्याचा प्रांतही नाही, हे आता स्पष्ट झालं आहे.

मानवी जीवनात कित्येक अनुभव आहेत की, त्यांचं स्पष्टीकरण देताच येत नाही. शांती, समाधानाचा अनुभव कुठल्या इंद्रियांनी कळतो ? डोळ्यांनी कळतो की कानांनी कळतो ? कुठलीही लौकिक अनुकूलता नसलेला अपंग मनुष्य आहे. अगदी डोळ्यांनी दिसत नाही, कानांनी ऐकू येत नाही, काही नाही त्याच्याकडं. तरी तो समाधानी आहे, असू शकतो. आता हे कुठल्या इंद्रियांनी आहे ? हे इंद्रियांच्या पलीकडं गेल्याशिवाय सापडणार

नाही. आपले कितीतरी अनुभव आहेत. उदाहरणार्थ, जे आपण सत्य, शिव, सुंदर अशा परमेश्वराच्या कोणत्याही स्वरूपाचे समजा, ते स्वरूप इंद्रियांच्या भाषेत कळत नाही. म्हणून तो परमेश्वर विज्ञानाच्या मार्गानं सिद्ध करण्यात आणि शोधण्यात अर्थ नाही. श्री गणोरे बाबा प्रेम अंतरीचं म्हणत, आपणही म्हणतो, बरोबरही आहे. पण 'अंतरीचं' म्हटलं ते 'अंतर' कुठलं ? ते अंतरंगातूनच येतं, पण ते विज्ञानाच्या कक्षेत नाही. त्याला विज्ञानाकडं मार्ग नाही. परमेश्वराच्या उपासनेत ते आहे, अनुभवाचं आहे, संत-साधक त्याला साक्ष आहेत, हे खरं. तेव्हा, हे विज्ञानाचे सगळे मार्ग सापडले म्हणून कळलं की, समाधान विज्ञानाच्या या इंद्रियांच्या मार्गामध्ये नाही किंवा विज्ञानानं निर्माण केलेल्या कुठल्या साधनातही नाही.

अर्थशास्त्रानं पैसा चलनाच्या रूपानं शोधला. त्याचा ढीग करून समाधान मिळत नाही. माझ्या इंद्रियांच्या मर्यादा वाढवूनही उपयोग नाही. शेजाऱ्याच्या आनंदात सहभागी व्हायला किंवा त्याच्या दुःखाशी समरस व्हायला, कुठलंही इंद्रिय लागत नाही. ते वेगळ्याच पद्धतीनं कळतं. आणि हाच परमेश्वर आहे आपला !

त्या दुःखात तो दिसतो, जो सुखात जाणवतो, जो इंद्रियांच्या, पैशाच्या पलीकडच्या गोष्टी जाणवून देतो, शांती जाणवून देतो. माझ्या चित्ताला शांतता आहे, त्याचं ॲनॅलेसिस-पृथक्करण विज्ञानाला जमलेलं नाही. इंद्रियांच्या अनुभवाच्या-भ्रमाच्या मर्यादा, त्यात पुन्हा त्या संशोधनकर्त्याच्या मर्यादा, इंद्रियांच्या ताकदी वाढवून पुन्हा त्यात न सापडणारे आणि खरे गरजेचे असलेले अनुभव, त्याचं ॲनॅलेसिस विज्ञानाला जमलं नाही.

एखाद वेळेस माझ्याकडं पंचवीस वस्तूंतल्या वीस वस्तू असल्या तरी माझं जीवन चालतं. अनेकांच्याकडं दोनच वस्तू असून त्यांचंही जीवन चालतं. तीन - चार भांड्यांत जगता येतं. श्री गणोरे बाबा तीन धोतरांवर

आनंदानं जगले. त्यांनी त्यांचा प्रत्यक्ष अनुभव सांगितला आहे. गरीबीचा अनुभव अनेकांनी घेतला असेल. माझ्याकडं पन्नास साड्या पण सीतामाईंचं तीन साड्यात जीवन चालतं. म्हणजे आनंदाच्या अनुभवाला या वस्तूंच्या साठ्याची गरज नसून, कुठल्यातरी वेगळ्या अंतःकरणाची गरज असते. आणि ते परमेश्वराच्या उपासनेनंच मिळतं. हे सिद्ध करायला पन्नास साड्या उपयोगी पडल्या.

वेदान्ताचा अभ्यास केला तेव्हा कळलं की, परमेश्वर मिळवायला त्याचा उपयोग झाला नाही. तशी संतांकडं तक्रार केली. त्यावर संत म्हणाले, आज वेदान्ताचा काय उपयोग आहे, हे तुमच्या लक्षात आलं का ? या सगळ्या शास्त्रग्रंथांच्या अभ्यासावरून कळलं की, परमेश्वर किंवा समाधान त्यामुळं मिळत नाही. आता हा त्याचा उपयोग नाही का ? ते जर वाचलं नसतं, तर कदाचित असं वाटलं असतं की, वेदान्त वाचल्यावर समाधान किंवा परमेश्वर मिळतो. आता असं वाटू नये म्हणून, बरं झालं, तुम्ही वेदान्त वाचलात. ही खात्री देणं हाच त्या अभ्यासाचा उपयोग.

तसं विज्ञानानं जास्तीत जास्त प्रगती होते, ते चांगलंच आहे. त्यामुळं परमेश्वर अधिकअधिक स्वच्छ, स्पष्ट आणि खरा दिसायला लागला आहे. ही विज्ञानाची कृपाच आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनानं परमेश्वर जास्तीच सिद्ध झाला आहे, तो इतक्या अर्थांनी होय.

वस्तुतः, परमेश्वर ही सिद्ध करण्यावर अवलंबूनच नसलेली सद्वस्तू आहे. परमेश्वर सिद्ध झाला म्हणजे इथल्यापुरता तरी तो जसा आहे, तसा कळायला लागला, दिसायला लागला, शुद्धही झाला, जसा खरा आहे तसा अधिक कळत चालला. त्याच्या बाजूला असलेली पुटं गळून पडली, अंधश्रद्धा गळून पडल्या, कर्मकांडं गळून पडली, अज्ञानं दूर झाली, अशुद्धता निघून गेली, तो जाणीवरूप आहे, हे कळलं आणि मी हे विज्ञानाचे उपकार समजतो.

विश्वनाथ महाराज नाही का म्हणाले,

ज्याचे शुद्ध अंत:करण । नित्य होई तीर्थस्नान ।।१।।
सत्कर्म नित्य जो करी । तीच त्याची व्रत वारी ।।२।।
दृढ भाव देवावरी । देवच येई त्याचे घरी ।।३।।
विश्वनाथ ऐसा धन्य । उद्धरिला सुखी पूर्ण ।।४।।

हा शुद्ध स्वरूपातला परमेश्वर आपल्या पिढीला आता वैज्ञानिक पद्धतीनं अधिक शुद्ध करून, सिद्ध करून सापडला आहे. आता तो कसा धरून ठेवायचा, त्याची खरी उपासना कशी करायची, त्याचा आपल्या जीवनात शांती, समाधान मिळवायला कसा लाभ करून घ्यायचा, हे आपलं काम आहे !

।। श्रीराम ।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. ०४/१०/२००८ च्या निरूपणावर आधारित)

(निरूपण क्र. ११ च्या सुरुवातीला घेतलेला अभंग संदर्भासाठी खाली दिला आहे.)

अवघी इच्छा ही अनिवार । फिरवी दारोदार ।।धृ।।
रोज उगवता सवेच येई । मावळले तरि सोबत राही । धरिते स्वप्नांचा आकार ।।१।।
ती जन्माचे कारण होई । तळमळ जीवा सदैव देई । व्यापुनि अंतरंग व्यवहार ।।२।।
सात्त्विक राजस असो कशीही । तृप्तीलाही पुरुन उरे ही । वाटे माया ही साकार ।।३।।
इच्छा अपुले मरण क्षणोक्षण । दीना धरि रे तू सावधपण । तरणे इच्छेचा व्यापार ।।४।।
स्वार्थी इच्छा नको ठेवणे । गुरुइच्छेने अथवा जगणे । नेइल निरिच्छता भवपार ।।५।।

*

चिंतनक्षण

वचन क्र. १० * निरूपण : क्र. ११

कामनेचा भक्त असणं गैर नाही, पुढं
भगवंताचा भक्त न होणं गैर आहे.

इच्छा म्हणजे कामना. अमुक एक गोष्ट व्हावी अशी इच्छा असणं, तिच्याशी संबंध असणं, मनात सारखे त्याविषयी विचार असणं, त्याविषयी जोडलेलं असणं, ते मिळवण्यासाठी प्रयत्न करणं - म्हणजे त्या इच्छेचा भक्त असणं होय. भक्त असणं म्हणजे जोडलं जाणं. 'भजनम् भक्तिः' असं म्हटलं आहे. सर्वसामान्य मनुष्य खऱ्या अर्थानं इच्छेचा भक्त असतो. तो भगवंताचा भक्त असतो, असं एकदम समजायचं कारण नाही. भगवंताला जाणणारे किंवा त्याचा विचार करणारे जे आहेत, त्यांनीसुद्धा विचार करण्याची गरज आहे की, मनुष्य खरा कुणाचा भक्त असतो ? मनुष्याच्या सगळ्या कृती या, जी मूळ इच्छा आहे तिला, म्हणजे इच्छेला अनुसरून होतात. तर या दृष्टीनं भक्त असणं गैर नाही.

आपण सुरुवातीला इच्छेचा अभंग, 'अवघी इच्छा ही अनिवार' म्हटला. त्या अभंगातून इच्छेचा अर्थ स्पष्ट झाला. इच्छेनं काय होतं, हे या अभंगात सांगितलं आहे. पण इच्छेनं 'तरणे इच्छेचा व्यापार' हे पण सांगितलं आहे. इच्छेचा व्यापार तर अव्याहत चालूच राहील. मनुष्य उठला की, त्याला पाणी हवं असतं, चहा, कॉफी, दूध काहीतरी हवं असतं. म्हणजे त्याच्या मागण्या सुरू झाल्यात. असं कुणी म्हणतही नाही की, हे नको आहे म्हणून. मनुष्य म्हटल्यावर हा इच्छेचा व्यापार सारखा चालू आहे. इच्छेचा व्यवहार, त्याची उलाढाल सारखी सुरू आहे. बरोबरच आहे, त्याला काही

पर्याय नाही. पण हा इच्छेचा व्यापार तरता येईल का, हा प्रश्न आहे. कारण याच व्यापारात एक दिवशी बुडायचं, अशी परिस्थिती आहे. तेव्हा त्यात बुडू नये, यासाठी काय करता येईल ?

कामनेचा भक्त असणं म्हणजे इच्छेचा भक्त असणं, इच्छेला जोडलेलं असणं होय. प्रत्येक मनुष्य हा संबंध जोडूनच, संबंध घेऊनच आलेला आहे. आईच्या पोटातून जन्माला आला तो संबंध जोडूनच आला ना ? तो संबंध सोडला की, दुसरा संबंध लागू झाला, मग तो आईला प्रत्यक्ष ओळखतो, असा आईचा संबंध सुरू झाला. असेच त्याचे संबंध नाही का सुरू होत ? म्हणजे इच्छा नाही का सुरू होत ? त्याच्या गरजांप्रमाणं तो त्याच्या इच्छा सांगतो, म्हणून तो आईकडं रडतो. जरा मोठा झाला की, बाबांकडं रडतो. बाबा उपलब्ध नसतील आणि मोठा भाऊ असेल तर, भावाकडं रडतो, ताई असेल तर ताईकडं रडतो. कशासाठी रडतो हा प्रश्न आहे.

तेव्हा इच्छांचं स्वरूप काय आहे ? खरं सांगायचं तर, आपल्या ज्या इच्छा आहेत, त्यांचं स्वरूप ज्याला कळलेलं आहे, त्याला जीवनातल्या फार मोठ्या गोष्टी कळल्यात. इच्छेचं स्वरूपच आपल्याला कळत नाही आणि त्यामुळं आपण इच्छा करतो आहोत, याचं भानसुद्धा राहत नाही. लहान मुलाला भूक किंवा तहान लागली म्हणजे ते रडतं. त्याला दूध किंवा पाणी हवं असतं. त्याला पाहिजे - म्हणजे त्याची इच्छा आहे, ती पुरी व्हायला हवी. कितीही आकांत करणारं मूल असलं तरी दूध, पाणी दिल्यावर ते डोळे मिटतं आणि शांतपणे परत झोपी जातं. पुन्हा एका तासाभरानं डोळे उघडले की, रडायला सुरुवात होते. लहान मुलाचं असं होतं, हे कबूल आहे पण मोठेपणी सगळीकडं असंच मनुष्याच्या इच्छेचं काम चालू असतं, हे आपल्या कधी लक्षात येतं का ? थोड्याफार प्रमाणावर विचार केला तर

याच्यापेक्षा काय फरक असतो ? मूल दूध पाण्यासाठी रडतं, मोठेपणी नंबर मिळावा म्हणून रडतं किंवा मार्क पडावे म्हणून रडतं !

श्रीमहाराजांकडं येणारी अनेक माणसं आहेत. उदाहरणार्थ, एक दहावी बारावीचा मुलगा श्रीमहाराजांकडं आला, असं समजू या. मग तो काय मागणार श्रीमहाराजांना ? की, महाराज माझं काही केलं तरी चालेल, मला नापास केलं तरी चालेल, पण मला नामाचं प्रेम लागू दे, असं का तो मागणार आहे ? तो येणार, तो कुठल्या इंजिनिअरिंग किंवा मेडिकल साईडला जायचं आहे, तर त्यासाठी एवढे एवढे मार्कस् पडू देत, असं मागणार. आता या इंजिनिअरिंग किंवा मेडिकलला ॲडमिशन मिळवण्यासाठी, त्याची आधीच वर्ष-दोन वर्षं पूर्वतयारी करून घेतात. त्याच्यासाठी वेगळे क्लास असतात, याची आपल्याला कल्पना असेलच. त्यातसुद्धा जे प्रसिद्ध, यशस्वी क्लास आहेत, तिथं ॲडमिशन मिळवणं हेसुद्धा कठीण काम असतं. तर त्या क्लासला ॲडमिशन मिळू देत, असं तो श्रीमहाराजांना मागायला येणार. पूर्वी दहावीनंतर अकरावीची तयारी, असं असायचं. आता तसं नाही. व्हेकेशन बॅचेस तर असतातच. पण दहावीची तयारी नववीला, त्या आधी आठवीलाच करून घेतात. असं इच्छा मागं मागं मागं घेत, त्या मुलावर ताण आणलेला असतो. नववीची वार्षिक परीक्षा व्हायची आहे. पण त्याच्या आधीच दहावीचा ताण त्याला दिला आहे. असे किती इच्छांचे ताण माणसावर दिले जातात ? असं करत, श्रीमहाराजांकडं किंवा त्याचे जे गुरू असतील, देव असेल तर त्यांच्याकडं तो मुलगा काय मागेल तर, पूर्व तयारीच्या क्लासला ॲडमिशन मिळू देत. मग वर्ष- दोन वर्षं तशी पूर्वतयारी झाली की, प्रत्यक्ष ॲडमिशन मिळू देत, अशी श्रीमहाराजांना विनवणी करणार. मग श्रीमहाराज त्याची ती इच्छा पुरी करणार.

आता ॲडमिशन मिळाल्यावर ते कॉलेज सुरू झालं. तिथलं सगळं

वेगळं, चांगलं वाटणारं वातावरण असतं. पण शिक्षणाचं माध्यम बदलतं, तिथली शिक्षणाची पद्धत बदललेली असते. दुसऱ्या गावी जिथं ॲडमिशन मिळाली तिथं राहावं लागतं, तर अन्नपाण्यात बदल होतो. त्यात नवीन म्हणून तो कॉलेजला ज्युनियर असणार. म्हणून सीनिअर विद्यार्थ्यांकडून चांगली वागणूक मिळू देत, ही इच्छा त्याची असते. महाराज, जरा हे व्यवस्थित सेट होऊ देत. श्रीमहाराज त्याचं सगळं व्यवस्थित लावून देतात. कॉलेजची दोन वर्षं झाली की, पुढं नोकरीसाठी कॅम्पस्ची त्याची तयारी सुरू होते. अजून त्याची पाच वर्षं पूर्ण व्हायची आहेत. पण त्याच्या आधीच ही तयारी, त्याचे ताण सुरू झालेत.

महाराज, ते पुढं कॅम्पस्चं आहे. बरं बाळ, करूयात. मग कॅम्पस्च्या तयाऱ्या करण्यात वर्षभरातल्या अभ्यासाचे पेपर्स थोडेफार शिल्लक राहतात. महाराज, माझ्या कॅम्पस्चं झालं, पण लास्ट इयरचे पेपर्स थोडे आहेत अजून. श्रीमहाराज ते पण पूर्ण करून घेतात. अशा तऱ्हेनं जर पदवी मिळून आता ती कोणती कंपनी मिळणार, त्याची काळजी सुरू होते. त्या कंपनीत नोकरी मिळाल्यावर नवख्या ठिकाणी, तिथल्या नवीन वातावरणाशी जमवून घेता यावं, म्हणून सुटीच्या दिवशी चक्कर टाकून, पुन्हा महाराजांकडं इच्छा व्यक्त करण्यासाठी. ते माझं सगळं व्यवस्थित जमू देत, असं मागणं होतंच. असं सगळं वेगवेगळ्या कारणांसाठी, विषयांसाठी इच्छा आणि मागणं सगळीकडं चाललेलं असतं. वेगळं कुणी फारसं काही करत नाही.

मग त्याच्यापुढं ओघानंच आलं की, त्या मुलाच्या आधीच त्याचे आईवडील श्रीमहाराजांकडं जायला सुरुवात करतात. महाराज, इथपर्यंत तुम्ही सांभाळलंत. पण इथून पुढचं सगळं क्रिटिकल आहे महाराज. तर त्याला सद्बुद्धी द्या, काय तो करणार ते त्याला करू देत, आम्हाला काय करायचं ते करायला मिळू देत, पण जे काही होणार - ते चांगलं होऊ देत,

महाराज !

आजकाल मुलं आपला निर्णय शेवटच्या क्षणी आईवडिलांना सांगतात. त्यामुळं त्यांना अस्वस्थता की, हा मुलगा काय सांगतो कुणास ठाऊक. ती काळजी सारखी सुरूच असते, त्यासंबंधी इच्छा सुरूच आहेत सारख्या. त्यानंतर मुलाचं लग्न होतं, पण राहण्याचा प्रश्न असतो. घराचं भाडं, ब्रोकर्स, शेजारी - हे सारं सुखरूप पार पडण्यासाठी परत श्रीमहाराजांकडं खेपा की, त्याचा फ्लॅट होऊ देत, त्या दोघांचं व्यवस्थित होऊ देत. आता हे संपल्यानंतर तरी आता महाराज नाम घेतो, असं खरंतर व्हायला पाहिजे.

पण अजून पुढं आहे ना ! असं कसं ? महाराज वर्ष, दोन वर्षं झाली, बाकीचं सगळं मार्गी लागलं. आता एकदा नातवाचं तोंड बघू देत की, आम्ही डोळे मिटायला मोकळे झालो. असं नुसतं म्हणतात हं फक्त ! आणि त्या नातवंडाची आधीपासूनच केवढी काळजी असते माणसाला. त्याची सगळी तयारी. परत त्या नातवंडाला सांभाळायचं म्हणून मुलाकडं वेळी गावी-परदेशी जाऊन रहावं लागतं. मग आईवडिलांची इच्छा सुरू होते. महाराज, आम्ही आमच्या घरी परत केव्हा जाणार, आम्हाला यातून लवकर मोकळं करा, असं हे सारखं सुरू असतं. पण इच्छेचा हा व्यापार कधी थांबणार नाही, कामनांना अंत नाही, हे काही लक्षात येत नाही ! याच्यात कुठं थांबावं, याच्यात कुठं स्टॉप घ्यावा, असं या इच्छेच्या भ्रामक व्यापारामुळं वाटत नाही. आपण सगळी प्रपंचातली मंडळी आहात. तर आपल्याला प्रपंचाचं वर्णन काय सांगावं !

मग ते नातवंडं जरा कुठं मोठं झालं की, जसं दहावीची तयारी आठवी, नववीला, तसं लहान मुलांच्या बाबतीत पण आता नवीन शाळा निघाल्या आहेत, आपल्या पहिलीच्याही शाळेच्या, खालच्या शाळेच्या, खालची शाळा अशी आता अवस्था आहे ! त्यासाठी भरमसाठ डोनेशन्स

चाळीस हजार, पन्नास हजार रुपये लागतात. ते देऊनही ॲडमिशन मिळेल याची खात्री नाही. मग वरच्या पदावरचे ओळखीचे लोक, शिक्षणसंस्थेवरचे लोक - असे नवीन संबंध निर्माण करावे लागतात. एकदम चांगल्या शाळेत प्रवेश मिळू देत महाराज ! आणि त्या बाळाचं वय किती ? तर दीड वर्ष ! त्या मुलाला काही त्यातलं कळत नाही, पण त्याला खेळवता खेळवता यांचे खेटे, त्यासाठी अर्ज, असं सगळं करून त्या मुलाची त्या शाळेत ॲडमिशन घेणार. आता तो तिथून पुढं जायचा, तो पुढं बोर्डात आला पाहिजे. आतापासून त्याची पुढची सर्व व्यवस्था, बापरे ! मी एकवेळ मुलाचं सगळं केलं, पण या नातवंडासाठी माझे हात पाय आता फिरत नाहीत, तरी महाराज त्याला काय ते मिळवून द्या ! ही आता त्याच्या पुढची इच्छा. त्या नातवंडाच्या वेळेस बहुतेक आणखी ताण देण्याच्या स्टेप्स् वाढलेल्या असतील. त्याला बहुधा पाचवी, सहावीलाच दहावीची तयारी करावी लागणार. ते पुन्हा क्लासच्या क्लासचे क्लास वर्गेरे वर्गेरे, असं सगळं वाढलेलंच असणार.

असं हे सगळं दरवेळेला श्रीमहाराजांकडं मागणं सुरू आहे आणि दरवेळेला श्रीमहाराज, 'बरं बाळ, करूया, आता पुढच्या वेळेस येशील तेव्हा नाम घे हं मात्र !' इतकं असून आपण म्हणतो, कामनेचा भक्त असणं गैर नाही !

यात काय गैर आहे आणि काय गैर नाही, ते आपणच ठरवा. यात पुन्हा वाईट असं की, त्या आजीआजोबांना एक मोठी चिंता असते की, आपल्या मुलाला किंवा मुलीला, त्यांच्या नातवंडांना बरोबर वळण लावता येईल की नाही, ते त्या नातवंडाचा अभ्यास बरोबर घेतील की नाही आणि त्या चिंतेपोटीसुद्धा परत एकदा आपण आपल्या गुरूच्या ठिकाणी जाऊन महाराज, तेवढी मुलाला किंवा मुलीला व्यवस्थित बुद्धी होऊ देत, कारण मी काही रोज त्यांच्याकडं राहून नातवंडांकडं लक्ष देऊ शकत नाही !

खरं तर, मुलं मनामध्ये म्हणत असतात की, बरंच झालं हे रोज येत नाहीत ते ! पण श्रीमहाराजांना सांगताना या आजीआजोबांना मात्र तसं वाटतं. कामनेचा भक्त असणं, म्हणजे काय असतं हे सांगण्यासाठी एवढं सविस्तरपणे सांगितलं आहे. श्री समर्थांसारख्यांनी प्रपंचाची इतकी बारकाईनं वर्णनं करून ठेवली आहेत, मी प्रपंचाचं वर्णन करण्याची गरज नाही. हे गैर नाही असं म्हटलं आहे. पण कशाच्या पुढं म्हटलं आहे, ते आपण ठरवायचं आहे, ते आपल्यावर सोडलेलं आहे. कारण शेवटी खरा सारांश आहे की, 'पुढं भगवंताचा भक्त न होणं गैर आहे !'

माणसाच्या इच्छेला नेहमी दोन दिशा आहेत. एक - दुःख नसावं अशी आणि दुसरी - सुख असावं, अशी. दोन्हीही इच्छाच आहेत. नुसतीच सुखाची इच्छा माणसाला असते, असं नाही. मला अपघात होऊ नये, आजारपण येऊ नये, कुठली अडचण येऊ नये, हाती घेतलेल्या कामात विघ्न येऊ नये. असं हे येऊ नये, ते येऊ नये, हे दुःख नको, ते दुःख नको अशा किती इच्छा असतात ? एका बाजूनं या 'नये'च्या इच्छांची यादी आहे. तर दुसऱ्या बाजूनं हे व्हावं, ते व्हावं, श्रीमहाराज म्हणतात तसं, पंतवंडापर्यंतसुद्धा सगळं हवं आहे. हे 'हवं' हे कशा स्वरूपाचं आहे ? तर त्याचं स्वरूप वर आपण बघितलंच. माझा बंगला झाला पण मुलाचा फ्लॅट अजून झाला नाही. माझ्या बंगल्याच्या वेळेला श्रीमहाराजांकडं खेपा घातल्या आणि त्यांनी वर्ष - दोन वर्षांत सगळ्या अडचणी दूर करत यांचा बंगला बांधून दिला. आता मुलाला बंगला शक्य राहिला नाही. त्यामुळं त्याचा फ्लॅट होऊ देत. त्याचं घरदार, त्याचा पैसा, काय करतो कुणास ठाऊक, साठवतो की नाही, पुढं नातवंडांची व्यवस्था करतो की नाही, त्याला त्याची जबाबदारी कळते की नाही कुणास ठाऊक - असं सगळं काम चालू आहे आणि या कामात आपल्याला महाराजांची काही इच्छा आहे का, याचा

विचार करायला उसंत मिळते का ? कोणत्या क्षणी मिळते ? एवढा विचार आपणच करावा.

या सगळ्या नैसर्गिक इच्छा, असं मी म्हणतो. तरीसुद्धा कामना असणं, दुःखाच्या 'नको' म्हणून आणि सुखाच्या 'हवं' म्हणून, असा माणसाच्या इच्छेचा व्यापार झाला. तुम्ही म्हणाल, माणसाचं याच्यात काही कर्तव्य नाही का ? अवश्य आहे. पण कर्तव्याला आसक्तीचं स्वरूप मात्र देऊ नका आणि त्याच्यात आपण गुंतू नका. वरती आपण बघितलंच की, आजीआजोबा लांब आहेत तेच बरं आहे, असं म्हणणारी मुलं असतात. आणि यांनाच वाटतं, आपण तिथं राहत नाही, त्यामुळं त्यांचं कसं होणार ?

यांतला जो काही फरक आहे, तो आपला आपण समजून घ्यावा. अशा तऱ्हेनं हे जे कर्तव्य आहे, त्याच्या बरोबरीनंच सगळं पुढचं आहे की, कर्तव्याला कुठं थांबायचं आहे ? या जशा नैसर्गिक इच्छा बघितल्यात, तशा अनैसर्गिक इच्छापण असतात. म्हणजे दुःख मला नको, त्याला होऊ देत. दुःख तिथं असू देत, इथं नको. अशापर्यंत लोकांच्या इच्छांचे प्रकार आहेत. मनामध्ये इच्छा येतात, त्यावेळेला अशासुद्धा येतात. त्या चुकीच्याच आहेत आणि त्या अयोग्य आणि अवाजवी अशा आहेत. अशा इच्छेच्या व्यवहारापासून, व्यापारापासून - आपण सावध व्हावं, हे चांगलं होय.

आता पुढं भगवंताचा भक्त न होणं गैर आहे, असं म्हटलं तर ते आता कशाच्या पुढं ? आपला प्रपंच मार्गी लागल्याच्या पुढं, मला नोकरी मिळाल्याच्या पुढं, लग्न झाल्याच्या पुढं, मूलबाळ झाल्याच्या पुढं, त्यांचं शिक्षण झाल्याच्या पुढं, म्हणजे नक्की कशाच्या पुढं ? तर, आपण एक ढोबळ नाव ठेवू की, कर्तव्याच्या पुढं !

तर, आपली कर्तव्यं झाल्याच्या पुढं तरी निदान थांबावं, असं म्हणायचं आहे. आपली कर्तव्यं झाल्याच्या पुढं तरी निदान भगवंताचा भक्त

न होणं, हे मात्र गैर आहे. कामनेचा भक्त होणं, असणं हे गैर नाही. मनुष्य जन्माला आला तो ओरडतो, ते त्याला तहान लागली म्हणूनच ओरडतो. जगण्यासाठी त्याला त्याची जरूर आहे म्हणून ते समजू शकतं. तसं हे इच्छांचं चालू आहे, असं आपण समजूया. फक्त ते 'किती पिढ्यापर्यंत' समजूया आणि 'कशाच्या पुढं', हा प्रश्न आहे !

एका बाजूनं एकतर कर्तव्य म्हणून माझ्या माणसांच्या पिढीला ते लागू आहे. एक पिढी पुढची, म्हणजे माझ्या मुलाची जबाबदारी माझ्यावर आहे. ती जबाबदारी माझी, पण त्याच्या मुलाची जबाबदारी माझी नव्हे. त्याच्या पुढची नातवंडाची जबाबदारी माझ्या मुलाची जबाबदारी आहे. तर अशी पिढी म्हणून आपण जबाबदारी धरूया. कारण तोपर्यंत माझी साठ, सत्तर वर्षं गेलेली असतात. ती शेवटी मर्यादितच आहेत. हे खरं तर ओळखायला हवं आणि भक्तीला वाहून घ्यायला हवं.

ते बाजूलाच राहिलं. इथंतर सध्या मला असं वाटतं की, माझ्या पंतवंडाचीसुद्धा काळजी घ्यावी. पण त्यावेळेला मी असण्याची शक्यता कमीच आहे. आणि यदाकदाचित असलो तर विकलांग असा जागेवरच असायचो. एकूणच पिढीच्या भाषेत, कर्तव्याच्या बाबतीत, माझी पिढी म्हणून मी कुठं थांबावं, तर माझ्या मुलाच्या जबाबदारीपर्यंत. त्याच्या मुलाची जबाबदारी त्याची. कशाच्या पुढं, हे समजून घेण्याची ही एक बाजू झाली.

दुसरी बाजू - आपल्या दैनंदिन, रोजच्या काळजीच्या पुढं. पोटासाठी रोज प्रत्येकाला काम करावं लागतं. त्यामुळं आपली प्रपंचाची जशी ठेवण असेल त्याप्रमाणं आठ तास, नऊ तास, बारा तास - काय ते राबल्यानंतर, ती काळजी संपल्यावर, भगवंताचा भक्त न होणं गैर आहे. त्या काळजीनंतर मी माझ्या भगवंतासाठी, वेळ देऊ शकत नसेन तर काहीतरी चुकतं, एवढं लक्षात घ्यायला हरकत नाही. रात्रंदिवस राबताना समजा एखाद्याची अशी

अवस्था येईल की, नातवंडाचं लग्न व्हायचं आहे किंवा मुलाचं लग्न होऊन मूलबाळ आहे, इथपर्यंत आपण धरलं, तर हे व्हायला एखाद्याची सत्तर किंवा ऐंशी वर्षं जातील. कशा पद्धतीनं काळ असेल, त्याचे योग कसे असतील - त्यावर अवलंबून आहे. म्हणून मग सत्तर वर्षांपर्यंत भगवंताचा भक्त होण्यासाठी तो स्वतःला भक्तीतून-साधनेतून एक्झम्पट-अपवाद धरण्याची शक्यता आहे. तसं होऊ नये म्हणून रोजची काळजी संपल्यानंतर, रोजची कर्तव्यं संपल्यानंतर, मी भगवंताचा भक्त न होणं गैर आहे, हे लक्षात घेणं आवश्यक आहे. आपल्या समोर असावं की, नुसतं हे एका पिढीसाठी नाही, कारण नुसता पिढीचा विचार करूनही पुरणार नाही. पिढीचं काम किती काळ चालेल, हे आत्ता आपण पाहिलं. म्हणून दिवसाच्या बाजूनंसुद्धा त्या दिवसाचं कर्तव्य संपलं की, भगवंताचा भक्त होणं आवश्यक आहे. भले त्या त्या पिढीच्या जबाबदाऱ्यासुद्धा आपल्याकडून पुऱ्या होतील की नाही, हे सांगणं कठीण आहे. म्हणून हे दिवसाचं मापही लागू करावं लागतं.

आता हे दिवसाला लागू असेल, आठवड्याला लागू असेल. म्हणजे काळाच्या दृष्टीनं पुढं, पण ते गरजेचं आहे. एका पिढीच्या दृष्टीनं पुढं कसं पहावं ते सांगितलं आहेच. मी आठवड्यातले सहा दिवस काम केल्यानंतर एक दिवस वीकली ऑफ घेतो. आता तर बरेच ठिकाणी फाइव्ह डे वीक असं आहे. सहा दिवस काम केल्यानंतर शरीराची गरज आहे की, त्याला विश्रांती दिली पाहिजे. निसर्ग याच्यापेक्षा वेगळं काम करतो का ? हे जे वचन आहे, ते निसर्गक्रमाला, त्याच्या कार्यपद्धतीला अत्यंत धरून आहे.

समजा, तुम्ही रात्री बारापर्यंत काम केलं तर, एक वाजल्यानंतर निसर्ग काम करेनासा होतो, डोळे मिटायला लागतात, डोळ्यासमोरचा स्क्रीन दिसेनासा होतो, काम समजेनासं होतं, चुका व्हायला लागतात आणि अशी माणसाची मर्यादा संपल्यानंतर कामामध्येसुद्धा शट्डाऊन घ्यायची वेळ येते.

ड्रायव्हरकडून खूपदा अपघात होतात ते त्याला पेंग आली, झोप झाली नाही, म्हणूनच होतात ना ? म्हणजे काम झाल्यानंतर शरीराला विश्रांती देणं म्हणजे शरीराचा भक्त होणं, ते निसर्ग घडवून आणतो. अशा तऱ्हेनं नैसर्गिकपणे कामाच्या पुढं योग्य ठिकाणी थांबलं नाही, विश्रांती नाही घेतली तर, ड्रायव्हरच्या वाट्याला अपघात येतात. माणूस स्वतःचा दिनक्रम असाच ठरवतो, काम केल्यावर तो विश्रांती घेतो आणि निसर्गाचा भक्त होतो. मग तेच त्या निसर्गाला घडवणाऱ्या आणि मला घडवणाऱ्या भगवंताच्या स्मरणाच्या बाबतीत आहे.

प्रपंचासाठी सहा, आठ तास मी राबत असेन तर एक तास, सहा दिवसानंतर एक दिवस भगवंताचा भक्त न होणं गैर आहे, असं आपल्याला म्हणायचं आहे. आपण आपला अनुभव बघून ठरवावं. जर समजा, मी असा थांबलो नाही, विश्रांती घेतली नाही, भक्त झालो नाही, स्मरणाला वेळ दिला नाही आणि सातवा दिवसही काम करतच राहिलो, तर असे सात दिवस झाल्यावर सोमवार परत हजर होईल. तेही सात दिवस झाले आणि मी असंच करत राहिलो की, परत सोमवार हजरच होईल. मग हे कधी थांबेल ? ते एका सोमवारी मी नसेन तेव्हा ! गाडी आपटणार कुठं, शेवटी झाडावरच आपटणार जाऊन, असं होईल की नाही ?

अनेकदा अशी सतत न थांबता कामनांची पूर्ती करत राहणाऱ्या, म्हणजे कामनेचे-कामांचे भक्त असणाऱ्यांना शेवटी निसर्गानं दिलेल्या शरीरयंत्रणा बिघडून वेगवेगळ्या आजारांना बळी पडावं लागतं, थांबावं लागतं. त्यातूनही वाचून त्यांनी तेच चालू ठेवलं, तर काही बिघाड कायमचे होतात आणि माणसं निकामी होतात, औषधोपचारही शक्य राहात नाहीत - हे आता आपण वेगवेगळ्या सेक्टरमध्ये, गावी, दवाखान्यांतून, नातेवाईकांत प्रत्यक्ष पाहतो आहोत. एकदा ही मर्यादा ओळखली नाही तर, कामांसाठी

सोडाच पण भगवंताच्या भक्तीसाठीसुद्धा शरीर साथ देऊ शकत नाही.

म्हणजे, याला कुठं मर्यादा आहे, 'पुढे'ला कुठंच मर्यादा नाही. म्हणून ती घालण्याचं काम आपल्याला दिलेलं आहे. प्रपंचाची जशी ठेवण असेल त्याप्रमाणं, एका ठराविक काळानंतर-पीरिऑडिसिटी म्हणजे रोजच्या काही तासांच्या नंतर किंवा किमान काही काम संपल्यानंतर, काही कर्तव्य पुरी झाल्यानंतर तरी, थांबणं किंवा एक आठवड्यात सहा दिवस काम केल्यानंतर सातव्या दिवशी तरी - भगवंताचा भक्त न होणं गैर आहे.

मनुष्य संबंध घेऊन जन्माला आला. आईपासून त्याचा संबंध सुरू झाला. प्रत्येक संबंध तो तोडतो आणि दुसरा जोडतो. तोडतो म्हणजे वाईट अर्थानं तोडत नाही. संबंध असतो पण तो बाजूला ठेवतो आणि दुसरा संबंध जोडतो. तो बाजूला ठेवून तिसरा संबंध, तो बाजूला ठेवून चौथा संबंध जोडतो. असं करत मनुष्य चाललेला आहे. आपण विचार करा, खरोखर असं चाललं आहे की नाही ? आईचा संबंध सोडला आणि तो जन्माला आला. तो सोडला तेव्हा वडिलांचा झाला. तो सोडला तेव्हा भावाचा झाला. सोडला म्हणजे टाकून नाही दिला. ते सगळे संबंध ठेवून परत हा संबंध आहे. असे आधीचे सारे संबंध ठेवून पुढचे पुढचे तो जोडत चाललेला आहे. असं लक्षात येईल की, दुसरा किंवा त्यापुढचा संबंध जोडताना त्याच्या पुढच्या पुढच्या इच्छा पुऱ्या करण्यासाठी ते संबंध तो जोडत जात असतो. म्हणजे असं, पोटापाण्यासाठी आईचा संबंध तो पुरा झाला की, तो न तोडता बाहेर चक्कर मारून येता यावं, म्हणून बाबांचा संबंध त्यानं जोडला. ते पुरं झालं तरी मोकळ्या वेळात खेळता यावं म्हणून पहिले दोन संबंध ठेवून त्यानं मित्राचा तिसरा संबंध जोडला. असं हे अखंड आयुष्यभर सुरू राहणार. कारण शेवटच्या क्षणापर्यंत त्याच्या इच्छा - कामना - गरजा राहणार आणि त्यासाठी त्याला असे संबंध वाढवत जात राहावं लागणार. याबद्दल जर तो

बेसावध असला, तर इच्छा अनिवार आणि अनंत असल्यामुळं संबंध जोडूनत्या पुऱ्या करायला त्याला आयुष्यसुद्धा पुरणार नाही. हे त्याच्या कधी लक्षात येईल ?

कारण प्रश्न असा आहे की, इच्छा अनंत आहेत, आणि आयुष्य मात्र मर्यादित आहे. शिवाय इच्छा त्याला कधी शाश्वत समाधान देऊ शकत नाहीत. म्हणून इच्छांच्या मागं लागून असं संबंध जोडत अखेर तो आयुष्य असमाधानात गमावून बसेल. म्हणून या इच्छांच्या मागं लागण्यात सावध होऊन, तो शेवटी भगवंताचा कधी होणार, हा प्रश्न आहे. हा या वचनाचा रोख आहे.

भगवंताचा भक्त नसणं गैर आहे म्हणजे काय, ते वर सांगितलं आहेच. जागृत होण्याचं कारण काय तर, त्याच्या या सगळ्या इच्छेच्या व्यवहारात - त्यासाठी संबंध जोडत जाण्यात - भगवंताचा संबंध नाहीच आहे. हा माणूस जोडला, तो माणूस जोडला, उद्या बॉस झाला, उद्या सहकारी झाले, सहकाऱ्यांचे मित्र झाले, समाज झाला, त्याचं कार्य झालं. या सगळ्यामध्ये भगवंताचं काय ?

माझे पहिले संबंध तसेच ठेवून, बाजूला ठेवून मी वडिलांचा भक्त होतो ना ? तसाच भावाचा संबंध जोडतो ना, माझ्या सहकाऱ्यांचा किंवा ऑफिसचा, व्यवसाय असेल तर ग्राहकांचा संबंध जोडतो ना ? मग तसंच करत माझा संबंध भगवंताशी कधी जोडायचा ? हे 'कशाच्या पुढं' करायचं आहे ? उत्तर असं की, हे कशाच्याही पुढं करायचं आहेच ! कारण तोच आपला अंतिम संबंध आहे ! हे सगळे संबंध निर्माण करणारा तो मूळ संबंध आहे. सगळे संबंध पोटात घेणारा संबंध आहे. खरं म्हणजे भगवंताच्या संबंधाचं स्वरूप सर्वांत मोठं आहे. पण तेवढाच संबंध माणसाकडून करायचा राहतो, ही शोकांतिका नाही का ?

मुलगा शिक्षणासाठी परदेशी पाठवला आणि शिक्षण अर्धवट सोडून लग्न करून परत आला, तर तुला कशासाठी पाठवलं होता, असं श्रीमहाराजांनी त्या मुलाला विचारलं, म्हणजे त्याला पाठवण्याचं सार्थक नाही झालं. तर तसं आहे हे सगळं. शेवटी भगवंताचा भक्त न होणं गैर कुठं ? या सगळ्या संबंधांमध्ये मी सगळे संबंध जोडत गेलो. पहिले बाजूला ठेवले, ते बाजूला करत पुन्हा वेळ काढला.

आईचा वेळ कमी केल्याशिवाय वडिलांना कसा वेळ देता येईल ? आईवडिलांचा वेळ कमी केल्याशिवाय, भावंडांना कसा वेळ देता येईल ? हा सगळा विचार त्या त्या वेळेला केला ! नकळतसुद्धा मी विचार केला. कसा झाला हेसुद्धा मला माहीत नाही. मी राहतो त्या घराचा माझा संबंध आहे. पण तो सोडून, मी शाळेत गेलो ना लहानपणी, त्यावेळी ते घर का आड आलं नाही ? माझं घर, माझे आईवडील, माझी भावंडं - यांना सोडून मी शाळेत जाणार कसा ? शाळेचा संबंध कसा जोडायचा - हा प्रश्न आपल्याला पहिलीत, पाचवीत, दहावीत कधी का आला नाही ? त्याचं कारण शाळेचा संबंध जोडण्याची गरज होती. पुढंमागं, माझं आयुष्य शाळेवर अवलंबून आहे. त्याप्रमाणं माझं खरं आयुष्य ज्या भगवंतामुळं सुरू झालेलं आहे आणि ज्याच्या स्मरणामध्ये संपणार आहे, त्याचं खऱ्या अर्थानं स्मरण झालं तरच ते खरं संपणार आहे. म्हणून भगवंताचा संबंध जोडायला मला असं बाकी संबंध थोडे बाजूला ठेवूनच जायला पाहिजे !

हे बाजूला ठेवून जाणं, म्हणजे भगवंताचा भक्त होणं आणि ते जर केलं नाही, तर मात्र गैर आहे ! कारण या सर्व संबंधांमध्ये सर्वांत मोठा संबंध भगवंताचा आहे की, ज्यानं माझे बाकीचे संबंध सांभाळले आहेत. जो मुलगा दहावीत असताना त्याला स्वतःला ॲडमिशन मिळावी म्हणून श्रीमहाराजांकडं गेला. पुढं त्याच्या नातवंडाला ॲडमिशन मिळावी म्हणून

गेला, तर त्याच्या आयुष्याचा केवढा काळ या इच्छांमध्ये गेला ? तो फक्त या इच्छांसाठीच श्रीमहाराजांकडं गेला ! 'श्रीमहाराजांसाठी म्हणून कधी त्यांच्याकडं गेला ?' ही खंत या वचनात आहे. त्याच्यातून आपल्याला एक दिशा पण आहे आणि ते एक शाश्वत सत्य पण आहे.

भगवंताचा भक्त हा पूर्णतेचा भक्त आहे, आनंदाचा भक्त आहे, निरिच्छतेचा भक्त आहे. तो श्रीमहाराजांकडं गेल्यावर काही मागत नाही, तर त्याच्यात काहीतरी प्रगती आहे. 'नेइल निरिच्छता भवपार' या आज म्हटलेल्या अभंगात आपण हा विचार पाहिला. आपल्याला नेहमी वाटतं की, माझे संबंध सुखाचे संबंध आहेत. पण खरोखर ते तसे आहेत का ? घरामध्ये एकमेकांत माणसं एकटी बोलतात तेव्हा त्यांची मनःस्थिती कळते. त्यांचे एकमेकांचे संबंध कितपत सुखाचे आहेत, ते खरं कळतं. अनेकदा ते असमाधानाचेच असतात. अर्थात, त्याची कल्पना आपल्याला बाहेरच्यांना येत नाही. त्यामुळं आपल्याला ते आनंदात आहेत, असं वाटतं.

आपल्या आणि जगातल्या इतरांच्या संबंधांचा आपण विचार केला तरी तेही चांगले आहेत, सुखाचे आहेत असं बघणाऱ्यांना वाटतं. आपलीही तशीच समजूत असते. पण एकेका क्षणी त्याला धक्का बसतो. कारण ज्याला-त्याला स्वतःच्या सुखासाठी दुसऱ्याचा संबंध हवा असतो. आपण जसे एकेक संबंध सुखासाठी जोडत जातो, इच्छा पुऱ्या करण्यासाठी संबंध वाढवत जातो, तेच इतर सर्व करत असणार नाही का ? मग एकवेळ अशी येते की, एकमेकांच्या सुखांचे संघर्ष होतात आणि सर्वांच्याच वाट्याला कधी ना कधी ही संबंधांची दुःखं पदरात पडतात. आपण अनेकदा एकतर्फी विचार करतो की, मी त्यांच्यासाठी राबतो आहे, त्यांच्यासाठी सगळं करतो आहे. त्याअर्थी ते आपल्याला सुख देतील, पण ते स्वतः पूर्ण नसल्यामुळं तेही त्यांच्या सुखासाठी आपल्याशी संबंध ठेवून असतात, याचं आकलन आपल्याला

होत नाही. मग दोघांना या अपूर्णतेमुळं आलटून पालटून दुःखं पदरात पडतात. संबंधांचं - इच्छांचं नेमकं स्वरूप काय आहे, हे मला माहीत होत नाही. ते माहीत झालं तर कळेल की, जगातल्या पहिल्या संबंधापासून आपण जोडत चाललेल्या शेवटच्या संबंधापर्यंत सर्वजण अपूर्ण - म्हणून दुःखी असणार आहेत. यात चूक काही नसलं तरी, इच्छेच्या मार्गानं सुख मिळवण्याच्या कल्पनेच्या मर्यादा, दुःखाची अपरिहार्यता त्यामुळं लक्षात येते, हे मात्र खरं. त्याचबरोबर हा अभ्यास केल्यामुळं इच्छेच्या त्यागानं येणाऱ्या सुखाची कल्पना येते आणि खरा पूर्णतेचा संबंध कोणता त्याचंही आकलन होतं. भगवंत हा एकच संबंध हा पूर्णतेचा संबंध आहे, हे आपण लक्षात ठेवून राहावं !

आपल्या घरात लहान मूल असतं. पहिला महिना, दुसरा, तिसरा, चौथा महिना अशी त्याची वाढ होत जाते. ते मूल आता पालथं पडतं का ? सहावा महिना झाल्यावर आपण विचारतो ते रांगायला लागलं का, आता धरून उभं राहतं का ? असं विचारतो ना आपण ? समजा, मुलाची कुठलीही नैसर्गिक शक्तींची वाढ झाली नाही - काय बुद्धीनं झाली नाही, चालण्यानं झाली नाही, बोलण्यानं झाली नाही. असं मूल समजा मोठं झालं नाही, तर आईला काय वाटत असतं ? तिला किती दुःख होतं ?

तेच दुःख कामनेचा भक्त, पुढं भगवंताचा भक्त झाला नाही तर, संतांना होतं. त्या दुःखाचं आणखीन स्पष्ट वर्णन करता येत नाही किंवा ते शब्दानं सांगता येत नाही. मूल वाढत वाढत मोठं होत चाललेलं आहे. तर ज्यानं ते वाढवलं, त्याची जाणीव ठेवली नाही याबद्दल भगवंताला काय वाटेल ? मूल मोठं झालं नाही, असं त्याला वाटेल. मूल मोठं झालं नाही, तर आईला जे दुःख असतं, तेच दुःख संतांना आपण भगवंताचं स्मरण ठेवलं नाही, तर असतं ! म्हणून भगवंताचा भक्त न होणं गैर आहे. आणि तेसुद्धा

'पुढं'. भगवंत 'आधी' म्हणतच नाही ! भगवंतानं जन्माला घातला म्हणून लगेच लागू दे भगवंताचं स्मरण करायला, असं नाही म्हणत तो ! तो म्हणतो पुढं स्मरण करूदेत. भागू देत सगळं, पोट भरल्यावर का होईना, हा शांत चित्तानं माझा भक्त होऊ देत, असं त्याला वाटतं. कारण ते खरं मोठं होणं आहे. खऱ्या अर्थानं मोठं झालेलं मूल आईलाही आवडतं.

आपण या सगळ्या कामनांचा विचार केला. अशा असंख्य कामना आपल्या डोळ्यांसमोर आल्या असतील. आपण लहानपणापासून एवढं आयुष्य काढलं आहे आणि पुढं अजून काढणार आहोत. प्रत्येक वेळेला मागत असताना आपलं काय झालं ? तर, आम्ही स्टेशनचे भक्त झालो, पण डेस्टिनेशनचे भक्त झालो नाही ! आजच्या भाषेत हा फरक समजून घ्यावा. आपण थांब्याचे भक्त आहोत, मुक्कामाचे नाही !

तेवढा फरक लक्षात ठेवला तर कामनांना, इच्छांना कर्तव्य म्हणूनही आयुष्यात योग्य स्थान राहील आणि आपल्या जीवनाला योग्य दिशापण राहील ! त्याच्यामुळं आपल्या जीवनाचा समाजातला प्रवासही योग्य होईल आणि भगवंताच्या भक्तीमुळं, आपल्या मनुष्यजन्मालासुद्धा न्याय मिळेल, आपला उद्धारही होईल !

।। श्रीराम ।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. ११/१०/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. ११ * निरूपण : क्र. १२

नामाच्या चिंतनाची सहा अंगे-
अर्थ, शक्ती, स्थान, संबंध, प्रयोग, अनुभव

(निरूपण - पूर्वार्ध)

असाल तेथे नामाचे चिंतन । याहुनि साधन आणिक नाही ।।१।।
सोडवील माझा भक्ताचा कैवारी । प्रतिज्ञा निर्धारी केली आम्ही ।।२।।
गुणदोष याती न विचारी काही । धावे लवलाही भक्तकाजा ।।३।।
अवघे काळी वाचे म्हणा नारायण । सेना म्हणे क्षण जाऊ न द्या ।।४।।

- श्री सेना महाराज

हा अभंग म्हणत असताना छान वाटतं. पण जे लोक त्याच्या अर्थाचा म्हणजे नामाच्या अर्थाचा विचार करतात, त्यांना प्रश्न पडतो. नाम घेणं हा मार्ग बरोबर आहे, त्याचं चिंतन करावं, हे म्हणणंदेखील बरोबर आहे. पण नामाचं चिंतन करायचं म्हणजे नेमकं काय करायचं ? कारण नामाच्या चिंतनाचा जो विषय आहे, तो अजून कुठं स्पष्ट झाला आहे ? आणि तसा तो कधी सहज स्पष्ट होणंही अवघड आहे. श्रीमहाराज म्हणाले तसं, एकतर मनुष्य नामाबद्दल बोलताना गप्प तरी बसेल, नाहीतर आयुष्यभर नामाबद्दल बोलत तरी राहील. कारण नामाचं माहात्म्य सांगून संपत नाही, त्याचा अंत लागणं शक्य नाही. शेवटी कधीतरी तो मनुष्य त्यातलंच एक नाम घेईल आणि निघून जाईल.

त्या अर्थानं आपण नामाकडं बघायचं आणि चिंतन करायचं. त्यासाठी वर सांगितलेली सहा अंगं आहेत. पण नामाच्या चिंतनाला याशिवाय आणखी काही अंगं नाहीत, असंही मानायचं कारण नाही. हेही आपण सुरुवातीलाच

लक्षात घ्यावं. नामाच्या चिंतनाचा विषय स्पष्ट करण्यासाठी किंवा सोडवण्याचा एक प्रयत्न म्हणून या सहा अंगांचा आपण विचार करत आहोत.

त्यांतलं एक अंग म्हणजे अर्थ. आपण जे नाम घेतो त्याच्या अर्थाकडं आपलं लक्ष असावं. आपण आपल्या पद्धतीप्रमाणं नाम घेत असतो. ते देवाचं असेल, किंवा कुणीतरी सांगितलेलं असेल. श्रीराम जयराम जयजय राम, दिगंबरा दिगंबरा.., गण गण गणात बोते, असं कुठलंही असू शकतं. असं जे नाम आपण घेतो, ते का घेत आहोत, याचा विचार केला की, अर्थाचा विचार सुरू होतो. नामाला काहीतरी अर्थ असतो.

आपल्याला अर्थ कळेल का ? आपण प्रयत्न करून बघूया. नामाचा सगळा, समग्र अर्थ कळेलच असं नाही. राम म्हटल्यावर माझ्या मनामध्ये मला कळणाऱ्या एका रामाला जो लागू आहे, असा अर्थ जागृत होतो. तिथपर्यंत माझी झेप जाते. पुढं कुणीतरी सांगतं की, तो आत्मारामाला लागू आहे. म्हणजे माझ्यामध्ये असलेल्या रामालासुद्धा लागू आहे. म्हणजे अर्थाचा थोडासा विस्तार झाला. आणि कुणीतरी सांगतं की, सर्वत्र भरलेल्या रामालाही तो अर्थ लागू आहे. म्हणजे माझ्यात असलेल्या रामाप्रमाणं त्याच्याही पलीकडं सर्वत्र भरलेल्या चैतन्यात राम आहे. मग ते सर्वत्र - हे जड असेल किंवा चेतन असेल. असं करत अर्थाची व्याप्ती वाढत जाते. ही व्याप्ती एका रामाच्या संदर्भात आपण बघितली.

श्री गजानन महाराजांचा नाममंत्र आहे, ' गण गण गणात बोते ' किंवा ' गणि गण गणात बोते ', हे नाम घेताना अर्थ काही कळत नाही. पण श्री गजानन महाराजांनी स्वतः हे नामस्मरण केलं, ज्या अर्थी तो नाममंत्र घ्यायला सांगितला, त्या अर्थी त्यात काहीतरी अर्थ आहे आणि हे नाम घेताना कित्येक जण उद्धरून गेलेले आहेत. मग याचा अर्थ सापडत नसेल तर निदान शोधून बघूया. आपण गण म्हणजे समूह म्हणतो ना ? मग सर्वत्र हे

समूह नाहीत का ? हे समूहाला उद्देशून म्हटलं आहे का ? हा गण आहे, तो गण आहे, सगळे गण आहेत. म्हणजे हा समूह, तो समूह असे सर्वत्र समूह आहेत. तर मी पण एक समूहच आहे. माझा देह पंचमहाभूतांनी बनलेला आहे. म्हणजे माझा पाचांचा समूह आहे. आपण अभंग म्हणतो ना की, 'माझे प्रपंची या गुरुराया ' श्री गुरूंना आपण या म्हणून म्हटलं, तर ते का आपल्या घरी, बंगल्यात किंवा फ्लॅटमध्ये या म्हणून का म्हटलं ? माझा जो पंचमहाभूतांचा प्रपंच मांडला, त्या माझ्या देहात या, अशी प्रार्थना त्यात आपण आपल्या गुरूंना केली. आता बाहेर माझे आई, वडील, पत्नी, मुलं हा जो प्रपंच आहे, त्यामध्येही तुम्ही या. म्हणजे प्रपंचाचा आणखी विस्तार झाला. मी जिथं ऑफिसमध्ये किंवा इतरत्र काम करतो, तिथंसुद्धा माझा प्रपंच आहे. तिथल्या माझ्या प्रपंचातल्या लोकांची संख्या पन्नास जणांची असेल, तर तिथंपण आपण या. आपल्याबरोबर आपले गुरू तिथंही असायला काय हरकत आहे ! तर असा अर्थाचा विस्तार होत जातो.

श्री गजानन महाराजांनी नुसतं गण गण म्हणत थांबले नाहीत. ते गणि गण असंही म्हणाले. गणि म्हणजे नाम-नामी तसा भगवंत प्रत्येक ठिकाणी आहे. शत्रुत तसा मित्रातही. 'वासुदेवः सर्वम् !' पुढं बोते म्हणाले- बोया हुवा होता है - पेरलेला, वास करून, सुप्त स्वरूपात आहे. म्हणून पुढं मग त्यांनी गणात बोते म्हटलं. म्हणजे बाहेर जे आहे, तेच माझ्यात आहे. माझ्यात जे आहे, तेच बाहेर सर्वत्र वास करून आहे. आता बाहेर ते कशाकशाच्या रूपानं आणि कुठंकुठं जिथं आहे, ते सर्व माझ्यात आहे. श्री कृष्णमूर्ती म्हणाले, 'यू आर द वर्ल्ड.' ते याच्यापेक्षा वेगळं काय म्हणाले ? ते या 'गण गण गणात बोते ' सारखंच नाही का ? असं आपण नामाच्या अर्थाचं चिंतन करायला सुरुवात केली, तर प्रारंभी निरर्थक वाटणारे शब्द कसा आणि किती अर्थ उत्पन्न करू शकतात, हे लक्षात येईल. कारण त्या

शब्दामध्ये अर्थ असतोच, म्हणूनच सत्पुरुष ते शब्द उद्‌गारत असतात.

हे नाममंत्र आपल्याला, आपल्या मनाला सांगत असतात की, याचा बोध करून घ्या. ' श्री गुरुदेव दत्त ' असं आपण म्हणतो. इथलं ' श्री ' हे पूर्णत्वाचं निदर्शक आहे. म्हणून ' श्री ' च्या पुढं आपण पूर्णविराम देत नाही. कारण त्याच्यापुढं जे आहे, तेही साक्षात पूर्ण आहे. आपल्या नावाआधी श्री. लिहून पूर्णविराम देतो आणि नाव लिहितो. ते श्री. म्हणजे श्रीयुत, श्रीमती, श्री.रा.रा. असं सांगण्यासाठी आणि तेवढाच त्याचा अर्थ, त्याच्यापेक्षा त्याच्यात काही अर्थ नाही हे सांगण्यासाठी श्रीच्या पुढं टिंब देतो. हे जसं टिंब दिलं जातं, त्यानं काहीतरी व्यक्त होतं. तसंच 'श्री' हे भगवंताचं संक्षिप्त नामाभिधान आहे. त्यामुळं नुसत्या 'श्री'नं भगवंत व्यक्त होतो. श्री महाराज, श्री हंसराज स्वामी, श्री गुरुदेव दत्त - असं जर एखादा म्हणत असेल, तर त्याला त्याचा अर्थ या चिंतनानं कळेल. समजा नाही कळला तर तो मनुष्य क्षणभर म्हणेल, न कळेना का अर्थ, जो अर्थाचा स्वामी आहे, तो त्या नामात उतरेलच की. आणि तो त्याचा अर्थ समजावून देईलच.

' श्री गुरुदेव दत्त ' म्हणजे काय ? दत्ताचं महात्म्य हेच आहे की, दत्त म्हणजे वाट्याला परमेश्वरानं दिलेली प्रत्येक गोष्ट. ती त्यांना गुरू वाटते. चांगलंवाईट, व्यक्ती, अनुभव - हे जे दत्त तेच ज्याचा गुरू आहेत, त्यातून तो शिकतो म्हणून दत्तगुरु ! हे दत्त हेच त्यांचा गुरू आणि त्यांचा देव, ते हे ' श्री गुरुदेव दत्त ' म्हणून त्यांची सगुणाची वेगळी उपासना नाही. निर्गुण पादुकांची आहे. त्या दत्तांचं स्मरण म्हणजे माझ्या वाट्याला आलेली प्रत्येक गोष्ट माझी गुरू होऊ देत. इतकी ज्यांची विचारांची झेप, इतकं समजून घेण्याचं ज्यांचं सामर्थ्य, त्यांचं मी स्मरण करतो म्हटल्यावर त्याचा चित्तावर परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ? चार शब्दांची वाईट बातमी वाचली की, मनुष्य सैरभैर होतो, अस्वस्थता निर्माण होते. चार शब्दांत एवढं सामर्थ्य

असेल तर नाममंत्रांच्या शब्दांमध्ये स्वास्थ्य निर्माण करण्याचं किंवा दिशा देण्याचं सामर्थ्य नक्कीच असेल. म्हणून अर्थ कळायचा प्रयत्न करायचा. तो श्रीकार आहे. एखाद्या नामाच्या तो मागं असेल किंवा नसेल. पण ते मूळ काय आहे याचा शोध घेत राहावं, विचार करावा. समजा त्याचा अर्थ नाही कळला तर, त्या नामाला उद्देशून प्रार्थना केली तरी, नामाचा अर्थ कुठूनतरी पुस्तकातून, कोणाकडून तरी, कशावरून तरी तो तुमच्यापर्यंत येऊन पोचेल. अर्थ व्यक्त करायला, आपल्यापर्यंत पोचवायला ते नाम नक्कीच समर्थ आहे.

आपण ' अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ' असं मोठ्यानं म्हणतो. त्याच्या अर्थाचं चिंतन केलं तर लक्षात येईल की, हे अवधूत स्वरूपाचं स्मरण आहे. ज्याच्यावर कशाचाही लेप नाही, असं निर्लेप स्वरूप म्हणजे अवधूत स्वरूप आणि अवधूत स्वरूपाचं चिंतन करून ते अवधूत झाले. असं मनात आलं की, अवधूत - चिंतन या शब्दाचा अर्थ कळतो. मग अशा अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त - यांच्याकडं बघण्याचा दृष्टिकोनच बदलतो. मग आपण नुसतंच मोठ्यानं ' अवधूत चिंतन ' न म्हणता ते विचारपूर्वक म्हटलं, तर आपल्याला चित्तानं अवधूत व्हायचं आहे, याचं स्मरण होतं.

आपण जे नाम घेतो त्याचं असं चिंतन करावं. ते परमेश्वराच्या आदर्शाचं स्वरूप असतं, कुठल्यातरी बोधाचं असतं. म्हणून नामाचे प्रकार आहेत. काही अर्थवाचक नामं असतात, काही व्यक्तिवाचक नामं असतात आणि काही अवतारवाचक नामं असतात. आपण जे नाम घेतो हे कशाचं वाचक आहे ? उदाहरणार्थ, रामाचं वाचक असं नाम आपण घेत आहोत, अशी कल्पना करूया. आपली प्रापंचिक ठेवण कोणतीही असू देत, मग ती राजाची आहे की रंकाची आहे त्याचा संबंध नाही. तर जो राम आयुष्यभर सुखदुःखांची पर्वा न करता प्रपंचात आपली कर्तव्य प्रत्यक्ष जगतो, त्याचं स्मरण मी करतो, असं चिंतन होणंसुद्धा खूप आहे.

आपला अकारण बुद्धिभेद करून असंही सांगणारे लोक भेटतात की, तुम्ही रामाचं चिंतन केलंत तर तुम्हाला वनवासात जावं लागेल. पण एकतर राम वनवासात कर्तव्यासाठी गेले आहेत, ते कर्तव्य करणं मला त्यातून शिकता येईल. त्यासाठी वनवासात जावं लागेल असं नाही. पण असं एखादं बाह्यतः एकाकी वाटणारं जीवन कर्तव्यासाठी जगावंही लागेल पण उपासनेमुळं आनंदानं ते कसं जगावं, हे कळेल. दुसरं असं की, रामाच्या चिंतनानं रामासारखं कुठल्यातरी वनवासात जावं लागलं तर त्याच्याच चिंतनानं असुरांचा पराभव करून विजयश्री जिंकून पुन्हा राज्यावरही परतता येईल. कारण तेच श्रीराम वनवासातून परत आलेलेही आहेत.

प्रपंच म्हणजे वनवासही आहे आणि नगरवासही आहे. रामाच्या जीवनात वनवास होता, हे मान्य आहे. पण राम हा राजाचा मुलगा होता, तर त्याचं चिंतन करू. रामाचं चिंतन केलं म्हणून आपल्याला काही वनवासात जावं लागणार नाही. तर चिंतनाचे असे सकारात्मक - नकारात्मक प्रकार असू शकतात. आपण सकारात्मक चिंतन करत असावं, हे काही वेगळं सांगायला नको. रामानं दिलेला शब्द कसा पाळला, हे मला माझ्या प्रपंचात शिकण्यासाठी आहे, एवढंच नव्हे तर सामाजिक स्वास्थ्यासाठीसुद्धा अशा शब्द पाळण्याची-प्रामाणिकतेची किती मोठी गरज निर्माण झाली आहे, याची जाणीव आपल्याला रोज होते आहे. रामचिंतनानं चित्तावर असे सकारात्मक ठसे उमटतात जे पुढं चांगल्या कृतींना प्रेरणा देतात. चिंतनातसुद्धा सकारात्मक चिंतनाचा असा विधायक परिणाम होतो.

गुरुतत्त्वतरंगिणीमध्ये आपण वाचलं की, 'स्वशब्दाचे नसे मूल्य '- शब्दांचं मूल्य नाही. दूधाची पिशवी घरी नेली, तर त्यावर लिहिल्याप्रमाणं तेवढं दूध असेलच असं नाही. वस्तूच्या पॅकिंगवरती लिहिल्याप्रमाणं आत कंटेन्टस् - घटक असतीलच असंही नाही. औषधाच्या गोळीच्या पॅकिंगवर

लिहिल्याप्रमाणं ती औषधं ओरिजिनल-अस्सल असतील, असंसुद्धा नाही. आपण ज्या काही वस्तू आणतो, त्यावर लिहिलेल्या शब्दांना अलीकडं तसं मूल्य उरलं नाही. त्यामुळं भ्रष्टाचार आणि दुःख आहे.

याउलट रामाच्या जीवनामध्ये शब्दांचं किती मूल्य होतं, त्याची मला जाणीव व्हावी आणि माझ्या जीवनामध्ये तसं काहीतरी मूल्य निर्माण व्हावं. कारण परमेश्वर सत्यस्वरूपच आहे. मी कितीही असत्य जगात जगण्याचा प्रयत्न केला तरी शेवटी मला सत्याचाच सामना करावा लागेल, तिथपर्यंत मला जावं लागेल. याच्यासाठी हा सत्याचा - तशासारख्या मूल्यांचा, अभ्यास आहे. रामाचं नाम हा त्या मूल्यांचा अभ्यास आहे. म्हणून त्यात आदर्श पुत्र, आदर्श पत्नी, आदर्श बंधू, आदर्श मित्र, इतकंच काय आदर्श शत्रू - असं सगळं आहे. असं नामाच्या अर्थात, शब्दात काय भरलं आहे, त्याचं चिंतन करता येतं. नाम अशा तऱ्हेनं संकेत देतं.

दुसरी गोष्ट शब्दांचा म्हणून काही एक अर्थ असतो. 'गुरुदेव दत्त' या शब्दाचा काही एक अर्थ आहे. गुरू म्हटल्यावर काही एक बोध होतो. देव म्हटल्यावरती काही एक बोध होतो. तसंच दत्त म्हटल्यावर काही एक बोध होतो. या एकमेकांचा संबंध कसा जोडला आहे ? तर गुरुदेव हा एक शब्द आहे. हा समास कसा सोडवायचा, ते आपणच शिकायचं आहे - 'गुरू हाचि देव' असा तो सोडवला की, लक्षात येतं की, हे गुरुदेव काय आहे ते. आता गुरू हाच देव झाल्यावर, तो मनुष्य वेगळी देवाची उपासना कशाला करेल ?

गुरू गोविंद दोऊ खडे, का के लागू पाय ।
बलिहारी गुरु अपने, जिन गोविंद मिलाय ।।

गुरूंनी भगवंताला धरून ठेवलं आहे. आपण गुरूंना धरून ठेवावं. त्यामुळं आपल्यापर्यंत भगवंत येणारच. असं गुरूंचं स्वरूप कळल्यानंतर अशा गुरूंचं

मी स्मरण करतो आहे, तर हे चिंतन किती भावपूर्ण होईल ! आपलं मन चिंतनाशिवाय कुठं थांबलंय ? मग असं भावपूर्ण चिंतन करायला काय हरकत आहे ? निर्विचार मन ही अंतिम स्थिती आहे. ती साधली तर कशाचीच गरज नाही, अगदी भगवंताचीसुद्धा नाही. अभंग कुठपर्यंत तर जिथपर्यंत मुक्काम गाठला नाही तिथपर्यंत, पुढं ' आनंदाचे डोही आनंद तरंग ' अशी स्थिती होईल.

तिसरी गोष्ट, नाम हे ज्याचा संकेत आहे, त्याच्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करत असतो. माझ्याशी कुठल्यातरी उपासनेचा काही संबंध आहे. म्हणून ती माझ्या वाट्याला येते. लहान मुलाला विचारलं की, तुला कोणता देव आवडतो ? तर तोसुद्धा पटकन गणपती आवडतो, दत्त आवडतो असं सांगतो. म्हणजे त्यात्या देवतेच्या रूपाची आवड घेऊनच तो जन्माला आला आहे. अशी जन्मतःच एखाद्याला एखाद्या देवतेच्या रूपाची आवड असते. म्हणूनच त्या देवाचं नाम हे त्याच्या रूपाचं स्मरण असतं. भगवंताच्या रूपाच्या जयजयकारात त्याच्या कृतज्ञतेचं स्मरण होतं. हळूहळू त्याच्या नामाच्या जयजयकारानं त्याच्या अर्थाचं चिंतन होतं. मग अशा अर्थाच्या चिंतनानं त्याचा अधिक कृतज्ञतापूर्वक जयजयकार आपल्याकडून होतो.

या नामामध्ये चार गोष्टी हळूहळू एकत्र येतात. नामाच्या शब्दांचा अर्थ आला, कृतज्ञतेनं त्याचा जयजयकार आला, ज्याचं नाम घेतो त्याचं स्मरण आलं आणि नंतर त्याचा बोधही होतो.

देवतेचं नाम ज्ञानानं घेत असेल किंवा ज्ञानमंत्र असेल तर त्यापासून थेट बोध होतो. ' ॐ तत् सत् ' हे नाम म्हणून बरोबर आहे. पण त्यामुळं विशिष्ट देवतेचा बोध होत नाही. तर हे दृश्य खरं नाही, म्हणजे अंतिमतः खरं नाही. तर ते निर्माण करणारं, चालवणारं जे काही आहे ' तत् ' आहे, ते खरं आहे, सत् आहे, याचा बोध होतो.आपल्याला प्रपंचातून जात असताना त्रास

होणारच. हे खरं नाही, ते खरं नाही असं शिकण्यातच माणसाचं सगळं आयुष्य जातं की नाही ? आणि शेवटी मनुष्य म्हणतोच ना की, इतकं केलं पण शेवटी काही खरं नाही बघा !

मध्यंतरी आयटी सेक्टरमध्ये एकदम मंदी आली आणि सगळीकडं काळजीचं वातावरण निर्माण झालं की, आता काय होतं कुणास ठाऊक. पण हा त्रास खरा नाही, हे सुरुवातीपासूनच मंत्र सांगतो आहे. 'ॐ तत् सत्' असा हा ज्ञानाचा मंत्र आहे. तो हा बोध सतत देत राहील की, जे हे काही चाललं आहे ती आपल्याला मंदी वाटो-चढती वाटो, यश वाटो- अपयश वाटो, यातलं सारं जे 'हे'- म्हणजे आजूबाजूचा प्रपंच, दृश्य आहे-हे काही खरं नाही. या सर्वामागं जे 'ते-तत्' आहे, ते खरं आहे. ते भगवत्स्वरूप आहे, शांत आहे, स्थिर आहे, प्रसन्न आहे. ते लक्षात ठेवून या प्रपंचातल्या चढउतारांकडं आपण तटस्थतेनं पहावं, असा बोध हा ज्ञानाचा मंत्र करून देईल, आपल्याला आयुष्यात शेवटच्या क्षणापर्यंत शांत राहायला आणि उद्धरून जायला मदत करील.

आता कुणी दत्ताचं नाम घेत असेल तर ते नाम दत्ताचं स्मरण देईल. तो मंत्र कशाचं तरी स्मरण देतो आणि मग आपण त्याचा जयजयकार करतो. बोध मिळाला असेल तर त्याचं चिंतन करतो. तत् सत् हे चिंतन आहे की, जे आहे ते सत् नाही, तर भगवंत हेच सत् आहे. आज मला जे सुख वाट्याला आलं तेही असत् आहे, त्यामागचा तो भगवंत खरा आहे-तो कल्याणमय आहे, आनंदमय आहे. तसंच आज माझ्या वाट्याला दुःख आलं तरी तेही असत् आहे, त्यासाठी कुणाला दोष द्यायचं कारण नाही. कारण त्याहीमागचा तो भगवंत खरा आहे, तो कल्याणमय आहे, आनंदमय आहे. त्यामुळं तिथं चिंतन आवश्यक आहे. सुखात काय, दुःखात काय चिंतनाची आवश्यकता आहे कारण दोन्ही असत् आहेत-त्यामुळं अशाश्वतही आहेत. दोन्हीही मागचा

भगवंत मात्र कायमच शाश्वत, आनंदमय आहे आणि आपण त्यात राहू शकलो तर, आपणही कायम आनंदमय आहोत, राहू शकू. अशा तऱ्हेनं जसा मंत्र असेल तसं चिंतन होईल.

नाम घेताना मनात विचार येतात ना ? सर्वसाधारणपणे नामाची वेळ म्हणजे आपले राहिलेले विषय, राहिलेले विचार, राहिलेल्या आठवणी, पुढं होणाऱ्या गोष्टींबद्दल काळज्या, असं सगळं करण्याचा जणू काही आपला तासच आहे ! आपली नामाची बैठक म्हणजे असं काहीतरी होऊन बसतं ! असं व्हायला लागलं तर काय करावं ? तर अशावेळेला संतवचनांचा, बोधवचनांचा खूप उपयोग होतो. पुस्तक उघडून एखादं वचन वाचलं, 'देह गेला म्हणजे कर्मभूमी अंतरली ' किंवा ' गुरूंचा संतोष ही खरी पूजा ' असं वचन समजा वाचलं, तर गुरूंचा संतोष म्हणजे काय, गुरू कोण, संतोष देण्यासाठी पूजा करणं म्हणजे काय, त्यांचा संतोष कोणत्या मार्गानं साधेल, गुरूंना संतोष कोणता अभिप्रेत असतो, मला संतोष काय अभिप्रेत असतो - असं चिंतन सुरू होतं.

अर्थशास्त्रामध्ये आपण उत्पादक आणि अनुत्पादक उद्योग असं शिकतो. अनुत्पादक उद्योगामुळं राष्ट्रीय संपत्तीचा प्रश्न निर्माण होतो. तसं घरातले विचार ही चिंतनाची अनुत्पादक बाजू नाही का ? म्हणून चिंतन होणं हे जर आपल्या हातात नसेल तर त्याऐवजी संतवचनांच्या चिंतनात काहीतरी तरी उत्पादक, पूरक असं पदरी पडेल. ही चिंतनाला मदत होण्याची दुसरी बाजू. नामाच्या अर्थाचं चिंतन करणं जमलं नाही तर नामामध्ये अनुत्पादक किंवा भरकटणाऱ्या चिंतनापेक्षा अशा संतवचनांच्या-अभंगांच्या चिंतनाची पूरक बाजू तरी देण्याचा प्रयत्न करावा. आता नामाच्या चिंतनाच्या इतर बाजूंचा विचार पुढच्या निरूपणात करूया.

।। श्रीराम ।।

(पूर्वार्ध : निरूपण क्र. १२)

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. १८/१०/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. ११ ❀ निरूपण : क्र. १३

नामाच्या चिंतनाची सहा अंगे-
अर्थ, शक्ती, स्थान, संबंध, प्रयोग, अनुभव

(निरूपण - उत्तरार्ध)

नामाच्या चिंतनाचं दुसरं अंग म्हणजे नामाची शक्ती होय. नामाच्या शक्ती दोन प्रकारच्या आहेत. काही ज्ञात काही अज्ञात. साधारणपणे आपल्या वडिलांकडं काय काय आहे, ते आपल्याला माहीत असतं. पण सगळ्याच ॲसेटस्-मालमत्तांबद्दल कल्पना नसते. नंतर लॉकरमध्ये ठेवलेल्या यादीवरून काहीतरी बाजूला ठेवलेलं आहे, हे समजतं. असे काही ॲसेटस् ज्ञात तर काही अज्ञात असतात.

व्यवहारातलं पटकन कळायला सोपं म्हणून हे उदाहरण घेतलं. मग मागाहून लक्षात येतं की, बाबांनी आपल्या हिताची खूपच काळजी घेतली. तसंच नामाच्या कळून येणाऱ्या शक्ती आणि न कळणाऱ्या शक्ती असतात, म्हणजे काही ज्ञात काही अज्ञात. आपल्या जीवनात काहीतरी घडतं. कसं घडलं ते कळत नाही. पण नाम घेतल्यानंतर ते घडलं. पूर्वी नाम घेत नव्हतो, तेव्हा अशी घटना घडली नाही, हे खरं आहे. आता ते नामानं कसं घडलं, असा विचार येतो.

श्री कलावती आईंना एकानं विचारलं की, नाम घेतल्यानं पास होता येईल का ? तर त्या म्हणाल्या की, नाम घेतल्यानं पास होत नाही. पण नाम घेतल्यानं मनाला लागणारी एकाग्रता निर्माण होते, एकाग्रतेनं अभ्यास चांगला होतो, चांगल्या अभ्यासानं पेपर चांगला जातो आणि पेपर चांगला लिहिल्यानं पास होता येतं. असं श्री कलावती आईंनी नामाच्या शक्तीबद्दल

सांगितलं आणि ती आपल्याला कळली. म्हणून ती ज्ञात शक्ती झाली.

श्री गुरुदेव रानडे पहिल्यांदाच श्री भाऊसाहेब महाराजांकडं गेले. तेव्हा श्री भाऊसाहेब महाराज म्हणाले, नाम घेणारा परीक्षेत पहिलासुद्धा येईल. तेवढं एकच वाक्य श्री गुरुदेवांनी तेव्हा लक्षात घेतलं. त्यांनी निष्ठेनं नाम घेतलं व अभ्यासही तसाच केला. अभ्यास करायचा नाही, असं श्री भाऊसाहेब महाराज नाही म्हणाले. परीक्षेच्या दिवशी पहाटे उठून, आपला जप करून श्री गुरुदेव परीक्षेला गेले. नंतर त्यांना शंकरशेट शिष्यवृत्ती म्हणजे आजच्या बोर्डातला पहिला क्रमांक मिळाला. त्यांनी त्यांचा अनुभव लिहून ठेवला, म्हणून नामाची शक्ती आपल्याला कळली. नाहीतर ती अज्ञात स्वरूपाची राहिली असती. श्री गुरुदेवांच्या जागी आपली मुलं असती, तर आपण नक्कीच म्हणालो असतो की, आज तरी जपाची काही गरज आहे का? थोडंसं वाचलंस तर दोन मार्क वाढतील. पण संतांचं म्हणणं तसं नाही. त्यांचं म्हणणं असं की, तुम्हाला लक्षात राहण्यासाठी, आकलन होण्यासाठी जे मन लागतं, ते नामातून निर्माण होतं. त्यासाठी तुम्ही नाम घ्या.

नामाची दुसरी ज्ञात शक्ती म्हणजे सावधानता होय. नामानं मनुष्य सावध होतो, साधनेची दिशा त्याला कळते. परमेश्वर मिळवायचा म्हणजे विकार आवरावे लागतात. नाम घेतलं की, विकार आवरलेत आणि पटकन भगवंतप्राप्ती झाली, असं होत नाही. तर आपल्याला विकार आवरत नाहीत ते मनुष्याला कळतं. राग येऊन गेल्यावर एक तासानं जाणीव होते की, अरे! उगाचच आपण बोललो. सकाळी कशावर तरी सही केलेली असते, संध्याकाळी लक्षात येतं की, यात पडायचं काही कारण नव्हतं. अकारण सकाळी कुठल्यातरी ठिकाणी जाणं होतं, नंतर कळतं की, गेलो नसतो तरी चाललं असतं. ही सावधानता येणं आहे आणि ती नामानं साधते. हे ओघानंच येतं की, सावधानतेची प्रगती नामाच्या प्रगतीवर अवलंबून आहे. एकदम

पहिलीतून दहावीत कसं जाता येईल ? पहिली पास होऊन दुसरीत जावं लागतं. तसंच जी सावधानता मला संध्याकाळी आली ती कदाचित एक वर्षानं येईल. कदाचित दहा वर्षांनी येईल. दहा वर्षांपूर्वी अमूक एक काय केलं नसतं तर, बरं झालं असतं, असं दहा वर्षांनी कळलं. मग हे कशानं कळलं ? एखाद्याला आयुष्यभर कळणार नाही. नाम घेणाऱ्याला हेच अधिकअधिक लवकर कळायला लागेल, ते महत्त्वाचं आहे. म्हणजे नामाच्या शक्तीचा काहीतरी अनुभव त्याला येऊ शकतो. अशी नामाच्या शक्तीमध्ये सावधानता येण्याची क्षमता आहे.

त्यानंतर नामामध्ये मनुष्याला सावरण्याची, सांभाळण्याची क्षमता आहे. जर काही नुकसान झालं, दुःख वाट्याला आलं तर त्यात मनुष्य सावरला जातो. अलीकडची घर पडण्याची एक घटना आपल्याला माहीत आहे. घर पडून त्याच्या ढिगाऱ्याखाली मोठी माणसं गेली. पण घराच्या चौकटीत असणारं मूल वाचलं. चौकट उभी होती त्या भागावर काही पडलं नाही आणि मूल वाचू शकलं. आता घर पडायचं राहिलं का, तर नाही. पण मुलाचा सांभाळ त्या चौकटीमुळं झाला. नामाच्या चौकटीमध्ये आपण राहिलो, तर आपलाही सांभाळ होतो, असं मला म्हणायचं आहे.

नामाच्या अज्ञात शक्तीचा मनुष्य अनुभव घेऊ शकतो. जेवढी अनुभवायला येईल, तेवढी ज्ञात झाली, असं समजायला हरकत नाही. ही शक्तीच्या अनुभवाचीच बाब असल्यामुळं पहिल्यांदा विश्वास ठेवूनच नाम घ्यावं लागतं. आणि त्याला पर्याय नाही. रोजच्या व्यवहारात डॉक्टर रेकग्नाइज्ड आहेत, स्पेशालिस्ट आहेत असा बोर्ड बघूनच आपण त्यांच्याकडं जातो ना ? कुणीतरी त्यांच्याबद्दल सांगतो, म्हणूनच आपण त्यांच्याकडं जातो. तुम्ही आधी मला बरं करून दाखवा, मग तुम्हाला स्पेशालिस्ट म्हणतो, मगच तुमचं औषध घेतो, असं आपल्याला कसं म्हणता येईल? नाही म्हणता

येणार.

जो एखादा रुग्ण त्यांच्याकडं बरा झाला असेल, त्याला फारतर विचारता येईल की, या डॉक्टरांमुळं तुम्ही बरे झालात का ? हा त्यातला मार्ग आहे. हे असं आपण साध्या व्यवहारात करतो. तसा विश्वास ठेवूनच आपण नाम घेतो. मग आपल्याला थोडाफार अनुभव येतो. आपल्याला असलेल्या चिंतांचं प्रमाण कमी झालं, चुकीच्या विचारांचं प्रमाण कमी झालं, दिशा चांगली मिळाली, चित्ताला थोडी शांतता यायला लागली, घरातल्या इतरांना आपल्यापासून बरं वाटायला लागलं - असे अनुभव येऊ शकतात.

आपल्यापासून घरातल्या लोकांना जर त्रास होत असेल, तर त्यांच्या प्रतिक्रिया येत असतात. त्या सगळेजण व्यक्त करतीलच असं नाही. ज्या ठिकाणी मुक्त वातावरण आहे, तिथं इतर जण आपल्याबद्दल मोकळेपणानं सांगू शकतील. पण सगळीकडं माणसं प्रतिक्रिया देतीलच, असं नाही. याचा अर्थ प्रतिक्रिया नसतात, असं नाही. तर, त्या ज्या असतात त्या कमी होतात, त्यांचं प्रमाण कमी होतं. याचं खरं कारण म्हणजे मुळात आपलं चित्त स्थिर, शांत, आनंदी राहिल्यामुळं, घरातल्या इतरांना आपल्यापासून त्रासाचा अनुभव येण्याचं काही कारणच राहत नाही. नामाच्या शक्तीचा आपल्याला येणारा साध्या व्यवहारातला हा अनुभव आहे. तेवढ्यासाठीच ' आधार हा घ्यावा संतांचा तो ' हे अभंगात म्हटलं आहे. संतांना अनुभव आहे, म्हणूनच संतांचा आधार घेऊन बघावा.

दुकानावर पाटी लिहिलेली असते की, किराणा दुकान आणि आपण त्याप्रमाणं दुकानात जातो. किंवा जाहिरातीत पाट्या लावतात की नाही, सून कमिंग सून, वगैरे. पण फुलझाडांना पाट्या लावत नाही की, फुलं फुलून येत आहेत. एके दिवशी जाताना कळतं. अरे वा ! छान फुललं वाटतं झाड. तसं संतांचं काम असतं. ते इतके थोर असतात की, पाट्या लावत नाहीत.

संतांच्या शक्तीचा अनुभव घ्यायचा म्हणजे, जसा फुलाच्या सुगंधाचा अनुभव यावा, तसा त्यांचा आपोआप आधार वाटावा. त्यांच्या आधाराचा आपल्याला आलेला अनुभव शेवटी सांगू शकतो काहीतरी. म्हणून नामाच्या काही ज्ञात, काही अज्ञात शक्ती - असे दोन प्रकार केलेत.

नामाच्या अज्ञात शक्तीबद्दल एवढंच लक्षात ठेवावं की, इट वर्कस्. नाम जर घेतलं असेल तर ते आपलं काम करतं. कसं करतं, काय करतं, किती करतं, हे सांगता येणार नाही. कारण ते अज्ञात आहे ना ? मनुष्यामध्ये एक प्रवृत्ती असते की, तो त्याचं काम करेलच असं नाही. कुठल्याही ऑफिसमध्ये गेल्यावर सहजपणे हे लक्षात येतं. पण तिथला दुसरा मनुष्य, म्हणजे ते जे नाम आहे, ते मात्र आपलं काम करत राहतं. त्याच्या कामात कुचराई नाही, ते बाहेर चहाला वगैरे गेलेलं नसतं ! म्हणून अज्ञात शक्तीबद्दल एवढं लक्षात ठेवायला हरकत नाही की, ती आपलं काम करते.

नामाच्या चिंतनाचं तिसरं अंग आहे स्थान. नामाच्या ज्ञात-अज्ञात अशा शक्ती आहेत, तसं नामाचं आपल्या जीवनामध्ये जाणवणारं, दिसणारं स्थान असतं. आता नाम न घेणारे कित्येक लोक आहेत. ते म्हणतात की, त्यांच्या जीवनात नामाला कुठं काय स्थान आहे, त्यांचं बरोबर आहे. पण त्यांच्या नावाला स्थान आहे ना ? तसंच नामालापण आहे. दारावरची लावलेली पाटी काढली तर चालेल का ? आपलं बँक अकाऊंटवरचं नाव पुसलं गेलं, तर आपल्याला असं चालणार नाही. कारण त्याची गरज आहे ना ! आपल्याकडनं आपल्या नावाचा पुरावा म्हणून रेशन कार्ड, पॅन कार्ड, ॲड्रेस प्रूफ यांची मागणी होते की नाही ? कारण त्याच्यावर आपलं नाव असतं, त्या नावाचा काहीतरी अर्थ असतो, त्या नावाचं एक स्थान असतं. तर, असं जे आपल्या नावाला स्थान आहे, तसंच नामालापण स्थान आहे.

हे सगळं विश्व ज्यानं निर्माण केलेलं आहे आणि जो सगळ्याच्या

मागं उभा आहे, त्याच्या शक्तीचं प्रतीक म्हणजे नाम आहे. त्यामुळं नामाला स्थान आहे. नाम ही परमेश्वराची वसती आहे. म्हणून नामाला अर्थ आहे, जसा माझ्या नावाला अर्थ आहे. तरी मनुष्य आपल्याबद्दल म्हणतो की नाही, काही अर्थ राहिला नाही नावाला. पण भगवंताच्या नामाला कायम अर्थ आहे. व्यावहारिक नावाचा अर्थ आणि भगवंताच्या नामाचा अर्थ यांतला हा फरक लक्षात घ्यावा. आपण कुठल्याही देवतेचं नाव घ्या, गणपतीच्या नामाला अर्थ आहे, तसाच स्वामींच्या नामाला अर्थ आहे, संतांनी सांगितलेल्या नामाला अर्थ आहे. तो तसाच आहे आणि तसाच राहतो. कारण तो शाश्वत आहे.

आपल्याला चिंतनच करायचं ना, मग माझ्या जीवनात नामाला किती स्थान आहे, ते आपण बघू. कुठं धार्मिक कार्य असेल, तर त्या वेळेलाच फक्त कुणी नाम घेत असेल. कुणी रोज पाच माळा, दहा माळा असं नाम घेत असतील. असं आपल्या जीवनात धुगधुगीपुरतं, गरजेपुरतं का होईना, नामाचं स्थान असेल. प्रत्येकाच्या जीवनामध्ये नामाचं असं वेगवेगळं स्थान असू शकेल. श्रीमहाराजांच्या दृष्टीनं नामाला जे स्थान असेल, ते आपल्या जीवनामध्ये नामाला असेल का ? असं विचारलं की, फरक लक्षात येतो, म्हणून ते समोर ठेवायचं.

श्री तुकोबांच्या जीवनात 'हेचि निजध्यासन नाम तुझे'. श्रवण, मनन, ज्ञान - असं सगळं त्या नामाला स्थान आहे. आपल्या जीवनात नामाला किती स्थान असू शकतं, याचं संत म्हणजे आदर्श उदाहरण आहेत. मग त्यांच्या आनंदाचं प्रमाण, माझ्या आनंदाचं प्रमाण, याचा मी घेतलेल्या नामाशी कसा संबंध आहे, हे लक्षात येतं. माझ्या जीवनामध्ये अनेक ॲक्टिव्हीटींना-कर्मांना दिवसामध्ये स्थान आहे. त्यात नामाला एक स्थान आहे. माझं काहीही झालं तरी नाम बुडलेलं मला चालत नाही, असं आपलं

होतं का ? नाही होत. काही अडचण आहे ना, गडबड आहे ना, मग देवाची पूजा राहू देत, आज नाम राहू देत, उद्या घेऊ. हे आपलं नामाचं स्थान आहे.

पण संतांकडे नामाचं स्थान पहिल्यांदा असतं. नंतर त्यांची कामं सुरू होतात. असं व्यवहारात आपण करू शकतो. निदान आपल्या आयुष्यातलं नामाचं स्थान किती, हे ओळखायला तरी काय हरकत आहे ? मग तेवढं आपण बघू. समजा, मला एक ठरावीक जप करायचा आहे, तो झाल्याशिवाय माझी बाकीची कामं सुरू होत नाहीत. अहो आपण कॉम्प्यूटर ऑन केल्यावर ताबडतोब स्क्रीनवरती सगळं येऊन दिसायला लागतं का ? नाही, कारण त्याला दिलेल्या क्रमानं एकेक प्रोग्राम इन्स्टॉल होत असतात आणि त्यासाठी काही मिनिटांचा, सेकंदांचा वेळ तो कॉम्प्यूटर पूर्णपणे बूट होण्यासाठी घेतो. तेवढ्या वेळात तुम्ही काय करता ते मला माहीत नाही. पण मला मात्र केशवाय नमः, नारायणाय नमः अशी चोवीस नावं आठवतात. तो कॉम्प्यूटरपण एकेक प्रोग्रामचं नाव घेत बूट होतो. नामाला असं तेवढं तरी स्थान माझ्या जीवनात आहे का ? माझ्या दिवसाची प्राथमिक सुरुवात नामानं झाली, तर नाम काम करील काहीतरी. मग सगळे प्रोग्राम इन्स्टॉल होतील आणि मग दिवसभर फंक्शन करतील बरोबर. सगळे प्रोग्राम इन्स्टॉल नाही झाले तर, कॉम्प्यूटर फंक्शन करत नाही दिवसभर, हो की नाही ? कॉम्प्यूटर एवढं आपल्याला शिकवतो. तेवढं तरी आपण शिकून घ्यावं.

आपल्या जीवनात नामाला मुळात पहिल्यांदा स्थान कसं आलं ? एखादा कुणीतरी सांगतो म्हणून, आपण एखाद्या डॉक्टरकडं जाऊन औषधोपचार करतो. एका ठरावीक दुकानातच विशिष्ट वस्तू आहे, हे सांगितल्यावर त्या विश्वासानं त्या दुकानात जाऊन ती वस्तू आणतो. तसंच नाम आपल्या आयुष्यात सुरुवातीला असंच कुणीतरी सांगितलं म्हणून, कुणाचा तरी शब्द आहे म्हणून, कुठंतरी वाचलं म्हणून, अभंगात लिहिलं म्हणून, सांगणारा

खात्रीचा होता त्याच्या खात्रीवर, अनुभवावर कुठंतरी विश्वास ठेवला म्हणून, असं नामाला सुरुवातीला आपल्या जीवनात स्थान मिळतं.

ते कुणावर तरी अवलंबून असलेलं, त्याच्या सामर्थ्याच्या बाबतीत त्याच्यावर अवलंबून असलेलं, एक स्थान असतं. एक ॲक्टिव्हीटी म्हणून पाच माळा, दहा माळा करायला सांगितल्या म्हणून केलं, एवढंच स्थान, याच्यापेक्षा नाही. कुणी जन्मतःच नामाचं प्रेम घेऊन आला आहे, नामाच्या सगळ्या सामर्थ्याची जाणीव घेऊन आला आहे, ही फार सुकृताची गोष्ट आहे. पण असं क्वचितच असू शकतं.

आता हे स्थान कसं कसं बदलत जाऊ शकेल किंवा काय काय त्या स्थानाच्या बाबतीत करता येईल ? दुसरं काही करण्यापेक्षा नाम घेणं चांगलं म्हणूनसुद्धा करावं. नुसतंच काहीतरी विचार करत राहण्यापेक्षा निदान नाम घेणं तरी करावं. जी सकाळपासून रात्रीपर्यंत काम करणारी माणसं आहेत, त्यांच्या व्यतिरिक्त जी एरवीच्या व्यापामधली माणसं आहेत, गृहिणी आहेत, त्यांना अशा तऱ्हेचा विचार करायला भरपूर वेळ मिळतो. तो वेळ जरी निदान नामाला लावला, तरी आपल्या जीवनातलं ते स्थान नामाचं असू शकेल. एखादा अभ्यासानं करत नसेल पण धर्मग्रंथात सांगितलं म्हणून, धार्मिक कृत्य म्हणून करत असेल, तसंसुद्धा त्याचं स्थान असेल. प्रत्येक धर्मात नाम सांगितलं आहे बरं का ! 'डिव्हाइन नेम इन इंडियन ट्रॅडिशन ' या पुस्तकात सर्व धर्मातल्या नामांचा अभ्यास केलेला आहे. प्रत्येक धर्मामध्ये आपापल्या पद्धतीनं नामस्मरणाची साधनं आणि तशी नामं असा तौलनिक अभ्यास आणि त्यांचे अनुभव त्या पुस्तकात दिले आहेत. जिज्ञासूंनी ते पुस्तक अवश्य वाचावं.

एरवीच्या इतक्या गडबडीमध्ये माझा परमेश्वराशी असलेला संबंध माझ्या लक्षात राहत नाही. त्याची मला जाणीव व्हावी, आठवण व्हावी

म्हणून असंसुद्धा माझ्या जीवनात नामाला स्थान असू शकतं. खरं सांगायचं तर, आपल्याकडं गडबडीमध्ये लक्षात राहण्याची यंत्रणा आहे. संध्याकाळी बाहेरून घरी परतल्यावर घर जवळ आलं की, लक्षात येतं की, आपल्याला सकाळी जे काम सांगितलं होतं, ते आपण विसरलो. ते कुणीही आईनं, पत्नीनं किंवा मुलांनी सांगितलं असेल. ते नाही केलं आणि जर त्याचे मोठे परिणाम होणार असतील, तर मनुष्य परत मागं फिरून जाऊन ते काम करतो. तर त्या कामाला जे स्थान आहे तेवढंसुद्धा कदाचित नामाला माझ्या आयुष्यात आलं नसेल, तर मग मला भगवंताचं स्मरण कसं रहावं ?

आपल्याला कामाची आठवण व्हावी म्हणून आपण रिमाइन्डर लावून ठेवतो, गजर लावतो, कुणाला तरी फोन करायला, मिस्ड कॉल द्यायला सांगतो. तसं नाम हा मिस्ड कॉल समजा फारतर. समजा बाहेर गेल्यावर मला घरी सांगितलेलं काम आणि नाम या दोन गोष्टी लक्षात ठेवायच्या आहेत. तर, कुठली गोष्ट सहजपणे लक्षात राहील, असा प्रयोग करून बघावा. म्हणजे आपल्या जीवनात नामाचं कितपत स्थान आहे, ते लगेच लक्षात येईल. मनुष्य तेवढा हुशार, ओळखायला तत्पर आहे. संतांनी नामाचं स्थान कोणतं असायला पाहिजे, हे सांगितलेलं आहे. आपल्याकडं कोणतं स्थान आहे, याचाही प्रयोग करून बघावा. नामात प्रयोगाचा संबंध आहेच.

एखाद्याच्या आयुष्यात त्याला नामाशिवाय राहता येत नाही, इथपर्यंत नामाचं स्थान असू शकतं. आपण श्री गुरुदेव रानडे यांचं चरित्र वाचलं असेल. श्री गुरुदेव श्री शंकराचार्यांना भेटायला गेले. त्या दोघांमध्ये जी चर्चा झाली, त्यामुळं श्री शंकराचार्यांना त्या भेटीचा खूप आनंद झाला. म्हणून त्यांनी श्री गुरुदेवांना विचारलं की, उद्या याल का ? त्यावर श्री गुरुदेव म्हणाले, नामानं जर सोडलं, तर मी उद्या येईन ! ते माझ्या हातात नसतं !

त्यांच्या जीवनामध्ये नामाचं स्थान काय असेल, याची कल्पना आणून देणारी ही घटना खूपच मौलिक आहे. नाहीतर, शंकराचार्य म्हणताहेत, तर आत्ताच, उद्या किती वाजता येऊ ते सांगा, इतक्या तत्परतेनं आपण विचारलं असतं. कलेक्टर, मंत्री किंवा पंतप्रधान यांची भेट मिळावी, म्हणून मनुष्य आधीपासून किती धडपडतो, त्यात दहा माणसं मध्ये घालून भेटीचे प्रयत्न करतो.

असं जिथं सत्तेचं स्थान असतं, तसं श्री शंकराचार्यांसारख्या सत्तेच्या स्थानालासुद्धा, मी नामाच्या ताब्यात आहे, मला नामानं सोडलं तर मी येईन, असं सांगण्यापर्यंत महत्त्वाचं स्थान माणसाच्या जीवनात नामाला असू शकतं. हे श्री गुरुदेवांच्या उदाहरणावरून स्पष्ट होतं. त्यांच्या नामाचं प्रमाण आणि त्यांच्या आयुष्यात नामाला असलेल्या स्थानाचं महत्त्व यांचं प्रमाण इतकं असू शकतं की, ते नाम घेत नाहीत, तर ते नामाच्या ताब्यात आहेत. नामानं सोडलं तर ते व्यवहार करायला बाहेर येतात. मग ते श्री शंकराचार्यांसारख्यांना भेटायचं असलं, तर तसाच व्यवहार करतात आणि कोणा साधकाला भेटायचं असलं, तरीही तसाच व्यवहार करतात.

श्री गुरुदेवांची भेट घ्यायला बाहेरगावची साधक मंडळी आली. त्यामुळं त्यांना नामातून उठवलं. तेव्हा श्री गुरुदेव त्या साधक मंडळींना म्हणाले की, अरे, तुम्ही माझ्या साधनावर दरोडा घातलात. म्हणजे माझी तीन तास जपाला बसायची वेळ आहे. अशावेळेला तुम्ही आलात. नामात असणाऱ्याला मधून न उठवता, थोडं तास दोन तास थांबून नंतर भेटता आलं असतं. असे पर्याय या घटनेमधून श्री गुरुदेवांना सुचवायचे आहेत. यावरून नामाला त्यांच्या जीवनात किती परमोच्च स्थान होतं, ते आपण लक्षात घ्यावं.

आपण मात्र उगाच अनुकरण म्हणून तसलं काही व्यवहारात करू नये. कुणी भेटायला आला तर, मी नामाच्या ताब्यात आहे, असं काहीतरी

म्हणण्यात काय अर्थ आहे ? आपण माडीवर वरती बघितल्यावर एकदम शेवटच्या पायरीवर उड्डाण करतो का ? आपल्याला कसं शक्य आहे ? आपण वर पाहतो की, पायऱ्या किती आहेत आणि एक पायरी वर चढतो. असंच करतो ना आपण ? म्हणून आपण श्री गुरुदेवांसारख्या संतांच्या उदाहरणाकडं लक्ष ठेवावं. ती शेवटची पायरी आहे. तिकडं वर बघत एकएक पायरी चढत राहावं. तोपर्यंत मात्र व्यवहारात आपल्याकडं कुणी भेटायला आलं तर, आलेल्याला नमस्कार करून त्यांचं स्वागत करावं, आणि मग तो गेल्यावर पुन्हा नामाला लागावं.

श्री गुरुदेवांकडून शिकून घ्यावं आणि एक पायरी पुढं जावं. श्री गुरुदेवांच्या जीवनामध्ये नाम घेऊन घेऊन अशी स्थिती निर्माण झाली. आपण श्री गुरुदेवांसारखं नुसतंच वागायला गेलो, तर आपला सगळा व्यवहार आपल्याला तसा पेलता आला पाहिजे. नुसताच नामाचा आव आणण्यात अर्थ नाही. पण शिकत राहिलो तर नामाचं स्थान मात्र आपल्या आयुष्यात बळकट होत जाईल. श्री गुरुदेवांसारख्यांना मात्र बाजूचा सगळा व्यवहार त्याच पातळीवर तोलण्याचं सामर्थ्य नामानं मिळालेलं आहे. त्यांनी नामाला एवढं स्थान दिलं आहे, म्हणून ते नामाच्या ताब्यात आहेत. अशा व्यक्तीच्या बाबतीत श्री शंकराचार्यही काही म्हणाले नाहीत आणि त्यांचा श्री गुरुदेवांबद्दल गैरसमज पण झाला नाही, उलट आदर वाढला. ही एक उच्च पायरी आहे.

आपण या घटनेवरून एवढं लक्षात ठेवावं की, भगवंताचं स्मरण म्हणून, माझी रोजची ॲक्टिव्हीटी म्हणून - अशा कितीतरी प्रकारानं टप्प्याटप्प्यानं मनुष्यानं जर नामाचा अभ्यास केला, तर तो कधीतरी इथपर्यंत मजल मारू शकतो.

आपला नामाचा संबंध कसा आला, हे चिंतनाचं पुढचं अंग आहे. आपला नामाचा संबंध कुठंतरी कुणाच्यामुळं असा आला. काहीतरी कारण

घडलं, वेळ होता म्हणून चुकून कीर्तनाला गेलो आणि तिथं काहीतरी कानावर पडलं. कोणी सत्पुरुष आले होते, त्यांना भेटायला गेल्यावर सहज विषय निघाला आणि ते सांगत होते, ते कानावर आलं. कुणीतरी घरात आणून ठेवलेलं टेबलावरचं पुस्तक उघडलं आणि वाचायला मिळालं. त्यात लिहिलं आहे आणि अनुभवपण दिला आहे. तर, आपण विचार करून बघायला काही हरकत नाही. गैरसमज होऊ देऊ नका, खरं सांगतो, पण मुलांनाच सध्या नामाची, अध्यात्माची गोडी लागलेली आहे. त्यांच्याकडं याची पुस्तकं आहेत. तर मुलानं ठेवलेलं पुस्तक चुकून वडिलांनी किंवा आजोबांनी वाचलं, अशी सध्याची स्थिती आहे, असं म्हणू वाटलं तर ! अशाप्रकारे सहजपणे आपला नामाचा संबंध आलेला असतो. कदाचित माझं हित या नामानं होईल, म्हणून आपण विचारपूर्वक नाम निवडलं असेल. त्यासाठी मी तार्किक, वैचारिक बाजूंनी त्याचा उलगडा करून घेतला. इतरांना जो अनुभव आला, तो मी पारखून बघितला आणि मग माझी खात्री पटली. नामाचा संबंध कदाचित असा स्वनिर्मित असू शकतो.

एखाद्या ग्रंथात लिहिलेलं आहे की, ' ॐ नमः शिवाय ' या श्रीशंकराच्या नामानं मनुष्य तरून जातो. म्हणून आपण ते नाम विश्वासानं घेतो. असे कित्येक लोक आहेत - अगदी उच्च साधक, या विश्वासानं नाम घेत उद्धरून गेले आहेत. अशा वेगवेगळ्या प्रकारे आपला नामाचा संबंध आलेला आहे. त्यामुळं माझी नामाशी कशी गाठ पडली, याचं चिंतन करता येईल.

दोन मित्र बरेच दिवसांनी एकमेकांना भेटल्यावर त्यांच्या आठवणींना उजाळा देतात की नाही की, त्यांची गाठ चुकून कशी बसस्टँडवर झाली, किंवा कुणामुळं झाली. तसं मला चिंतन करता करता आठवण होईल की, पाच - दहा वर्षांपूर्वी कुठल्यातरी निमित्तानं नामाविषयी समजलं आणि मी

नाम घ्यायला लागलो. सर्वसाधारणपणे सामान्य किंवा मध्यमवर्गीय माणसांचा कशाच्या तरी निमित्तानं नामाशी संबंध आलेला असतो.

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी दृष्टांत दिला त्याप्रमाणं मनुष्य चालत असताना अडखळला, खाली वाकून पाहिलं तर चिंतामणी हातात आला. तशी आपली नामाची गाठ, अडखळलेल्याला चिंतामणी मिळावा, अशी पडलेली असते. चुकून कुणाच्यातरीमुळं, कानावर पडलं म्हणून असा संबंध असेल. मग त्याचं महत्त्व जाणवेल. कष्टानं मिळवलं असतं तर त्याचं कौतुक करता येईल. पण ही सहजपणे पडणारी गाठसुद्धा परमेश्वरी कृपेमुळंच पडते, एवढं मात्र लक्षात ठेवावं.

स्वनिर्मित संबंधात नामाविषयी जिज्ञासा होती, म्हणून मी शिकत गेलो आणि माझा नामाशी संबंध आला. ही खूप चांगली गोष्ट आहे. पण असं खूप कमी लोकांच्या बाबतीत घडू शकतं. पूर्वजन्मीचं सुकृत घेऊन आलेली ती माणसं असतात. आता स्वनिर्मित संबंध हे काही अहंकाराचं कारण नाही. पण स्वनिर्मित संबंधाची बुद्धी होणं हे मात्र दुर्मीळ आहे. ती बुद्धी अमुक एक ठरावीक वर्षानं होईल, असंही नाही. ही बुद्धी झाली, याचा अर्थ, त्याची पूर्वपुण्याई सांभाळली गेली आणि म्हणून ग्रंथातून समजून घेता आलं. कुणाकडं जाऊन समजून घेता आलं. स्वनिर्मित संबंध आपल्याला पूर्वपुण्याईची आठवण करून देईल. आता पूर्वपुण्याई जगायची कशी आणि जगवायची कशी ? मला काल घडलेलं लक्षात राहील, याची खात्री नाही. सकाळी सांगितलेल्या कामाचं संध्याकाळी काय होतं, ते आपण बघितलंच. अशी आपली अवस्था आहे. ही पूर्वपुण्याई तर सूक्ष्मातली आहे. काय पूर्वजन्मात कुणाची तरी सेवा घडली असेल, देवदर्शन घडलं असेल, काहीतरी झालं असेल. तर ही पुण्याई कुणी सांभाळून ठेवली आणि ती या जन्मात कुणी आणून दिली, असा जर विचार केला तर लक्षात येईल की, स्वनिर्मित

संबंध वगैरे काही नाही आहे, ही केवळ परमेश्वरी कृपाच आहे. म्हणून मला तशी बुद्धी झाली. म्हणून नामाची जिज्ञासा होऊन मी शोध घेतला आणि नाम घ्यायला लागलो. असाही नामाशी संबंध असू शकतो.

नामाचं पुढलं चिंतन आहे प्रयोग. नामाचे लिखित जप, वैखरी जप आणि मौनजप असे तीन प्रकार आहेत. या तिन्ही जपाचे प्रयोग करून बघावेत. जप लिहिल्यानं काय होणार आहे, याचं उत्तर जप लिहिल्यावरच कळतं. वास्तविक, लिखित जप म्हणजे अक्षरंच आहेत. जप लिहायचा म्हणजे वही, पेन यांवर मात्र अवलंबून रहावं लागतं. जप लिहीत असताना आपण आपल्या कानांनी तो ऐकतो, डोळ्यांनी पाहतो, हातांनी लिहीत जातो. अशी सगळी इंद्रियं एकत्र येतात आणि चित्त एकाग्र होतं. जप लिहिताना मनुष्य तल्लीन होऊन जातो. त्याचं जे भरकटणारं मन आहे, त्याला अस्तित्व आहे की नाही, अशी शंका निर्माण व्हावी, अशी मनुष्याची परिस्थिती जप लिहिताना होते. हा अनुभव येऊ शकतो.

मौनजपात मन कुठं भरकटेल, सांगता येत नाही. पण लिखित जपात मात्र सगळी इंद्रियं एका ठिकाणी एकत्र होतात. मन भरकटण्याला कुठं वावच नाही. डोळे बंद करून मौन जपाला बसलं की, जीवनाचा सगळा चित्रपट समोर उभा राहतो. लिखित जपात हातातलं लिखाण सोडून कुठं जाता येत नाही, पेन खाली ठेवता येत नाही. त्याशिवाय पुढचं अक्षर लिहिलंच जाऊ शकत नाही. माणसाला काही पर्यायच नसतो. अशा तऱ्हेनं माणसाला लिखित जपात गुंतवून ठेवणं आणि मग चित्ताचा अनुभव पाहाणं, हा प्रयोग आहे. मौनजपाची तरीसुद्धा फार मोठी तारीफ आहे. पण लिखित जपात चित्ताला असा अनुभव येतो, म्हणून त्याची तारीफ करायची.

वैखरी जपाचाही प्रयोग आहे. आपल्या हातात नसलेल्या असंख्य गोष्टी आपल्या कानावर आदळतात. अशावेळी आपण केलेला वैखरी जप

आपल्या कानांनी ऐकण्यासारखा मार्ग नाही. घरामध्ये मनुष्य भांडताना आपण होऊनच मोठमोठ्यानं बोलायला लागतो. तसंच कुणी ऐकत नसेल, तर मनुष्य आवाज वाढवतो की नाही ? म्हणजे तो काय करतो नेमका, तर त्याचा आवाज एवढा मोठा ठेवतो की, बाकीच्यांचे आवाज त्याच्या कानावर पडू नयेत, अशी त्याची व्यवस्था असते त्यात. मग साहजिकच बाकीचे गप्प बसतात. तसंच बाकीचे नको असणारे आवाज कानावर येतातच ना ? मग वैखरी जप का करू नये ? बाकीच्या आवाजांपेक्षा देवाचं नाव तरी कानावर पडेल. आपण बघितलंच की, प्रत्येक जपामध्ये काहीतरी मर्म ठेवलं आहेच. एकवेळ डोळे बंद करता येतात, पण कानाला बंद ठेवण्याची तरतूद नाही ना ! म्हणून वैखरी जप स्वतः म्हणत स्वतःच्या कानांनी ऐकण्यासाखा मार्ग नाही.

तिसरा करण्यासारखा प्रयोग मौनजपाचा होय. मौनजप सर्वोत्तम प्रकार आहे. यात काही प्रश्नच नाही. प्रत्येक जपामधली असलेली उपाधी गाळून ठेवलेला आणि वैखरी आणि लिखित जपाच्याही पुढं जाणारा हा प्रकार आहे. सिद्ध मंत्राचे प्रयोग आहेत. स्वतः सिद्ध केलेल्या मंत्राचे प्रयोग आहेत. स्वतः अनुभव घेऊन निर्मिलेल्या मंत्राचे प्रयोग आहेत. साक्षात्कार झालेल्या मंत्राचे प्रयोग आहेत. श्री गणोरे बाबा यांना साक्षात्कार झालेला मंत्र ' ॐ हरिराम विठ्ठलाय नमः' हा आपण नेहमी म्हणतो. विशेषतः संतांनी सांगितलेल्या नामावर श्रद्धा ठेवून घेतलेल्या नामाचे प्रयोग आहेत. गुरूपदिष्ट नामाचे प्रयोग आहेत. काहीजण ' श्रीराम जयराम जयजय राम ' ऐवजी ' ॐ श्रीराम जयराम जयजय राम ' म्हणतात. त्यांना अनुभव आहे की, मागं ॐ लावल्यानं मूळ जपाचं सामर्थ्य अधिक वाढतं. याबद्दल स्वामी रामदास यांचा अनुभव पहावा. आपण प्रयोग करून बघावा की, आपल्या चित्ताची स्थिती कशानं पालटते. आपल्याला ज्यामुळं अधिक चांगलं वाटतं ते करावं.

शेवटी हे प्रयोग आहेत ना ? श्री बाबा बेलसरे नेहमी म्हणत, परमार्थात प्रयोगशील असावं. आपल्याला प्रयोगाचा अनुभव येतो. नित्योपासनेच्या मार्गानं प्रयोग आहेत, एकांताच्या मार्गानं प्रयोग आहेत. काही काळ स्वतःच्याच संगतीत असावं. जे एकटेच राहतात, त्या लोकांचा काही प्रश्न नाही. पण घरामध्ये चार माणसं आहेत, नोकरी किंवा व्यवसाय आहे, त्यांनी काही काळ एकांतात नामस्मरणाचा सरावा ठेवावा, व्यवहारानं करावा, अगदी अव्यवहारानं घरातून कुठं निघून जावं, असं नाही. एरवी फिरायला आपण बाहेर जातोच, त्याऐवजी घरी सांगून एखाद्या देवळात, ज्या ठिकाणी कोणी येत नाही, अशा ठिकाणी जाऊन बसावं. मग तिथं शांत चित्तानं नामाचं काय होतं, ते बघावं. असे आपण नामाचे कोणते प्रयोग केले आणि त्याचा काय अनुभव आला, हे कळावं म्हणून हे प्रयोग करायचेत.

स्वनिर्मित, स्वयंशोधित, अनुकरणातून घेतलेलं, गुरूपदिष्ट असे कितीतरी नामाचे प्रयोग सांगितले आहेत. ते प्रयोग वेगळे असू शकतात. नामाचे प्रयोग करून जे अनुभवतात, त्या त्या अनुभवानुसार त्याच्या बाबतीत जे श्रेष्ठ ठरलं, ते त्याच्यात्याच्या बाबतीत त्याचं नाम असू शकतं. शेवटी सर्व नामं ही त्या भगवंताचीच आहेत. पण माझ्या मनाच्या ठेवणीप्रमाणं मला ते अधिक आवडतं, म्हणून एवढे नामाचे प्रकार आहेत. यात नाम काही कमी- जास्त नसतं, तर मी कमी-जास्त असतो, वेगवेगळा असतो.

एखादं नाम उदाहरणार्थ, दत्ताचं नाम खूप पॉवरफुल-शक्तिमान आहे आणि रामाचं कमी शक्तिमान आहे, असं काही नसतं. प्रत्येक नामाचं सामर्थ्य सारखं असतं. माझ्या मनाची जी ठेवण, जी स्थिती तिला अधिक काय लागू पडतं, हा प्रश्न आहे. ते आपापल्या पद्धतीनं प्रयोग करून ठरवता येईल किंवा विचारून, ठरवून करता येईल. एखाद्याला विचारलं की, तुला कुठला देव आवडतो, तर पटकन मनुष्य नाव घेतो की, गणपती आवडतो

किंवा दत्त आवडतो. त्याची आवड ही त्याच्या मनाच्या ठेवणीप्रमाणं आलेली असते. स्वाभाविकच ते नाम त्याला अधिक चांगला अनुभव देतं.

आपला शेवटचा मुद्दा आहे अनुभवाचा. अनुभवाबद्दल काय सांगायचं ? कारण अनुभवात फक्त अनुभव घ्यावा एवढंच बोलता येतं. म्हणून अनुभवच घेऊन बघावा, यापेक्षा जास्त काही नाही. नामाचा प्रयोग करून प्रत्यक्ष घेतलेला अनुभव, हा एक भाग झाला. आणि दुसरा, नामाचे इतरांनी सांगितलेले अनुभव हा एक भाग आहे. नाम काय अनुभव देतं, आपल्याला कोणते अनुभव आणून देतं, कशावरून समजायचं की, नाम अनुभव देत आहे आपल्याला ? असे प्रश्न पडणं अगदी स्वाभाविक आहे. माझ्या चिंता कमी झाल्या का, काळजी कमी झाली का, चित्ताला शांतता आली का, साक्षीभाव आला का, घडलेल्या घटनेकडं तटस्थतेनं बघण्याची वृत्ती आली का - असे सगळे नामाचे अनुभव आहेत.

आपल्या आयुष्यात अनेक प्रसंग घडतात, अनेक गोष्टी आपण पाहत असतो, अनेक गोष्टी कानावर येत असतात. अशावेळेला माणसाच्या चित्ताची किंवा मनाची स्थिती कशी राहू शकेल, यावरून त्याला नामाचा कितपत अनुभव आला, ते समजू शकतं. मग कळतं की, त्यानं किती नाम घेतलं असेल आणि किती घ्यायची गरज असेल. मनुष्य उपाधींपासून हळूहळू सुटत जातो. हे नामाच्या अनुभवाचं लक्षण आहे.

एखाद्या गोष्टीवर वस्तू टिकत नाही, ती सटकते. तसं श्रीमहाराज म्हणतात त्याप्रमाणं, नाम उपाधी टिकू देत नाही. नाम घेणारा मनुष्य जबाबदारी, जबाबदारीनंच पार पाडेल, पण ज्या उपाधी आहेत, त्यापासून मात्र बाजूला होईल. उपाधी म्हणजे ज्या गोष्टी मूळ गोष्टीला जोडून आहेत, पण त्या मी केल्या नाहीत तर चालण्यासारख्या आहेत, त्या उपाधीत मोडतात.

शिक्षणाची गरज आहे. डिग्रीची गरज आहे पण गरजेसाठी मूळ

डिग्री पुरेशी आहे. पण आपण अशी माणसं पाहतो की, दहा डिग्री मिळवल्यावरही अकरावी डिग्री मिळवावीशी वाटते. पण त्या माणसाला जर नामाचा अनुभव असेल, तर तो विचार करेल की, या डिग्रीची जरूर नाही, पुरे झालं शिक्षण, की डिग्रीची उपाधी थांबली.

वाचन ही एक उपाधी होऊन बसते. मनुष्य आयुष्यभर वाचनच करत राहतो. त्याचं त्यापुढं नाम घ्यायचं राहूनच जातं. पण तोच मनुष्य नाम घेणारा असेल, तर त्याचं अकारण वाचन थांबेल. तसंच त्याचं अकारण पहाणं थांबेल, अकारण फिरणं थांबेल, अकारण विचार करणं थांबेल. नामामुळं हे थांबू शकतं. हा नामाचा अनुभव आहे. एवढं नक्की की, चित्ताला येणारी शांतता, आनंद, निरुपाधिकता, साक्षीभाव हे सगळे नामाचे अनुभव आहेत. अशा तऱ्हेनं आपल्यासमोर नामाचा काहीतरी अनुभव असावा, आपल्याला नामाचा अनुभव यावा, अशी प्रार्थना करूया.

नाम घ्यावं हे बरोबर आहे. इतर चिंतन थांबत नाही म्हणून नामासंबंधी चिंतन करावं. ते कसं करावं याविषयी आपल्यासमोर काही विचार ठेवण्याचा या वचनामध्ये प्रयत्न केला आहे. मनात विचार येत नाही, मन निर्विचार होतं आणि नाम होतं, ही फार थोर स्थिती आहे. जेव्हा ती स्थिती येते त्यावेळेला नामाची आवश्यकता संपते, असं समजायला हरकत नाही.

जितकं नाम चांगलं होईल, तेव्हा कधीतरी अशी स्थिती येऊ शकेल, पण तोपर्यंत याची खात्री पटवून देणारा एखादा अनुभव येऊ शकेल. तो काही फार मोठा - पाच मिनिटं, दहा मिनिटं असा नाही. पण एक किंवा दोन मिनिटं किंवा खरंतर काही सेकंद, यापुरतासुद्धा येऊ शकतो. त्याचा फायदा हा की, नामाचा अनुभव येतो हे खरं आहे, याची त्यामुळं खात्री पटू शकते. आपल्या मनाचं सगळं चिंतन कधीतरी तरी थांबू शकेल, याचीही खात्री

पटवणारा तो अनुभव असतो.

आणि चिंतनच करायचं तर, आपल्याला ज्याच्यावर चिंतन करायचं त्यावर चिंतन करता येईल, अशाही तऱ्हेची खात्री देणारा हा अनुभव असतो. एरवी चिंतन कशावर करायचं, हे आपल्या हातात नाही. किती काळ चिंतन करायचं, हे आपल्या हातात नाही. ते चिंतन कधी थांबणार, हे पण आपल्या हातात नाही. अशी आपली अवस्था असते. आणि म्हणून तर नाम घ्यावं म्हणजे त्यानं हे सगळे प्रश्न मुळापासून सुटतात.

हे सांगण्यासाठीच संतांनी नामाचा इतका आग्रह धरला आहे. नामामुळं आत्तापर्यंत पाहिलं तसं, नामाचं चिंतन घडून खऱ्या, शुद्ध नामापर्यंत पोचता येईल. अनुभवानं खात्री होईल. नामाबद्दल आवश्यक चिंतन होईल. नामाचं आयुष्यातलं स्थान वाढेल. हळूहळू अनुभवाची, खात्रीची, चिंतनाची ओढ थांबेल. नामानं अंतरंग व्यापून जाईल. व्यवहार व्यवहारानुसार सुरू राहील. आपण मात्र स्थिरपणे नामासाठी जगत राहू. त्यामुळं आतून सदैव आनंदात राहू. त्यासाठी हे 'असाल तेथे नामाचे चिंतन' उपयोगी पडो, ही भगवंताच्या चरणी प्रार्थना !

(उत्तरार्ध : निरूपण क्र. १३)

।। श्रीराम ।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. २५/१०/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. १२ * निरूपण : क्र. १४

परमार्थाचे नुकसान जेवढे मनाने केले
तेवढे शरीराने कधीच केले नाही.

(निरूपण - पूर्वार्ध)

नाम घेणार, गाथा वाचणार, सत्संगाला येणार ! केव्हा ?
जरा मोकळा होताच देवा तुमची सेवा करणार ! ।। धृ ।।
शिक्षण झाले , उद्योग केले । नोकरीसाठी अर्ज केले।
चिकटलो की कुठेतरी । चणचण सारी संपणार ।
आणि जरा मोकळा होताच देवा तुमची सेवा करणार ! ।।१।।
काट्यावरचे काम माझे । घरीदारी सदा ओझे ।
लग्नानंतर शेअरिंग होईल । व्याप कमी होणार ।
आणि जरा मोकळा होताच देवा तुमची सेवा करणार ! ।।२।।
बायकोपोरे घर भरे । पाहुणेरावळे ताप सारे ।
मार्गी लावले साऱ्यांचे की । व्याप माझा संपणार ।
आणि जरा मोकळा होताच देवा तुमची सेवा करणार ! ।।३।।
कष्ट काळजी सदा वाही । शरीर सारे पिचून जाई ।
मलाच नेती दवाखान्यात । बरा होऊन येणार ।
आणि जरा मोकळा होताच देवा तुमची सेवा करणार ! ।। ४।।
दीन म्हणे तळमळीने । मुद्दल नेले प्रपंचाने ।
दाता राहिला वायद्यावरी । कर्ज कसे फिटणार ?
अशा मधून कोणी काही नाही का हो शिकणार ? ।। ५।।

*

हे म्हणणारं कोण आहे - याचा विचार या वचनाच्या आधारे आपल्याला करायचा आहे. आपण देवाचं करत नाही का, परमार्थ करत नाही का, साधन करत नाही का ? तर करत नाही, असं नाही. पण मी मोकळा झालो की करीन, असं जे म्हणतं, ते शरीर नाही म्हणत, मन म्हणतं आणि त्याचा परिणाम काय होतो - हे लक्षात घ्यायचं आहे.

एखाद्या साधनशिबिराला जायची तळमळ होती, भगवंताची कृपा होती, नशीब होतं म्हणून तो शिबिराला गेला असेल. एखाद्याला काही अडचणीमुळं जाता आलं नसेल. शिबिराला जाऊन आला, तर त्यानंतरचं आजचं काम, आजचा संघर्ष किंवा आजची साधना - त्या माणसाची चुकली आहे का ? त्यावेळेला केलं नाही म्हणून, आता मी करणार नाही असं होत नाही. तुमचं जीवन चालू राहण्यासाठी ते काम तुम्हाला शिबिरातून परत आल्यावर करावंच लागतं. जो मनुष्य शिबिराला गेला, त्यालाही आजचं कर्तव्य लागूच आहे आणि जो गेला नाही त्यालाही लागूच आहे. मनुष्य शिबिराहून परत आल्यावर जेवायचा थांबतो का तर नाही, ते जसं आहे तेच साधनेचं आहे, दुसरं काय आहे ? शिबिरात गेलं तरी साधना करावीच लागते आणि खऱ्या अडचणीनं किंवा सबबीनं गेलं नाही, तरी करावीच लागते.

पण खऱ्या अडचणी असताना न जाणारा आणि वरच्या अभंगातल्या ओळींप्रमाणं खऱ्या अडचणी नसताना केवळ मनाला शिबिराचे कष्ट नकोत किंवा साधनेची मनापासून ओढ नाही, ते तसं कबूलही करवत नाही, म्हणून न जाणारा यांत फरक आहे. अशा वेळी वायदे देण्याचा प्रश्न येतो. तेव्हा पहावं की, वायदा देणारं कोण आहे ? आपलं शरीर वायदे देत नाही. कारण शरीराची यंत्रणा व्यवस्थित कार्यरत असते. मन मात्र वायदे देतं.

परमार्थाचं नुकसान जेवढं मनानं केलं, तेवढं शरीरानं कधीच केलं नाही, असं म्हणण्याचं कारण हे आहे. आता परमार्थाचं नुकसान म्हणजे

साधनेचं नुकसान होय. अकारण आनंद, निरुपाधिक आनंद मिळवणं म्हणजे आपली परमेश्वरप्राप्ती होय. श्रीमहाराजांचं इतकं स्वच्छ म्हणणं आहे. उपाधीच्या आनंदाची आपल्याला कल्पना आहे. काहीतरी कारण घडलं म्हणून आनंद मिळाला. तर अशा निरुपाधिक आनंदाच्या प्राप्तीसाठी घर सोडून दुसरीकडं वेगळं काही करायची गरज नाही. तीर्थयात्रा, क्षेत्रं, दर्शनं, वारी - असं हे सगळं आपल्या उपासनेच्या बळकटीसाठी आहे. आहे त्या ठिकाणी चित्त समाधानात राहणं, हे खरं आपलं मूळ काम आहे आणि तोच परमेश्वर आहे. तो परमेश्वर आपल्याला मिळावा म्हणून काय करावं असं जे सांगतं ते शास्त्र म्हणजे परमार्थ होय. आणि त्याप्रमाणं कृती करणं, हे आपलं साधन आहे. परमार्थाचं नुकसान असं जेव्हा म्हणतो, तेव्हा यामध्ये ' आपल्या स्वतःच्या परमार्थाचं ' या शब्दांवर जोर आहे आणि परमेश्वराकडं जाण्याचा जो मार्ग आहे, त्या मार्गाचं नुकसान - अशी दोन्ही नुकसानं ही शरीरानं केली नाहीत. तर ती मनानं केली आहेत.

प्रथम शरीराच्या बाजूनं विचार करूया. सर्वसाधारणपणे ज्याचं शरीर चांगलं आहे तो मनुष्य म्हणतो हे माझं कामाचं वय आहे, हे माझं उद्योगधंद्याचं वय आहे, शिक्षणाचं वय आहे. शरीराच्या वयाचा संबंध म्हणजे शरीर जन्माला आल्यानंतर ते हळूहळू मोठं होत जाणार आणि ते विशिष्ट वयाला आलं की, त्याची वाढ थांबणार. अशा तऱ्हेनं आपल्या कशाशीही संबंधित नसलेली स्वतंत्रपणे चालणारी अशी ती यंत्रणा आहे. रोज त्याच्यात एकेक दाणा टाकला जातो आहे आणि ते भरलं की, वाहून जाणार असं ठरलेलं आहे. त्यानुसार शरीराचं काम चालू आहे आणि त्याचं काही म्हणणं नाही.

पण अनेकांचं म्हणणं असतं की, विद्यार्थ्याचं वय लहान असल्यामुळं साधना करणं हे त्याचं काम नाही. त्याचं अभ्यासाचं वय आहे, विद्याभ्यास हे त्याचं काम आहे. श्री गुरुदेव रानडे यांच्यासारखे श्रेष्ठ संतपुरुष, जे स्वतः

अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सेलर होते, त्या सर्व संतमंडळींनी विद्याभ्यासाचं काम कधीच नाकारलेलं नाही. त्यांनीही त्यात्या वयात विद्याभ्यास केलेला आहे आणि त्यावेळी लागू असलेली साधनाही केली आहे. आपण मात्र आता अभ्यास आहे म्हणून साधनेला वेळ नाही, असं वर म्हणतो आहोत, हे आपल्या शरीराचं म्हणणं आहे का ? तर नाही. ते आपल्या मनाचं सांगणं आहे. ती आपल्या मनाची समजूत आहे.

कुणी आणि किती साधन करावं, हे सांगणारे सत्पुरुष आहेत ना ? परिस्थिती बघूनच ते साधन सांगतात की, त्या मुलानं एक माळ जप करावा. आता तो मुलगा टीव्हीसमोर बसला की, टीव्हीची चॅनेल सारखे बदलत असतो. तो चॅनेल बदलण्याचा वेळ काढला तर त्या वेळात दहा माळा जप होईल त्याचा. इतका वेळ त्याचा चॅनेल बदलण्यात जातो. घरात चार माणसं, प्रत्येकाला टीव्हीवरचे वेगवेगळे कार्यक्रम बघायचे असतात, ते बघण्यावरून आपापसात भांडणंच होतात. एकाचे दोन टीव्ही, त्यासाठी वेगवेगळे रिमोटसुद्धा असतात. अशी परिस्थिती आहे सध्या. आपला मुद्दा हा की, ही वाया गेलेली मिनिटं बाजूला काढली तर, त्या मुलाच्या विद्याभ्यासाला एक मिनिटाचीही अडचण न येतासुद्धा, त्याला देवाची आठवण ठेवता येईल ना ? मुलानं किंवा त्याच्यावतीनं त्याच्या पालकांनी नामासाठी वयाची अडचण सांगणं, म्हणजे मनाची सबबच नव्हे का ?

आणखी एक विचार करू. नामाला वेळ नाही, कारण ही शिक्षणाची -व्यवसायाची अशी वेळ आहे, असं मन सांगतं. ते ऐकून आपण नाम टाळतो. ते आपल्याला बरोबरही वाटतं. पण त्याच वेळेत आम्ही जे शिक्षण-व्यवसाय करतो, त्याला नाम टाळल्यानं अधिक यश येतं, असं आहे का ? अनुभव पाहूया. त्या त्या वेळी, सगळ्या गोष्टींचे प्रयत्न करूनही त्या गोष्टी होत नाहीत. अगदी नाम टाळून पूर्णवेळ अभ्यास करूनसुद्धा यशाच्या बाबतीत

पन्नास - पन्नास टक्के शक्य आहे, असं म्हणतो ते का ? नामाचा जाणारा वेळ टाळून सर्वस्वी प्रयत्न करतो आहे खरा, मग यशाची खात्री का वाटत नाही ? नामाचा वेळ वाचवूनसुद्धा यशाची खात्री देता येत नाही, आणि खरोखर अनेकदा ते येतपण नाही.

त्यावेळी मात्र म्हणतो, प्रयत्न केलाय खरा, पण आपल्या हातात सगळं कुठं आहे ? बघू काय होतं ते - यश येईल किंवा येणारसुद्धा नाही. अगदी वैद्यकापासून सर्व कलाशास्त्रांपर्यंत जिथं जिथं प्रयत्न करतो, होईल असं वाटतं, पण बघूया काय होतं ते. तर ते बघूया म्हणजे - नेमकं काय बघूया, कुणाकडं बघूया, ते कोण करणार, याचा विचार केला तर, ते बघणारा जो कोण आहे, तो खरा कर्ता आहे - भगवंत आहे, जो नामानं जवळ करता येतो आणि त्यानं तुळशीपत्र टाकलं तर आपल्या प्रयत्नांचं पारडं खाली जाईल - अशीच खरी वस्तुस्थिती आहे.

आपले आपले अनुभव, आपल्या लोकांचे अनुभव पाहून ते ठरवता येतं. मग आता विद्याभ्यासाचं वय आहे, व्यवसायाचं वय आहे, असं सगळं मध्ये आड आणून आपल्याला परमार्थापासून, साधनेपासून बाजूला करणारं, साधनेला वेळ देऊ नको म्हणणारं आपलं शरीर आहे, का असं म्हणणारं मनच आहे ? तर मनच आहे, हे उघडच आहे, म्हणून परमार्थाचं - नामाचं नुकसान, जे मनानं केलं ते, शरीरानं केलं नाही, असं म्हणावं लागतं.

शरीर म्हणतं की, मला भूक लागली, तहान लागली व्यवस्था करा. शरीर तंदुरुस्त ठेवायचं असेल तर, व्यायाम करा. यापेक्षा शरीराचं काही म्हणणं नाही. तुम्ही व्यायाम नाही केलात तरी त्याचं काही म्हणणं नाही. ते म्हणतं ठीक आहे. व्यायाम न केल्यानं लवकर जाईल. काय जे होईल तसं. आजार व्हायचा असेल तर आजार होईल. आता शरीराला गरजेचा असलेला व्यायामसुद्धा करू न देणारं कोण आहे, मनच की नाही ?

आपण नवीन वर्षाचा संकल्प म्हणून एक जानेवारीपासून सकाळी उठून फिरायला जायचं ठरवतो. तर ते कोण ठरवतं ? शरीर नाही ठरवत. शरीराचे नाहीत जानेवारी वगैरे. शरीराला माहीत नसतं मनानं सकाळी पाचचा गजर लावला आहे ते. मनानं गजर लावला आणि मनानंच ऑर्डर दिली हाताला आणि तो बंद करायला सांगितला. आता तर काय प्रत्येक दहा मिनिटांनी अलार्म वाजायची सोय आहे. म्हणून परमेश्वर गजराच्या दर दहा मिनिटांनी आठवण करून देतो की, अरे बाबा तुझी फिरायला जायची वेळ झाली, योगासनांची वेळ झाली, उपासनेची वेळ झाली. पण त्या गजराला हातानं दाबून टाकलं आहे. आता याला हात जबाबदार आहे का ? त्याला मनच जबाबदार आहे. म्हणून परमार्थाचं नुकसान केलं ते मनानं केलं, शरीरानं केलं नाही.

शरीराला ऊठ म्हटलं की, उठायला तयार आहे, मनच म्हणतं झोप अजून. सुरुवातीच्या अभंगाची आठवण त्याच्यासाठीच आहे की, जरा मोकळा होताच देवा, तुमची सेवा करणार, हे कोण म्हणतं आहे ? जरा मोकळा होताच, म्हणजे जणू काय मी आता खूप बिझी आहे ! अहो, कोपऱ्यावर कुणी भेटला, तर तिथं गप्पा मारत अर्धा तास निघून जातो की नाही ? हा अत्यंत कामात असतो म्हणून जपालासुद्धा आता नको बसायला, खूप कामं पडली आहेत समोर, संध्याकाळी बसूया असं म्हणतो. तेवढ्यात फोन सहज म्हणून येतो. पंधरा मिनिटं तो फोन चाललेला असतो. आता काय आड आलं आणि काय आलं नाही ? मग मगाशी गडबड होती. जपाला बसायला वेळ नव्हता, तर तो कुणाला नव्हता ? शरीराचा काही संबंध आहे का याच्याशी ?

शरीराइतकी परमार्थाला मदत करणारी दुसरी वस्तू नाही. ती आहे म्हणून परमार्थ आहे. आपण देह धारण का केला ? पूर्वजन्मातलं माझं अपुरं

राहिलेलं कर्म पूर्ण करण्यासाठी देह धारण करावा लागला. आपल्या संचितानुसार माणसं भेटतात, ती आपल्या आयुष्यात येतात, आपापले कार्यभाग असतात ते करतात, कुणाचं देणं असतं, कुणाचं घेणं असतं, एवढाच फरक असतो. तो व्यवहार ते करतात आणि आपल्या आयुष्यातून निघून जातात. म्हणून आपल्याला जे पन्नास टक्के कर्मस्वातंत्र्य ठेवलं आहे, त्यामध्ये जास्तीत जास्त चांगली कर्म करायचा प्रयत्न करायचा. हे जो करेल त्याचा उद्धार आहे. जो करणार नाही त्याचं फक्त प्रारब्ध फिटेल. उरलेल्या पन्नास टक्के काळात बेसावधपणे केलेल्या कर्मांचे भार पुन्हा निर्माण होतील आणि पुन्हा तो त्यासाठी जन्म घेईल.

मनुष्याचा परमार्थ साधावा म्हणून त्याला सर्वांत मोठी मदत जर कुठली मिळाली असेल, तर ती शरीराची मिळाली आहे. समजा एखाद्याचं देणं फेडायचं आहे, तर ते फेडायला तो मनुष्य प्रत्यक्षात पाहिजे. आकाशातून थोडाच चेक येणार आहे ? इथूनच एकमेकांना देणार ना तुमच्या हातानं ! जे व्हायचं असेल ते इथूनच होणार. मग देणारा-करणारा हा शरीरधारीच असावा लागतो ना ? माणसाला दुःख देणारं, सुख देणारं, कुणासाठी काम करणारं, समाजासाठी, घरासाठी, नातेवाईकांसाठी राबणारं - शरीरच असतं ना शेवटी ?

थोडक्यात मनानं सगळा कचरा करावा आणि शरीरानं तो झाडून काढावा, असं काम चालू आहे. मन कचरा निर्माण करतं. पण मनानं जर ठरवलं तर ते मन कचरा काढायचंसुद्धा काम करतं, हेही तितकंच खरं आहे. पाचचा अलार्म लावून शरीराला ऊठ म्हणणारं हे मनच आणि तेच अलार्म बंद करून अर्ध्या तासानं उठूया म्हणणारं पण तेच मन आहे. सगळे नियम विसरणारंही मनच आहे. शरीराचं काही म्हणणं नाही. पाचचा अलार्म लावून उठायचं ठरलं तर ते उठेल आणि त्याला जे व्यायामाचं, उपासनेचं, जपाचं

काम दिलं असेल ते काम शरीर करेल. 'मग जरा मोकळा' - असं शरीराचं नाही. म्हटलं तर आता मोकळं आहे. आणि नाही म्हटलं तर कधीही अडकलेलंच आहे. कुठल्याही क्षणी, आता या क्षणीसुद्धा मनुष्य मनानं इथं असेलच असं नाही. त्याच्या मनात जे विचार असतील त्याप्रमाणं तिथं मनुष्य मनानं असेल. बिझी आहे म्हटलं तर बिझी आहे. म्हटलं तर इथंच आहे. ते शेवटी मनुष्याच्या मनावरच आहे ना ? मग सगळं फिरून येतं कोण आणि इथंच जागी एकाग्रतेनं बसतं कोण, याचा विचार करावा.

वास्तविक, मनानं केलेला कचरा राहिला म्हणून तो पुरा करण्यासाठी शरीराची केरसुणी दिली आणि झाडून काढा, असं काम सांगितलं आहे. अनेक संबंधांचं हे काम राहिलं आहे. चांगल्या अर्थानं, वाईट अर्थानं - दोन्ही पुरे करावेच लागतात. चांगले संबंध असले तरी पुरे करावे लागतात आणि चुकीचे संबंध असतील आणि देणं असलं तर, तेही भागवावंच लागतं. म्हणून माणसांच्या एकमेकांच्या गाठीभेटी होतात. त्या गाठीभेटी पूर्ण करण्यासाठी शरीराची मदत दिली आहे. म्हणून एखादा मनुष्य एखाद्यासाठी राबतो, का राबतो कळत नाही. एखादा एखाद्याला दुःख देतो, कारण कळत नाही. तरीसुद्धा दुःख होतं. काहीतरी असलं पाहिजे, त्याशिवाय तो दुःख देणार नाही. काहीतरी असलं पाहिजे, त्याशिवाय मनुष्य उगीच मदत करणार नाही. या सगळ्याचा उलगडा परमार्थशास्त्रानं व्यवस्थित करून ठेवला आहे. आणि त्यानुसार घडताना दिसतं. त्याचा अनुभव आपण घेऊ शकतो.

मग या अनुभवामध्ये मला दिलेल्या स्वातंत्र्याचा उपयोग करून शरीरानंच मला ती कर्मं करता येतील. प्रत्येकाला तेवढं पुरेसं शरीर दिलेलं आहे. त्याच्या सहाय्यानं आपलं राहिलेलं काम पुरं करून मनुष्याला मुक्ती गाठता येते. मात्र काम पूर्ण करणं मनाकडं आहे. आपण घरात म्हणतो की नाही, यांच्या मनात यायची खोटी आहे, मग काय इकडचं जग तिकडं

करतील ! पण ते जर मनात नसलं तर काहीच करणार नाहीत. उद्या करू, परवा करू, मी नाही म्हटलं आहे का, करायचंच आहे आपल्याला, असल्या असंख्य गोष्टी ते मन सांगतं. असा हा सगळा मनाचा कारभार ओळखून, मनाच्या बाबतीत सावध राहावं.

परमार्थाचं म्हणजे साधनाचं नुकसान करणारं मनच आहे. आता नुकसानीमध्ये दोन गोष्टी असतात की, कळलेलं नुकसान आणि एक न कळलेलं नुकसान. दुसऱ्या दोन गोष्टी असतात की, नुकसान आपल्याबद्दल झालेलं आणि सर्व परमार्थाच्या एकूण क्षेत्राचं झालेलं. तर हे मनानं केलेलं नुकसान आहे. आता इथं जे परमार्थाचं दुसरं नुकसान म्हटलं आहे ते नुकसान दोन गोष्टींना लागू आहे. एक आतापर्यंत साधनेचं झालेलं नुकसान जर आपण आठवून पाहिलं तर आपल्या लक्षात येईल की, ते त्या मनानंच केलं आहे. त्या मनानं ठरवलं की, माझं अर्जंट काम आहे. त्यामुळं माझा परमार्थ चुकला, माझं देवदर्शन चुकलं. मनानं ठरवलं की, नाही यापेक्षा मला हे दुसरं काम महत्त्वाचं आहे आणि त्यासाठी मला गेलं पाहिजे. म्हणून ते तसं केलं तर तिथं साहेबानं अर्धा एक तास बसवून ठेवलं. गडबड आहे, आता वेळ नाही, थोड्या वेळानं या. तिथं तासभर शांत बसलं. वेटिंग ! काही इलाज नाही. पण तुमचं पाच मिनिटांचं देवदर्शन हुकवलं या मनानं, त्या अर्जंट कामासाठी. आपल्या लक्षात येईल की, आतापर्यंत माझं झालेलं नुकसान आहे, त्याला शरीर जबाबदार नव्हतं.

शरीराबद्दल मला का सांगायचं आहे ? कारण अनेकांच्या शरीराबद्दल कल्पना आहेत. अनेक माणसं शरीराची कारणं पुढं करतात. माझं शरीर असं आहे, म्हणून मला परमार्थ करता येत नाही, साधन करता येत नाही, देवदर्शनाला जाता येत नाही, मला जप करता येत नाही. कारण मी आता परस्वाधीन झालो, अमूक झालो, तमूक झालो. परमार्थात शरीराइतक्या

तक्रारी कशाच्याही नसतील. एकवेळ पैशाचीसुद्धा तक्रार मनुष्य करणार नाही. पण शरीराची मात्र तक्रार करतो. मांडी घालून बसलं की, माझं लक्ष लागत नाही. परमेश्वरानं कुठं सांगितलं, मांडी घालून बसा म्हणून ? मांडी घालता येत नाही तर खुर्चीवर बसा. त्याच्या कृपेनं आणि दयेनं एका खुर्चीच्या ऐवजी चार खुर्च्या घरामध्ये आहेत. जपाला बसायला एकच पुरते. तुम्हाला बसवत नसेल तर उभं रहा, उभं राहवत नसेल तर चालत फिरा. परमेश्वरानं किती सोय करून ठेवली आहे. समजा शरीराची अडचण आहे बसण्याची, मला बसून नाम होत नाही. परमेश्वर म्हणेल झोपून नाम घे. आता आडवा राहिलो, शरीराची अडचण नाही, नाम घेता येतं. पण आडवं झाल्यावर, मला झोप लागली तर ? त्याची जबाबदारी आता कुणावर ? परमेश्वर याच्यापेक्षा किती सोय करणार ? निदान अंथरुणावर आडवं पडून राहिलात, तरी जप होईल, एवढी व्यवस्था त्यानं केली. आता बेसावध राहून, झोप लागली तर काय - असं म्हणतं ते मन आहे, ते नुकसान करतं, झोप लागू देतं. शरीर नाही ते करत, ते आडवं राहायला तयार आहे.

मनुष्याला रात्री दोन वाजता जाग येते. तीन वाजेपर्यंत तो विचार करत बसतो. कशाचा विचार करतो - काल काय झालं, किंवा दहा वर्षापूर्वी काय झालं, कधीपण वीस वर्षापूर्वी काय झालं, असे वाटेल ते विचार त्या दोन ते तीनमध्ये करतो. पण अशावेळेला काही मनात विचार येत नाही की, आता बाबा झोप येत नाही, तर आपल्या उशाशी माळ आहे, तर ती घ्यावी आणि असले निरुपयोगी विचार करण्यापेक्षा जप करावा. पण अनेकांच्या बाबतीत असं होतं, उशाशी आहे कुठं माळ ? झोपण्यापूर्वी ती डबीत घालून देवासमोर ठेवलेली असते ! ती इतकी 'सुरक्षित' ठेवली असते की, दोन ते तीनमध्ये ती उपयोगाला येत नाही. त्यात, त्यावेळेला देवासमोर जाणं बरं वाटत नाही. माळ जपासाठी आहे की, पूजेसाठी आहे ? वाटलं तर पूजेसाठी

एखादी वेगळी माळ देवासमोर ठेवावी !

आपलं साधन नाम आहे म्हणून नामाची पूजा म्हणून आपण माळेचीसुद्धा पूजा करतो, हे बरोबर आहे. पण वापरायची असू देत की एक माळ. आपण झोपण्यापूर्वी उशाशी ठेवावी.आपल्याला अशी पाच दहा रुपयांची माळ घेणं शक्य आहे. नसेल तर एखाद्याला मागितली तरी तोसुद्धा देईल, परमेश्वर आपण होऊन देईल, इतकी त्याची व्यवस्था आहे. मग आता दोनला जाग आली तर लाईट्स् लाव, पाणी पी, नाहीतर दूधच पी, काहीतरी खा - असला कुणालातरी त्रास निर्माण करण्यापेक्षा, माझ्या उशाशी माळ आहे, शांतपणे बसून जप करू. बरं, नामाचा एका अर्थानं इतका ' गुण ' चांगला येतो की, गोळी घेऊन एकवेळ झोप लागणार नाही, अशी झोप लागते माणसाला ! तीनपर्यंत जप करायचा म्हटला तर, अडीच वाजताच झोप येईल. बघा तुम्ही प्रयोग करून. थोड्यावेळानं डोळे पेंगायला लागतात. आणि समजा, नाही पेंगले तर नाम झालं, परमार्थाचा फायदा झाला. आणि डोळे पेंगले तर कामच झालं आपलं. झोपच पाहिजे शरीराला. झोपेची वेळ आहे, तर झोप घ्यावी. म्हणजे या साऱ्यात किती प्रकारानं, कोणत्या प्रकारानं, शरीरानं काही तक्रार केलेली नाही.

खरं सांगायचं तर, असं म्हातारपणी अनेकवेळेला होतं. रात्री आपोआप दोन वाजता, तीन वाजता काय पाच वाजता जाग येते. शेवटी शरीराच्या या अडचणी आहेत, त्याला काय करणार ? पुढं पुढं झोप कमी होत जाते. बारा बारा वाजेपर्यंत झोप लागत नाही. समजा, पाचला जाग आली मग उठून सगळ्यांना जागं करून त्रास देण्यापेक्षा छान जपाला बसावं. सकाळी सहा, सात वाजले की, इतर लोक उठतातच. त्यांना त्याची कामं आहेत. त्यांना उठणं भागच आहे. मग ते उठले की, आपलं आवरणं सुरू करावं. तास दोन तास जप करत बसलं, तर शरीराचं काही म्हणणं आहे का,

काही म्हणणं नाही. काही तक्रार नाही.उलट आपल्याच मनाला वाटत असतं, आपण कसे लवकर उठलो पहा, किती झोपा काढताहेत हे सगळे ! मग जप तर राहिलाच, उगाचच खुडबुड करून त्यांना उठवायचे उद्योग मन करतं. म्हणून ओळखावं की, शरीरानं नुकसान नाही केलं, मनानं नुकसान केलं आहे. तर त्या मनाकडं जेवढं लक्ष देता येईल, तेवढं आपलं साधन होईल. म्हणून परमार्थात शरीराची तक्रार करू नये.

आपला प्रवास खरोखर जन्मानं सुरू झाला आणि मृत्यूनं तो संपतो. आज दुर्दैवानं एक बातमी ऐकायला मिळाली. पंढरपूरला श्री वरदानंद भारती म्हणजे आप्पा आठवले यांचे पन्नाशीत असलेले चिरंजीव चंद्रशेखर हृदय विकारानं अकाली वारले. त्यांनी सत्कर्मामध्ये राहून उपासनेचं व्रत पत्करलं होतं. त्यांना ही श्रद्धांजलीच आहे. विशेष सांगण्यासारखं असं की, त्यांच्या मुलानं एवढं झाल्यावर निर्णय घेतला की, उद्या एकादशीचे सर्व कार्यक्रम ठरल्याप्रमाणं होतील.

आता मला सांगा मनानं फायदा केला आहे की नुकसान केलं आहे, काय केलं आहे ? मनानं काही केलं नाही ! मन तुमचा फायदा करून द्यायला तयार आहे. पण आपणच त्याला मोकळं सोडलं आहे. म्हणून ते तसं नुकसान करतं. आता आमच्याकडून एकादशीचे कार्यक्रम होणार नाहीत, असं म्हणणं अवघड होतं का ? नाही. सांभाळलं कुणी पांडुरंगानं सांभाळलं. मग त्याचं स्मरण बाजूला ठेवून आपली कामं बंद ठेवावीत का ? तर नाही. तर मनाची एवढी तयारी आहे की, एकादशीचे सर्व कार्यक्रम - काय कीर्तन, प्रवचन, भजन, पूजन जे असतील ते ठरल्याप्रमाणं होतील. एवढं होऊ शकतं. मनानं नुकसान केलं आहे की फायदा केला आहे, ते आपण ठरवावं. आपण आपल्या मनाला ओळखावं. यात शरीराची काही तक्रार आहे का ?

कितीतरी वेळेला शरीराची तक्रार सांगितली जाते. मला बसवत

नाही, उठवत नाही, भूक लागत नाही, लक्ष लागत नाही. अशा तक्रारी असतात. त्यात लक्ष लागण्याचेसुद्धा किती प्रकार आहेत. एका जागी बसून लक्ष लागत नाही तर, एका जागी बसू नका. तुमचं लक्ष फिरून लागत असेल तर, फिरून लागू द्या. या सगळ्या तक्रारी मनानं निर्माण केलेल्या आहेत. काही काही वेळेला अशा क्रिएटेड-निर्माण केलेल्या सगळ्या अडचणी आहेत. अनेकांची तक्रार असते, जपात लक्ष लागत नाही. अनुग्रहाच्या वेळी उपदेशात असं सांगितलं आहे का की, लक्ष लागत नसेल तर जप करू नका. जप केल्यानंतर तुमचं लक्ष लागायला लागेल, असं सांगितलं असेल एकवेळ. पण लक्ष लागलं तर जप करा, असं नाही सांगितलं. कारण ती अशक्य गोष्ट आहे हो ! म्हणजे हे तुमचं गुणपत्रक, हा रिझल्ट आहे तो घ्या आणि तुम्ही अभ्यासाला लागा. असं कसं म्हणता येईल ? प्रथम अभ्यासाला लागा, परीक्षा झाली की, मग कळेल किती गुण मिळाले ते. नामच आपली एकाग्रता वाढवणार आहे, आपलं लक्ष लावणार आहे. मनानंच त्या परमार्थाचं नुकसान केलं आहे, शरीराची काही तक्रार नाही.

शरीराची तक्रार करण्यात काही अर्थ नाही. का, तर माझे जे संबंध राहिले ते मी पुरे करण्यासाठी जन्माला आलो. ते मी जर व्यवस्थित पुरे केले तर 'पुनरपि संसारा येणे नाही' इतकी खात्री दिलेली आहे. त्यासाठी ते मला कसे पुरे करता येतील, मला किती सावध रहावं लागेल, नवीन बेसावध कर्मांची भर न टाकता कसं राहता येईल, असं हे करण्यासाठीच मी आलो ना ? मग ते करायला शरीरासारखं वाहन नाही. या प्रवासाला इतकं अत्युत्तम वाहन नाही. तुमच्या प्रवासाला कशाही स्थितीत मदत करू शकणारं शरीरासारखं दुसरं वाहन नाही. हा फरक का सांगायचा आहे तर, बाहेर वाहनं असतात. समजा, तुम्हाला बाहेरगावी जायचं आहे आणि त्यासाठी तुम्ही एक वाहन ठरवलं आणि ते नाक्यावर गेल्यावरच बंद पडलं. काय

त्याच्यात फॉल्ट आला असेल, पेट्रोल संपलं असेल - असं काहीतरी झालं असेल. तर असं बिघडलेलं वाहन तुम्हाला परगावी पोचवू शकेल का ? तो फॉल्ट काढल्याशिवाय ते तुमचं काम करू शकणार नाही.

पण शरीराची कशीही आडवी - तिडवी - बिघडलेली परिस्थिती असली तरी, तुमचा परमार्थ त्यामुळं नडत नाही. यापेक्षा वाहनाचं श्रेष्ठत्व ते काय असणार की, जे कोणत्याही स्थितीत असलं तरी ते तुमचं जे गंतव्य स्थान गाठण्याचं काम आहे, ते गाठून देऊ शकतं ! एवढं सामर्थ्य त्याच्यात ठेवलं आहे आणि प्रत्येकाच्या उद्धाराला पुरेल, एवढं आयुष्यपण ठेवलं आहे. अशा तऱ्हेनं शरीर बंद पडत नाही कधी. माणसानं त्याचं उद्धाराचं दिलेलं काम केलं नसेल, तो सावध झाला नसेल, भगवंताचं वेळेत स्मरण केलं नसेल किंवा तो भगवंताचा मार्ग चालला नसेल, तर वाहन बंद पडलं, असं त्याच्याबाबतीत होऊ शकतं. पण ते वाहन बंद पडलं म्हणून त्याचा प्रवास बंद पडला, असं कधी होत नाही. शरीर कोणत्याही स्थितीत असलं तरी ते माणसाला मुक्तीपर्यंत पोचवेल, असं वाहन आहे. प्रवास अपुरा राहिला, वाहनाची मुदत संपली तरी दुसरं वाहन मिळण्याची व्यवस्था आहे. तेव्हा आता शरीर नुकसान करणार नाही, एवढं नक्की लक्षात घ्यायला हरकत नाही !

या वचनाचा अर्थ आणखीही व्यापक आहे, पण तो आपण पुढच्या वेळेला बघू.

।। श्रीराम ।।

(पूर्वार्ध : निरूपण क्र. १४)

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. ०८/११/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. १२ * निरूपण : क्र. १५

परमार्थाचे नुकसान जेवढे मनाने केले
तेवढे शरीराने कधीच केले नाही.

(निरूपण - उत्तरार्ध)

आपण विश्वात्मकाच्या आरतीत म्हटलं, 'कधी थबकलो नाही घेण्या, तुमचे दर्शन ' कोण थबकलं नाही ? तेच मन थबकलं नाही. कितीतरीवेळा आपण देवळापुढून जातो. पण काही वेळेला थांबतो, काही वेळा बाहेरूनच नमस्कार करतो, काही वेळा आत जातो, दोन मिनिटं बसतो. काही वेळेला समाधान होईपर्यंत बसतो. शरीर काहीच म्हणत नाही. तुम्ही निघून गेलात, तरी शरीर तयार आहे. थबकला तरी तयार आहे. आत जाऊन बसायचं म्हटलं तरी तयार आहे. सर्व दुःख, चिंता, काही विषय - सगळं नष्ट होईपर्यंत बसायचं म्हटलं, तरीसुद्धा शरीर तयार आहे. त्यामुळं शरीरानं नुकसान नाही केलं, मनानं नुकसान केलं.

'तुका म्हणे शेष घेईन आवडी ' हे म्हणणारं मनच आणि मोडणारंही मनच आहे. आपण विचार करू, ज्यावेळेला शेष घेईन आवडी, असं आपण म्हणतो, त्यावेळेला काय होतं ? संपूर्ण सकाळभर स्वैंपाक करून शेवटी नैवेद्य दाखवतो आणि मग जेवतो, नाही का ? मनुष्य दोन तीन तास स्वैंपाक करतो. जास्तीत जास्त वस्तू, जास्तीत जास्त चांगल्या वापरतो, पण हे सगळं शरीरानंच करतो ना ? शरीरच देवापुढं नैवेद्य नेऊन ठेवतं, पाणी फिरवून शरीरच नैवेद्य दाखवतं, आणि नंतर मग तोच नैवेद्य, आपण शरीरानंच खातो.

पण मन जर चांगलं असेल तर ते स्वतः जेवण्यापूर्वी म्हणतं, बाहेर

कुणी जेवायचं आहे का ? आपल्याला माहीत असेल, पूर्वी आपल्याकडं अशी पद्धत होती. त्याप्रमाणं पशू, पक्षी, अतिथी या सगळ्यांचा विचार करून केळीच्या पानांच्या तुकड्यावर थोडं थोडं अन्न वाढीत आणि त्याचा नैवेद्य दाखवून बाहेर ठेवीत.

आजच्या आपल्या काळामध्ये आपण नैवेद्य दाखवला, तर त्याचं काय होईल - तर एक प्रारब्ध आणि आपले प्रयत्न त्याप्रमाणं त्या नैवेद्याचं काय ते होईल. मग तो दाखवलेला नैवेद्य बाहेर नेऊन ठेवल्यावर ते कुत्रं, मांजर, गाय खातं की नाही, त्याचा योग्य विनियोग होतो की नाही, हे बघणं काही आपलं काम नाही. अन्न वाया घालवू नये, पण कुणासाठी काढून ठेवावंसं वाटतं आहे, ही भावना आहे ना बघावी. काढून ठेवण्याचा प्रकार, विनियोग कदाचित त्या त्या घराप्रमाणं, गावाप्रमाणं वेगवेगळा होईल.

आता दिल्यानंतर जे राहतं ना, त्याला शेष म्हणतात. शेष लहान की मोठं हा प्रश्न नाही ! आता दिलंच नसेल तर शेष कुठून येईल ? आज सगळंच खावंसं वाटतं. म्हणजे आजचं मन सगळं खाऊ इच्छितं, म्हणून परमार्थाचं नुकसान होतं. आपण इन्कमटॅक्स भरतो ना ? सरकारनं कायदा केला आहे, त्यामुळं भरलाच पाहिजे. मग मिळालेल्या भेटींच्या उत्पन्नासह सगळं जे उत्पन्न मिळालं, त्याचा हिशोब करून ॲट सोर्स कर कापतात आणि उरलेलं उत्पन्न आपल्या हातात ठेवतात. जे राहिलेलं आहे, ते आनंदानं खा, म्हणतात. असं आपलं सरकार हे तुकोबांचं अभ्यासक असलं पाहिजे ! तुकोबांनी आपल्याला आधीपासूनच सांगितलं आहे, जे ज्याचं आहे, त्याला ते द्या आणि मग राहिलं ते तुमचं, ते शेष आहे, ते तुम्ही खा.

हे शेष प्रकरण काय आहे ? आत्ता आपण पाहिलं तसं, अन्न मिळवून खातो हे बरोबर आहे. त्यासाठी वेळ, कष्ट, पैसा - सगळं खर्च करतो हेही बरोबर आहे. पण याचा अर्थ त्या सगळ्यावर आपली संपूर्ण मालकी आहे,

असा होत नाही. आपण पेरलं, उगवून आलेलं खाल्लं. पण सगळं खाल्लं तर, ते उगवून आणणाऱ्यांचं काय ? ते आपण थोडंच केलेलं असतं ? असं इतर बाबतीत पाहिलं, तर प्रत्येक बाबतीत असं आढळेल. नोकरी प्रामाणिकपणे केली, पगार मिळाला, तो स्वकष्टाचाच आहे. तो सगळा खाणं - प्रपंचासाठी वापरणं, हे वरवर पाहता किती रास्त वाटतं ! पण ज्या संस्थेनं पगार दिला, ती काय आपण स्थापन केली का, ती आपण चालवतो का, तिला नफ्यात आपण आणली का, त्यात हवा,पाणी, माल, वस्तू, ग्राहक - असे असंख्य घटक त्या पगाराच्या मागं हातभार लावतात ना ? त्यांचं ऋण जाणीव ठेवून फेडणं, हे आत्यंतिक गरजेचं आहे. तेच प्रसादानं साधतं. त्यामुळं उरलेल्या या घटकांचं पोषण होतं, ऋण फिटतं, मग उरलेलं शुद्ध होतं. ते शेष ठरतं. ते ग्रहण करण्यात दोष लागत नाही.

आता हे अन्नातलं, तसं माणसातलं, तसं परिस्थितीतलं, आपल्या परीक्षेतलं, यशातलं, बाहेरचं - सगळीकडं हे जो शेष म्हणून खाईल, त्याला प्रसाद आहे. जो माझं कर्तृत्व म्हणून खाईल, त्याला दुःख आहे. कारण मी एवढे प्रयत्न करून एवढंच झालं, एवढे प्रयत्न करून असंच वाट्याला आलं, एवढे प्रयत्न करून माणसं अशीच वागतात, वगैरे वगैरे. हे सगळं का, तर ते शेषही नाही आणि प्रसादही नाही. ते भगवंताला दाखवलेलं असलं म्हणजे तो प्रसाद झाला. नाहीतर अन्न आणि प्रसादामध्ये काय फरक आहे ? अन्न अन्नच आहे. ताटात वाढलं आणि देवासमोर ठेवलं म्हणजे प्रसाद झाला. दिल्याच्या भावनेनं त्याचा प्रसाद झाला. नाहीतर काय, ते आपलं भोजनच आहे. उदरभरण नोहे असं नुसतं म्हणून त्यालाच पुढं यज्ञ समजायचं, एवढंच. काय करतो दुसरं त्यापेक्षा. हे दाखवलेलं असलं म्हणजे तो सगळा प्रसाद झाला. तर अशा भावनेनं करणारं कोण आणि स्वतःच शिजवून सगळं नुसतं स्वतःच खाणारं ते कोण, तर ते मनच आहे.

हे त्याला करू न देता प्रसाद दाखवला आणि शेष खाल्ला, तेव्हा परमार्थ झाला. तर त्याच मनानं तो करता येतो. शरीरानं यातलं काहीच केलेलं नाही. तुम्ही सांगितलं आणि शरीरानं ते देवासमोर ठेवलं. त्याचं काही म्हणणं आहे का की, तुम्ही हे घेऊन जा किंवा जाऊ नका, काही नाही. गोग्रास ठेवायला, देवासमोर ठेवायला त्याचं काही ऑब्जेक्शन आहे का ? तर तसं काही झालेलं नाही. शरीरानं नुकसान कधीच केलं नाही.

शरीराला सांगितलं - केलेल्या स्वयंपाकाचं ताट भरा, देवासमोर ठेवा आणि देवाला नैवेद्य दाखवा. तुमची जी नैवेद्याची पद्धत असेल त्याप्रमाणं दाखवा. पाणी फिरवलं, नाही फिरवलं, नुसता नमस्कार केला तरी नैवेद्य पोचला. ते केल्याबरोबर आता ते भगवंताचं अन्न झालं. आता ते जे झालं त्याचा आपल्याला जसा विनियोग करता आला, तसा करावा.

पूर्वी मूठ-भिक्षेची साधी पद्धत होती. एखादी झोळी किंवा पिशवी टांगून ठेवत आणि त्यात आपली एक मूठ टाकायची मग स्वयंपाकाला सुरुवात करायची. आधीच नैवेद्य दाखवला, मग शेष झाला. असा नैवेद्य दाखवला किंवा असा एखादा मनुष्य जेवून तृप्त झाला तर तो शेष झाला. मग शेष झाल्यावर प्रसादाला दोषच नाही. एरवी असा नैवेद्य नाही दाखवला, तर आमच्या अन्नाला दोष आहे.

आता तर भौतिक दोषसुद्धा विचारात घेण्यासारखे आहेत. अन्नावर रसायनांचा फवारा, ते कधीचं असेल, त्यावर काय काय प्रक्रिया केल्या असतील, ते सांगता येत नाही. असं अन्न धुऊन घ्यावं लागतं. भौतिकदृष्ट्या साफ करून घ्यावं लागतं. तर यात शरीर कुठंही आडवं आलं नाही. ते नैवेद्य दाखवायलाही आडवं आलं नाही आणि उचलून कुणा कुत्र्याला, मांजराला बाहेर नेऊन ठेवायला किंवा कुणा माणसाला, कुणा गरीबाला, ज्याला गरज असेल त्याला द्यायला-शरीर कुठंही आड आलं नाही. ते असं नाही म्हणालं

की, हे नको द्यायला किंवा अमक्याला नको द्यायला. मलाच गडबड झाली, मला नैवेद्य दाखवायला सवड नाही झाली, अशी परिस्थिती आहे. त्यामुळं ती गडबड झाली असेल ती मनालाच. म्हणजे नुकसान केलं असेल तर मनानंच केलं, शरीरानं केलं नाही.

आजवर इतकी सगळी नुकसानं आहेत ती घडतात आणि मग म्हातारपणी मनुष्य म्हणतो माझं लक्ष लागत नाही, माझं चित्त स्थिर नाही, आता मी कसं करू, इतकी वर्षं आपण हे कधी केलं नाही. त्याचं मूळ कारण आपल्या मनाकडंच आहे. आपल्या शरीरानं वेळ नव्हता किंवा ते नाकारलं, असं झालं आहे का ? त्याला म्हटलं हे कर आणि त्यानं केलं नाही, असं झालं आहे का ? त्या शरीरानं हिमालयाचे कडे, सह्याद्रीचे कडे चढून जाण्यासारख्या अवघड गोष्टी केल्यात. मग परमार्थाच्या कामात कुठले कष्ट आहेत ?

शरीराला साधं नैवेद्याचं ताट उचलून देवापुढं ठेवायचं असतं. किती वाढतो, आपलं आपल्याला माहीत आहे. मुळात ताट कुठलं ताटलीच असते. पूजेच्या सुपारीसारखी अवस्था. त्या एवढ्याश्या ताटलीत ते एवढं एवढंसं वाढणार आणि देवासमोर नेऊन ठेवणार. आता यात मुळातच किती कष्टाचं आणि केवढं काम करायचं आहे ? पण त्याच्यामागं नैवेद्याचा, प्रसादाचा भाव आल्यामुळं, त्याचं सगळं स्वरूप लगेचच बदललं. त्यातलं प्रत्येकाच्या पानात थोडंसं वाढायची पद्धत आहे. शेष घेईन आवडी आणि जे शेष मिळतं ते आवडीनं घ्यायची पद्धत आहे. मग प्रपंचाचा एवढा मोठा स्वयंपाक केला आहे त्याच्यात काहीतरी शेष राहिलं ना, तर ते आवडीनं घ्यावं. ते शेष आवडीनं घ्यायला म्हटलं तर मनाची मदत आहे. म्हटलं तर मनाची अडचणही आहे. एवढं करून असंच कसं झालं, असं पण म्हणता येतं. आणि एवढं केलं, आता हे परमेश्वरानं वाट्याला दिलं, किती छान

आहे, प्रसाद आहे, आनंदानं खावं. श्रीमहाराज म्हणायचे तसं प्रसादातला कडू बदाम. प्रसादाला बदाम ठेवल्यानंतर एखाद्याच्या वाट्याला कडू बदाम येतो. कुणाला येईल काय सांगता येतं ? प्रसाद म्हणून जसा गोड बदाम येईल, तसा कडूपण येईल. पण कुणाच्याच वाट्याला रोज असा कडू बदाम येणार नाही. जास्त कडू आले तरी, एखाद्या दिवशी चुकून का होईना, गोड बदाम लागणारच. इतपत तरी परमेश्वराची व्यवस्था आहे.

आपण नैवेद्य दाखवल्यावर आपल्या वाट्याला चटणीच येईल असं नाही. जे कराल त्यातलं गोडपण येईल. अशी सगळी यंत्रणा आहे. फक्त हे भगवंताचं आहे आणि त्याला नैवेद्य दाखवण्याचा प्रश्न आहे. आणि ही भावना असली तर ती मनालाच आहे. नाहीतर भगवंताचा काय संबंध ? मी पिकवलं, मी खरेदी करून आणलं, मी शिजवलं आहे . मग तूच कर आणि त्याची तूच फळं भोग. म्हणून प्रपंचाची दुःखमय फळं ज्यावेळेला मिळतात त्यावेळेला एक लक्षात ठेवावं की, आपण भगवंताला तो प्रसाद दाखवलाच नाही. तो दिलाच नाही. त्यातलं शेष म्हणून कधी खाल्लं नाही. त्यामुळं वृत्तीवर परिणाम झाला नाही. म्हणून ती स्थिर नाही.

संतांच्या घरच्या अन्नानं मन शुद्ध होतं म्हणतात. कारण तिथं फक्त प्रसादच मिळतो. आपल्या केलेल्या अन्नाला लौकिकदृष्ट्या प्रसाद म्हणणं वेगळं आणि भावना असणं वेगळं आहे. एखाद्या मनुष्याच्या घरात देवाची मूर्ती असेल-नसेल पण त्याची नैवेद्याची भावना आहे. परान्न घेण्यावर श्री महाराज म्हणाले होते ना की, रोज तुम्ही स्वतःच्या उत्पन्नाचं, स्वतःच्या कमाईचं कुठं जेवता ? रोज ते दुसऱ्याचंच असतं, कोणीतरी पिकवलेलं असतं, कोणीतरी मदत केली असते. कोण पेरतो, काय होतं आपल्याला काही कळत नाही. सगळं दुसऱ्याचं आहे. तशी भावना राहिली तर त्याच्याकडं बघण्याचा दृष्टिकोनच बदलतो. हा कुणी बदलला, हा मनानंच बदलला.

आणि कुणी नाही बदलला तर मनानंच नाही बदलला. याच्यामध्ये शरीराची काही अडचण नाही.

साधनात आधीच झालेलं नुकसान आणि साधनाचं संभाव्य नुकसान या दोन्हीलाही कारण मनच आहे, शरीर नाही. शरीर कोणत्याही अवस्थेत असलं तरी, त्याचं काही म्हणणं नाही. आपल्या वचनातले शब्द जपून वापरलेले आहेत. जेवढं मनानं नुकसान केलं, तेवढं शरीरानं केलं नाही, असं म्हटलं आहे. तर शरीरानं नुकसान होत नाही, असं एकतर्फी आपलं म्हणणं नाही.

शरीरानं नुकसान केलं आहे, नुकसान होऊ शकतं. एखाद्याचं शरीर खूप सुदृढ असतं. कधी आजारपण त्याच्या वाट्याला आलं नाही. अशी माणसं आढळतात. शेवटपर्यंत ते इतके तंदुरुस्त असतात की, त्यांना दुसऱ्या कशाची गरजच वाटत नाही. मी इतका व्यवस्थित आहे, माझ्या आयुष्यात काही चूक झाली नाही आणि चुकण्याची शक्यता नाही, माझी कॅलक्युलेशन्स कधी फेल गेली नाहीत. असे लोक असतात. त्यांना आपला नमस्कार आहे. आता त्यांना ठेचच लागली नाही, तर ते आई कशाला म्हणतील ? ठेच लागली की, डोळ्यांत पाणी येतं आणि तो आई म्हणतो. तसंच परमार्थात किंवा शरीराच्या दृष्टीनं त्यांना कधी ठेच लागलीच नाही, तर त्यांच्या तोंडात देवाचं नाव कसं येईल ? असं हे शरीरानं केलेलं थोडसं परमार्थाचं नुकसान आहे. त्यांच्या सुदृढ शरीरामुळं त्यांच्या आयुष्यात देवाचा प्रवेश व्हायचं काही कारणच पडत नाही. पण समजा त्यांच्या वाट्याला अपघात आला, काहीतरी दुःख आलं, मग शरीरानं नुकसान कसं केलं आहे, कसं करत नाही-याबद्दल कुठं जागं व्हायला होतं, हे कळतं.

शरीरात ज्यावेळेला एखादी वेदना निर्माण होते त्यावेळेला त्या वेदनेकडं लक्ष जातं. वेदना का निर्माण झाली, हे बघावं लागतं. ती कदाचित

औषधांनी दुरुस्त करण्याचे प्रयत्न करावे लागतात. त्या प्रयत्नांनी दुरुस्त होत नाही, असं जर लक्षात आलं तर मग त्याच्या पलीकडं काही मार्ग असू शकेल का ? मग परमेश्वराची आठवण येते, कुठंतरी त्याचं स्मरण होतं. काहींना वेदनेमध्ये छान स्मरण राहतं. स्मरण राहण्यासाठी वेदना असाव्यातच, असंच म्हणायला हवं.

अल्सर झालेल्या एका बाईंचा अनुभव लक्षात घेण्यासारखा आहे. त्या म्हणतात की, पोटदुखी माझ्या मनाची इतकी एकाग्रता घडवते की, त्या वेदनांमध्ये माझं अनुसंधान सर्वात चांगलं राहतं. पोटदुखी हा माझा भगवंत आहे. तिथं सारखं लक्ष ठेवायचं आणि भगवंताचं स्मरण करत रहायचं. पोटदुखी काही थांबत नाही, स्मरणही काही थांबत नाही. उत्तमच आहे साधन त्यांचं ! पण हे जमलं पाहिजे. यात शरीरानं परमार्थाचा फायदा करून दिला. अहो, आमच्या मनाची एकाग्रता त्या पोटामुळं जाते. आपला मुद्दा, सुदृढ शरीरामुळं परमेश्वराची आठवण करावीशी वाटत नाही, हा आहे. याला कारण शरीर आहेच. पण परमार्थाच्या अशा शरीरानं केलेल्या नुकसानाचं प्रमाण त्यामानानं फार कमी आहे, म्हणून शरीरानं नुकसान होत नाही, असं म्हटलं नाही, तर वचनामध्ये मनानं जेवढं केलं, तेवढं शरीरानं केलं नाही, असं म्हटलं आहे.

आता ज्याचं साधन झालं असेल, त्याला साधनाचं नुकसान म्हणजे काय हे कळतं. त्याला मनानं झालेलं नुकसान कळेल. एखाद्या दिवशी जप छान झाला की, कधी एकदा कुणाला सांगू असं होतं. खरंतर आज इतका छान जप झाला, तर अहो अमृत आहे, भाग्य समजून गिळून टाका.

जप वाईट झाला तर ते सांगायला मनुष्य जातो का, नाही जात. मग छान झाला, तर महाराज तुमच्या कृपेनं झाला, असं म्हणत पचवून टाकावा. पण हे सांगायला जाऊन, एवढी झालेली कृपा वाया घालवणारं हे मनच.

मनालाच अस्वस्थता येते की, केव्हा सांगू असं वाटतं. तुमच्या साधनेतल्या माणसाजवळ अगदी खाजगीत हितगुज, मनोगत म्हणून बोललात तर ते ठीक आहे. पण ज्याला जाहिरात करावीशी वाटते आणि असं सांगावंसं वाटतं- तो मग सांगतो, हे कसं साध्य झालं, मी कसं साधन केलं, वाचन, व्यासंग कसा केला, असं मार्गदर्शन करावं, तसं तो सांगतो.

तसंच आपल्याला आलेल्या अनुभवांचे भ्रम आहेत. साधनेनं अनुभव येणार नाहीत, असं नाही. कदाचित तो अनुभव खराही असेल पण बरेचदा भ्रमाचा भागच असतो. आणि त्या भ्रमांनी नुकसान होतं. आणि जर खराच आला, तर तो पुन्हा येईल की नाही, याची चिंता लागते. मनाकडूनच असं नुकसान होतं. आला ना अनुभव, ठीक आहे. वाटेनं चालणारा मनुष्य मैलाचा दगड लागला, तर तो दगड बघत उभा असतो का ? तो पुढं चालत राहतो. वाटेत रिक्शा दिसली म्हणून ती बघत काही मनुष्य थांबत नाही. त्या रिक्शात बसतो, आपल्या ठिकाणी उतरतो आणि रिक्शा सोडून देतो. तेच अनुभवांचं स्थान परमार्थात आहे. परमार्थात अनुभवांचं स्थान मैलाच्या दगडापलीकडं जास्त नाही. एवढं लक्षात ठेवलं, तर मन कसं नुकसान करतं ते कळतं. त्याच अनुभवात रहायचा प्रयत्न केला तर पुन्हा पुनरावृत्तीच्या अपेक्षेत मनुष्य अडकून पडतो.

बरेच जण साधनेमध्ये इतरांशी तुलना करत असतात. त्यातून साधनेची सीनिऑरिटी-ज्येष्ठता असते, अशी समजूत होते. असं काही नसतं. साधन एका क्षणात नाहीसं होऊ शकतं आणि कितीही वर्षं चालू शकतं. कोण केव्हा देव गाठेल, हे सांगता येत नसतं. ते ज्येष्ठतेवर नाही, किती वर्षं साधना केली याच्यावर काही अवलंबून नाही.

उपासनेतले भेद, पंथांचे भेद - मनच निर्माण करतं. वास्तविक, कोणतीही उपासना एकत्व शिकवण्यासाठीच आहे. नाम असू दे, पंथ असू

दे, किंवा काय धर्म असू दे, किंवा बाहेर मनुष्यत्व म्हणून असू देत, सर्व एका पातळीवर आणण्यासाठी सर्व उपासनांचे प्रयत्न चालले आहेत. त्यात शेवटी अद्वैत हा बोध आहे. अगदी गुरूंशीसुद्धा ऐक्य होऊ शकतं. ऐक्य भावानं मनात आलेले विचार कळायला वेळ लागतो का ? तसंच कोणाच्याही मनात आलेले विचार जसेच्या तसे एकमेकांत येतात. आपल्या मनामध्ये आलेले विचार कळायला त्यांना वेळ लागत नाही. हे अद्वैतबोधाचं लक्षण झालं. तेच आपल्या गुरूंशी शिष्याचं असतं. आणि हे करू शकणारं खरंतर मनच आहे. पण त्यांची गोष्ट वेगळी, आमची वेगळी. हे यांचे उपासक, हे त्यांचे उपासक, आडवं-उभं गंध, उपासनेच्या पंथाचा वेगळा रंग - असे हे सगळे भेद मनच निर्माण करतं. त्यातून कनिष्ठ - ज्येष्ठ हा मनाचाच कारभार आहे. असं हे झालेल्या साधनाचं नुकसान आहे.

आता साधनाचं संभाव्य नुकसान पाहू. आपल्या दृष्टीनं अजूनही साधन व्हायचं आहे. पण त्याच्यातसुद्धा, ते आपल्याला खूप कठीण आहे, असं वाटतं. आता कुणी ठरवलं की, ते साधन कठीण आहे ? आपणच कुठंतरी वाचतो आणि आपल्याला अशी एकाग्रता येणं वगैरे कठीण आहे, असं वाटतं. अभ्यास केल्यावर वर्षभरानंतर गुणपत्रक, प्रशस्तिपत्रक हातात पडायचं आहे, तर ते वर्षाच्या सुरुवातीलाच ठरवल्यासारखं होईल. मनाची एकाग्रता, मनाचं निर्विचार होणं ही अक्षरशः एकेक शिखरं आहेत. चढण चढून गेल्यावर ती शिखरं लागायची आहेत. आपण पायथ्याशीच कुठंतरी धडपडत असतो आणि अशावेळेला एकाग्रतेची अपेक्षा ठेवतो.

ही मोठ्यांची कामं आहेत. त्याला खूप आधी पूर्वजन्मीची तयारी लागते. अशी समजूत असते. तयारी लागते, हे मान्य आहे आणि ती तयारी वाया जात नाही. ती तयारी घेऊन आलो, म्हणूनच तर आपण इथं हा सगळा विचार करत आहोत. पण ते आज इथून पुढं शक्य नाही. ती मुक्तता मला

कशी शक्य आहे ? असं कधी कुणी म्हणू नये. कारण ती भगवंताच्या हातातली गोष्ट आहे. असं स्वरूप आहे त्याचं. तुम्ही कशाला होय - नाही म्हणता ? मनच ठरवतं, ते खूप अवघड आहे आणि तेच ठरवतं, हे खूप सोपं आहे. साधनाचं संभाव्य असं हे नुकसान मनच घडवतं.

आपल्या एरवीच्या गर्दीत, अडचणीच्या काळात कोणा जवळच्या नातेवाईकाचं लग्न-कार्य असलं तर मुंबई, दिल्ली, कलकत्ता अगदी परदेशातसुद्धा मनुष्य जातोच की नाही ? तिथली काही माहिती नसते. तरीसुद्धा मनुष्य म्हणतो गेल्यावर होईलच की माहिती. पण साधन म्हटलं की, ते तीन तास कसं जमेल ? आपली इतकी का कॅपॅसिटी आहे ? त्यापेक्षा नकोच करायला. आता याला काय करावं ? अहो, जाऊन पंधरा मिनिटं बसा तरी, मग पुढं बघता येईल, पंधरा मिनिटांनी उठून येता येईल. ती का चालती गाडी आहे की, आता बसलो तर उतरून जाता येणार नाही. एरवी ती मोटारगाडी, बस त्याला लागते, त्याचा त्रास होतो. पण स्वतःचं किंवा जवळच्याचं काही असलं म्हणजे मनुष्य म्हणतो, गोळी घेईन, वाटेत उतरीन, तिकीट वाया गेलं तरी चालेल, त्रास कमी झाल्यावर दुसऱ्या गाडीत बसेन, पण तिथं जाईन. प्रपंचात असे सगळे प्रयत्न करणारं मनच आहे ना ?

पण ते मन परमार्थासाठी जायचं म्हटल्यावर, कुठं जायचं तिथं प्रत्येक गोष्टीत अडचण उभी करतं. हे माझं संभाव्य साधनेबद्दल आहे ! अजून ती केलीच नाही. पण ती अवघड आहे, ही मोठ्यांची कामं आहेत, हे मला जमणार नाही. मनच ठरवतं हे जमणार नाही. उदाहरणार्थ ज्ञानेश्वरीचं वाचन, अठरा अध्याय, नऊ हजार ओव्या, बापरे ! त्यापेक्षा आपलं एखादं काहीतरी स्तोत्र म्हणावं, गप्प बसावं झालं. आपल्याला एवढं झेपणार आहे का ? कुणी करून पाहिलं झेपणार की नाही ? कुणी सामान्य मनुष्य नव्हे, तर कॉलेजचे प्रिन्सिपॉल असलेले श्री मामासाहेब दांडेकर म्हणत की, ज्ञानेश्वरी

वाचल्याशिवाय मरू नका. जीव तोडून त्यांचं हे सांगणं आहे. मग ते जर म्हणताहेत, तर ज्ञानेश्वरी वाचायला घेतली आणि उलट्या त्रास सुरू झाला, असलं काही होत नाही ना, उलट ज्ञानेश्वरी वाचतो आहेस, तर माउली मांडीवर अलगद घेतल्यासारखं ज्ञानेश्वरी पुरी करून घेतील. असा विचार करायचा बाजूलाच राहिलं. गाडीत त्रास होतो म्हणून आपण गोळ्या घेऊन बसतोच ना ? मग इथं का नाही गोळ्या घेऊन बसत ? जरा थोडी तब्येत नरम असली की, आज साधन ? छे ! आज कुठली साधना ? आज उठवतच नाही जागेवरनं, असं म्हणतो मनुष्य. उठवत नाही जागेवरून हे शरीराला ना, मग उठू नका ! श्री महाराजांनी, पडून नाम घेतलं तरी चालेल, म्हणून सांगितलं आहे ना ? आता आणखी आपली काय सोय करून द्यायची ? ते म्हणतात बेशुद्धीत माझी जबाबदारी, शुद्धीत तुमची आहे. शुद्धीत तुमची म्हटल्यावर याच्याखाली ते तरी काय करणार ? त्यांनी मनाचे हे अडथळे कोणते असतील, हे ओळखलं आहे आणि त्याला वेगवेगळे अचूक मार्ग काढून व्यवस्था केलेली आहे.

म्हणून जेवढं मनानं नुकसान केलं, तेवढं शरीरानं केलं नाही, असं सुरुवातीला म्हटलं आहे. फक्त माझं साधन मीच ठरवतो की, काय करायचं किंवा काय करायचं नाही. मग त्यासाठी कुठलं शास्त्र पाहिलं नाही, कुणाला विचारलं नाही, श्रीमहाराज काय म्हणतात ते पाहिलं नाही, ते प्रवचनात काय म्हणतात ते बघितलं नाही, त्यांनी दिलेले मार्ग वाचले नाहीत, प्रश्नोत्तरं पाहिली नाहीत - काही बघितलं नाही. जे ठरवलं ते आपल्याच मनाप्रमाणं ठरवलं. आणि आपणच वर म्हणतो, ते अवघड आहे.

एक गंमत सांगतो. एकजण सांगत होते की, नाम हे केशर-कस्तुरीसारखं आहे ना ? तर मी म्हटलं, खरोखरच नाम ही आपल्या जीवनातली केशर-कस्तुरी आहे. त्यावर त्यांनी पुढं सांगितलं की,स्वयंपाकात

कसं, थोऽडंसं केशर टाकलं की पुरतं तसं, नामसुद्धा थोऽडं घ्यावं ! 'छान' ! स्वयंपाक मुळातच चांगला असतो. म्हणून त्यात थोडंसं केशर टाकलं की पुरतं, हे बरोबर आहे. पण ते केव्हा ? स्वयंपाक मुळात चांगला असेल, तर ना ! आमचं जीवन स्वयंपाकासारखं, असं सगळीकडून सुंदर आणि उत्तम का आहे ? तर नाही. उलट त्यात किती केशर ओतावं लागेल, तेव्हा कुठं सुगंध आला तर आला ! आपल्याला आपल्या जीवनाची चांगली कल्पना आहे. उगाच नाम थोडंसं पुरतं हे म्हणण्यात अर्थ नाही ! अशा या मनाच्या कल्पना असतात, त्या नुकसान करतात.

माझं बरोबर चाललं आहे. माझं सारखं चुकतं आहे. दोन्ही मनाचेच खेळ आहेत. माझं अगदी व्यवस्थित चाललं आहे, अशी कल्पना येणं हेसुद्धा कुणी तपासलं आहे, कुणी बघितलं आहे, कुणी तुम्हाला विचारलं का, किंवा कुठं लिहून ठेवलं आहे का ? म्हणून तुमचं साधन तुम्हाला तपासता आलं आणि ते बरोबर चाललं आहे किंवा माझं सारखं चुकतं आहे माझ्या साधनात काहीतरी कमी आहे, मला ते पुरेसं होत नाही, असा मनाचाच अडथळा आहे. अहो, तुमचं व्यवस्थित चाललं आहे, तुमचं साधन पुरं होतं आहे. तुमच्या मागं तुमचे गुरू बसले आहेत. त्यांना तुम्हाला उचलायचं आहे, न्यायचं आहे, तुम्ही जसे असाल तसे. श्रीमहाराज नाही का म्हणाले की, तुम्ही मला सोडलंत तरी मी तुम्हाला सोडणार नाही. या जन्मात तुम्ही पोचला नाहीत तरी, पुढच्या जन्मात पाठलाग करीन. पण तुम्हाला मुक्ततेपर्यंत सोडेन. असं सांगणारे श्रीमहाराज किंवा संत तिथं बसले आहेत. तर ते तुम्हाला तसं सोडतील का ? मग ही अडचण आपल्याच मनानं कशाला निर्माण करायची ? आपण आपलं साधन करावं. मग ते किती होतं, कसं होतं, त्याचं प्रमाण कसं वाढवायचं, एकाग्रता कशी वाढवायची, ती प्रगती कशी करावी याचा विचार करू नये. ते पुढं आपोआप घडतं सगळं.

आपल्याच मनानं ठरवलं की, पुढच्या साधनशिबिराला नक्की जाणार. यावेळेला काय झालं आहे, इतक्या अडचणी आहेत काय सांगू ? अडचणी निर्माण करण्याची आपल्या मनाची विलक्षण कुवत आहे. कशी ती कळतच नाही. एरवी त्याला एका जागी बसवत नाही, जपाला हं ! पण मुंबईपर्यंतचा नऊ-दहा तासांचा प्रवास रेल्वेनं करतो, रेल्वेतच जरा पाय मोकळे करू म्हणतो. मग इथं घरात बसून पाय मोकळे केले, काय तुम्ही फिरून आलात तरी तुम्हाला नामाला काय अडचण आहे ? पण जपाला बसला की, तिथं चालत नाही. ते आपल्याला कसं जमणार, असं वाटतं. हे शिबीर नको, पुढचं शिबीर मात्र नक्की, असं मन ठरवतं. तर अशा तऱ्हेनं अडचणी निर्माण करणारं मनच आहे. क्षणभर आपण त्याच्यावर विचार करावा, पुढच्या शिबिराची किंवा आपली काय खात्री आहे ? कदाचित ते होणार पण नाही किंवा त्याला आपण हजरपण असणार नाही. हा विचारही मनच करू शकतं. आणि तेच आपल्या मदतीला येईल, आणि म्हणेल, असं होण्यापेक्षा आत्ता जाऊ, जमेल तेवढं तरी साधन होईल. आता नुकसान करणारं आणि मदतही करू शकणारं मनच ना !

काही काही जण सांगतात बघा की, साधन वगैरे आम्ही पूर्वी कधीच केलं नाही, मग आता एकदम कसं जमणार ? खरं सांगायचं तर अशी अडचण सांगण्यात काहीच अर्थ नाही. साधं व्यवहारातलं उदाहरण आहे. नोकरीच्या जाहिरातीत लिहिलं असतं ना की, पूर्व अनुभव किमान एक वर्ष हवा. पण सर्व नोकऱ्यात अशी पूर्वानुभवाची अट असती, तर कुणाला नोकरीच करता आली नसती. पूर्वानुभव मिळायचा कसा ? म्हणजे अशी काहीतरी जागा हुडकली पाहिजे की, ज्या ठिकाणी पूर्वानुभव ही अट नाही. आणि तशी जागा असते. तिथं शिकून हा पूर्वानुभव येतो. म्हणजे पूर्वानुभव ही काही सगळीकडं अट नसते, होय की नाही ?

मग साधनाच्या बाबतीत पूर्वानुभव नावाची काही अट आहे का की, एक वर्ष साधन केल्यानंतरच साधनेला लागावं, असं कसं म्हणता येईल ? त्यानं साधनेला लागावं म्हणजे एक वर्ष होईल, मग दुसऱ्या वर्षीच्या साधनेला लागावं. साधन कुठलंही असू देत, नाम असेल, वाचन, पारायण काय असेल ते. पण तरीसुद्धा आम्ही म्हणतो, हे आम्ही केलं नाही. आपल्याला कसं जमेल ? ठीक आहे, म्हणजे एक वर्षाचा पूर्वानुभव अपेक्षित आहे. याचा अर्थ, नोकरीत वरच्या दर्जाची जागा असेल म्हणून त्यांना अनुभवी मनुष्य पाहिजे. पण काही ठिकाणी शिकाऊ, ॲप्रेंटिस सगळे असतात ना, मग ते काम करतात ना, काम केल्यावर त्यांना अनुभव येतो ना, मग तुम्हाला इकडून तिकडं जाता येतं ना, मग पूर्वानुभवाची ती अट पुरी होते ना, तसं तो माणून साधनेच्या वरच्या वर्गात नाही का जाणार ? इतकं सोपं आहे.

प्रपंचात आपल्याला सगळं सुचतं की, नोकरीसाठी पगार दिला नाही तरी चालेल. पण अनुभवासाठी मी नोकरी करीन. इथं पण श्रीमहाराजांना म्हणावं की, मला एक प्रॅक्टिस व्हावी, त्याचा अनुभव मिळावा म्हणून मी उपासना करतो आहे. मला उपासनेतलं काही माहीत नाही, त्यापासून काही अपेक्षा नाही, असं म्हणून साधन करायला काय हरकत आहे ? कसं जमणार म्हणणारं मनच आहे. तर असंही म्हणणारं मनच आहे. त्यामुळं आपण साधन करून बघायला काही हरकत नाही.

मनानं जेवढं नुकसान केलं, तेवढं शरीरानं केलं नाही. शरीराकडं मर्यादा आहेत. ते फार नुकसानी करत नाही, तसंच तुम्हाला फार मदतही करत नाही. एवढं नक्की आहे की, तुमच्या साधनेच्या कधीही आड न येणारं असं ते वाहन आहे. शरीराच्या कोणत्याही अवस्थेत ते आड येत नाही. आता वरती आपण बघितलं ना की, श्रीमहाराज म्हणताहेत, तुम्हाला बेशुद्धीत सांभाळण्याची जबाबदारी माझी आहे. शरीराची शुद्ध राहणं ही शेवटची

अडचण आहे. हात, पाय, नाक, कान, डोळे यांच्या अडचणी त्याच्याखाली आहेत. महाराज तर, बेशुद्धीतली अडचण मी सांभाळतो म्हणताहेत. इथपर्यंतच्या अडचणीत ते मदत करू शकतात. याच्यापेक्षा आणखी शरीरानं काय मदत करायची आपल्याला ? तरी ती मदत तशी शरीराकडून पूर्ण आहे. त्यामुळं त्याची काही अडचण नाही. मनाचीच अडचण आहे. मनानं समजून घेतलं तर त्याचा फायदा आहे. समजून घेतलं तर मन वाटेल ते करतं. मनानं नुकसान करायचं ठरवलं, तर वाटेल ते नुकसान करू शकतं आणि ठरवलं तर वाटेल तो फायदापण करू शकतं.

मन काय करू शकतं तर काहीही करू शकतं. त्याची हृद्य आठवण म्हणून एक प्रसंग सांगतो. श्री रमण महर्षींच्या आश्रमात मुदलियार म्हणून आजी होत्या. निराश्रित, निराधार म्हणून त्या आल्या आणि आश्रमात स्थिरावल्या. श्री रमण महर्षींच्या जवळ त्या राहत आणि त्यांची सेवा म्हणून त्यांना रोज पान वाढत असत. जवळजवळ चाळीस वर्षं त्यांनी अशी सेवा केली. श्री रमण महर्षींवर गुरू या नात्यानं त्यांचा इतका लोभ होता, इतकं प्रेम होतं, इतका आदर होता की, रमणांशी विनोद करण्याचंसुद्धा त्यांच्याकडं सामर्थ्य होतं. रमणांच्या बाबतीत त्या विनोदानंसुद्धा बोलत. एकदा रमणांना त्यांनी वाढलं, थोडं जास्त वाढलं. प्रेमानं मनुष्य वाढतो तर जास्त वाढतो. तर तसं वाढलं. तर रमण म्हणाले, तुम्ही वाढलं पण त्याच्याशिवाय अजून दोन पदार्थ आहेत आणि माझ्या पोटात जागा नाही एवढं खायला. त्यावर त्या रमणांना म्हणाल्या की, मनाचे खेळ आहेत तुमच्या ! रमणांना म्हणता आहेत हं ! रमण म्हणाले, हे बरं आहे. माझेच शब्द मला परत मिळाले. यू आर रिटर्निंग माय वर्डस् टु मी. इथपर्यंत मुदलियार आजींची रमणांबद्दल आत्मीयता होती. रमणांनादेखील त्यांच्याबद्दल तितकंच प्रेम आणि आदर होता. पुढं आजी खूप थकल्या. डोळ्यांनी दिसेना झालं, त्यांना वाढायलासुद्धा

दिसेना. रमणांचं दर्शन घ्यायलासुद्धा येता येईना, अशी अवस्था झाली.

एके दिवशी आजींना खूपच अस्वस्थता वाटली की, एकदा रमणांचं दर्शन घ्यावं. म्हणून त्या जवळच्या माणसाच्या मागं लागल्या, त्याला बरोबर घेऊन त्याच्या हाताला धरत रमणांच्या समोर आल्या. रमणांच्यासमोर बसल्यावर रमणांच्या शेजारी जो मनुष्य होता त्यानं विचारलं, आजी तुम्हाला रमण दिसतात का ? तर त्या म्हणाल्या, मला काही दिसत नाही. मग कशाला तुम्ही रमणांच्या दर्शनाला आलात ? अरे बाबा, मला दिसत नसलं तरी रमणांना मी दिसते ना, इट इज मोअर दॅन इनफ. हे माझ्या जरूरीपेक्षा खूप आहे. मी जे त्यांना पाहण्यात आहे, त्याच्यापेक्षा त्यांनी मला पाहण्यात जास्त आहे. आता हे कुणी ठरवलं, हे मनानंच ठरवलं. जिथं शरीराला दृष्टीसुद्धा नाही, त्या ठिकाणीसुद्धा त्यांची दृष्टी पडली तर आपलं काम होईल, आपलं चित्त बदलेल आणि आपलं सार्थक होईल. असं वाटणं इथंपर्यंत मन मदत करू शकतं.

आता अशी ही मनाची दिशा समजली आहे. म्हणून आपण एवढंच लक्षात ठेवूया की, परमार्थ करायचा झाला तर मनाची योग्य ती मशागत करायला तयार झालं पाहिजे. शरीर सदैव मदतीला तत्पर आहे. आजारी असलं तरी तयार आहे. कारण आजारपणामुळं उलट जास्त स्मरण आहे. शरीर सुदृढ असेल तर परमार्थ करायला सोपंच आहे.

फक्त त्यादृष्टीनं मनाची मशागत ही आपल्याला करायची आहे. म्हणून परमार्थात शरीराचा विचार करायचा नाही. शरीर नुकसान करीत नाही. नुकसान करील तर मनच करील आणि ते त्याला करू न देणं, हे साधकाचं खरं काम आहे !

।। श्रीराम ।।

(उत्तरार्ध : निरूपण क्र. १५)

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. १५/११/२००८ च्या निरूपणावर आधारित)

चिंतनक्षण

वचन क्र. १३ * निरूपण : क्र. १६

शब्दशक्तीचा यथायोग्य वापर म्हणजे मौन.

श्वास वजा केला तर, माणसाच्या आयुष्यात काय उरेल ? अगदी तसंच शब्द वजा केला तर, आपल्या व्यवहारात काय उरेल ? म्हणूनच आपल्या शब्दशक्तीचा यथायोग्य वापर म्हणजे मौन. या वचनाचा विचार आपण करणार आहोत. पुन्हा एकदा शब्दांनीच शब्दाबद्दल सांगण्यासाठी हे वचन किंवा शब्दांचा समूह, असं हे सारं आहे, हे प्रथमच लक्षात घेऊ. आत्ताच आपण म्हटलेल्या श्री पंतमहाराजांच्या पदात 'शब्द गिळुनि नाचे दत्त, सदा स्मरे अवधूत' असं आहे. म्हणजे श्री पंतमहाराजांनासुद्धा शब्द गिळल्यानंतरच ते नाचायला लागले, असं म्हणायचं आहे. एका अर्थानं 'सर्व शब्दांचा घोटाळा'- आणि त्यातून मोकळं व्हायला पुन्हा- 'टाकुनि होई रे मोकळा' हेही पुन्हा, शब्दांतच सांगावं लागतं. शेवटी शब्द गिळावाच लागतो. तरीसुद्धा 'शब्दजनित विश्वरहाटी' हेही या पदातच सांगितलं आहे, त्याप्रमाणं शब्द बोलल्याशिवाय आपला व्यवहार होत नाही. शब्द कशा स्वरूपाचा आहे, हा गौण मुद्दा आहे. तो लिखित असेल किंवा वाचेनं बोललेला असेल.

शब्दाचा वापर केल्याशिवाय आपला व्यवहार होत नाही. आपण सकाळी उठल्यापासून काही बोललो नाही तर, व्यवहार करू शकतो, प्रयत्न होतात. पण त्याचबरोबर गैरसमजाला आमंत्रणही मिळतं. हे वचन एका बाजूनं असं की, शब्दशक्तीचा यथायोग्य वापर म्हणजे मौन, हे सर्वांना पटतं, फक्त ते करायचं दुसऱ्यांनी !

या वाक्याचं वैशिष्ट्य असं आहे की, शब्दशक्तीचा योग्य वापर

'इतरांनी' केला तर, घरात सुख नाही का नांदणार, समाधान नाही का होणार, असं प्रत्येकाला वाटतं. दुसऱ्यानं यथायोग्य वापर करावा असं वाटणं, हासुद्धा शब्दशक्तीच्या बाबतीतला मनाच्या अनेक भ्रमांपैकी एक भ्रम आहे. पण स्वतःच्या बाबतीत मात्र प्रत्येकाला असं वाटतं की, आपण मात्र शब्दशक्तीचा यथायोग्य वापर करत आहोत, आपण बोलतो आहोत तेवढंच योग्य आहे. इतरांचा वापर मात्र यथायोग्य नाही. श्री तुकोबांनी म्हटलेलं आहे की, 'येतो कळवळा म्हणूनिया' हे तुकोबांना योग्य आहे. पण बाकीच्यांनी कळवळा येतो, हे म्हणण्याची स्थिती का कोणाची झाली आहे ?

श्री अरविंदांच्याकडच्या श्री माताजींच्या चरित्रातली घटना आपणाला माहिती असेल. श्री माताजी एके ठिकाणी म्हणाल्या की, जर गरज असलेले तेवढेच शब्द उच्चारले जातील, तर जगात खरोखरी शांतता नांदेल ! अर्थ अगदी सरळ आहे. काय आहे तो अनावश्यक शब्दांमुळं माजलेला गोंधळ आणि त्यातून निर्माण होणारी जगातली अशांती आहे, हे माताजींचं म्हणणं पटण्यासारखं आहे. आणि तोच मुद्दा श्री पंतमहाराजांनी आपल्या अभंगामध्ये व्यक्त केलेला आहे. शब्दांचा वापर फार होतो आणि त्याची आवश्यकता नाही, हे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. म्हणूनच या वचनात म्हटलं आहे की, शब्दशक्तीचा यथायोग्य वापर व्हावा.

अनेकांना आपल्याजवळ शब्दशक्ती नावाची शक्ती आहे, याची जाणीव पण होत नाही. एकतर ती खूप उशिरा होते. शक्ती एकदा कळल्यानंतर मग तिच्या वापराचा प्रश्न आहे ! माझ्याकडं शब्दशक्ती नावाची शक्ती आहे आणि तिच्यापेक्षा उत्तम शक्ती मौन हीसुद्धा आहे. किंबहुना जो शब्द बोलतो तो मौनातून खाली येण्यासाठी असतो. आपल्याकडून किंवा दुसऱ्याकडून मौनानं काम होणार नाही, म्हणून नाईलाजानं जे खाली येऊन सांगावं लागतं, त्याला आपण शब्द म्हणतो. असं जर खाली येऊन सांगायचं ठरवलं तर,

जरूरीपुरतंच बोलणं होईल. आणि असं जर बोललं गेलं तर, आपल्याला खूपच कमी बोलायची गरज लागेल. एखाद्याच्या अबोल स्वभावाचा विचार सोडून देऊ. बडबड्या स्वभावाप्रमाणे अबोल स्वभावाचेसुद्धा तोटे असतात. मनुष्य अबोल असला म्हणजे तो मौनी आहे, असं समजायचं काही कारण नाही. माणूस मनात किती बोलत असतो, यात आपण पण नाही का ? श्रीमहाराज म्हणाले की, आपण सातत्यानं जपात असावं. याचा दुसऱ्या शब्दात अर्थ काय आहे की, आपण मौनात असावं ! पण आपण जपात असतो म्हणजे मौनात असतो, असं म्हणता येईल का ? आपलं आपल्याला माहितीच आहे. तर आतली बडबड थांबणं म्हणजे खरं मौन आहे. आपला अनुभव तर असा आहे की, ती बडबड थांबतच नाही, उलट जास्त होते. म्हणून या अर्थानं शब्द ही आपल्याकडं असलेली शक्ती आहे. पण नेमकं काय होतं की, तिचा वापर नकळत झाल्यामुळं खूप होतो.

आपल्याला आता जाणीव व्हायला लागली की, पाणी मर्यादित आहे, तेल मर्यादित आहे. आता हवेबद्दलसुद्धा सांगितलं जातं. त्याचे बोर्ड लागतात की, पाणी मर्यादित आहे, कमी वापरा, जरूरीपुरतंच वापरा. प्रत्येक गोष्टीत सिग्नल यायला लागले. तसं या शक्तीच्या बाबतीत झालं आहे.

आपल्याला हे सांगण्याची खरंतर गरजच नाही. आपल्याला फार पूर्वीपासून शब्दशक्तीबद्दल सांगितलं आहे की, तीसुद्धा शक्ती आहे. तर तिचा योग्य वापर करा. श्रीमहाराज म्हणत अग्नी ही शक्ती आहे. तिचा योग्य उपयोग केला तर, स्वयंपाक करून जेवायला घालता येतं, नाहीतर घरसुद्धा जाळता येतं - अशी अग्नीसारखी ही शब्दशक्ती आहे.

शब्द ही शक्ती आहे. आपल्या मनात कोणीतरी बोललेलं, काहीतरी लागलेले शब्द - आपण लिहून काढायचे ठरवले तर ते लिहून काढण्यासाठी आपल्याला चाळीस पानी वहीच काय, शंभर पानी वहीसुद्धा लागेल. एखाद्याचं

चिटोऱ्यावर लिहून होईल, असं सांगणं खूप कठीण आहे. श्री पंतमहाराज म्हणाले तसं, तो जो घोटाळा आहे तो सर्व शब्दांचाच घोटाळा आहे.

सगळ्या संतांनी, वेगवेगळ्या भाषेमध्ये हा शब्दांचा घोटाळा सांगून ठेवला आहे. एखाद्याचा गैरसमज झाला अशी कल्पना करू या. तर त्यात शब्दांमुळं झालेले गैरसमजच जास्त असतात. आणि नंतर अशीपण कल्पना करू या की, असे गैरसमजाचे, त्रासाचे - घोटाळे दूर करण्यासाठी मित्र-मित्र, पती-पत्नी, मुलं-आईवडील एकत्र बसले आहेत. असं संवादाचं वातावरण आहे. मग खूप शब्द वापरल्यामुळं शब्दांनी निर्माण झालेले घोटाळे दूर होतात. आता प्रत्यक्ष चर्चेच्या वेळेला घोटाळे दूर करण्यासाठी आपण असे शब्द वापरतो की, 'मला असं म्हणायचं नव्हतं.'

ते पुन्हा शब्दांतच सांगतो आणि मला खरं काय म्हणायचं होतं, ते सांगतो - असं म्हणतो म्हणजे पुन्हा शब्दच वापरतो. हे जे काही म्हणायचं होतं, ते आपल्याला योग्य शब्दांत आधी सांगता आलं नाही, ही त्यातली खरी अडचण आहे. म्हणजे आपल्याला खरं काय म्हणायचं होतं, ते जर आधी सांगितलं असतं तर, हा पुढचा गैरसमजाचा, त्रासाचा घोटाळा झाला नसता की नाही ! शब्द हे शब्दशक्ती म्हणून आपल्याला परिचितच नाही, म्हणून असं होतं. आधी आतून जे अयोग्य शब्द आले आणि ते बोलले गेले, तेही आपले नेहमीचे परिचित शब्दच आहेत आणि आता ते योग्य करण्यासाठी आपण बोलतो आहोत, तेही आतून आलेलेच आहेत. फक्त ते आता मूळ शब्दातली चूक दुरुस्त करण्यासाठी आलेले आहेत. पण ज्याला शब्दशक्तीचा परिचय आहे, मौनाचा अभ्यास आहे, त्याचे आतून आलेले शब्द स्क्रीन होऊन - गाळून, आवश्यक तेवढ्या प्रमाणातच बाहेर जातात. म्हणजेच शब्दशक्तीचा यथायोग्य वापर होतो.

शब्दशक्तीचा वापर न करणं, हेही त्रासाचं आहे. कारण त्याच्यामुळं

गैरसमज होतात. आपण कल्पना करू की, सकाळी उठल्यापासून मनुष्य काही बोललाच नाही. म्हणजे मग जरा भीती वाटते, काहीतरी शंकास्पद वाटतं. काहीतरी गडबड असली पाहिजे, काहीतरी झालं असलं पाहिजे, ज्या अर्थी मनुष्य अजिबात काही बोलत नाही, सकाळपासून एकही शब्द ऐकायला मिळाला नाही, त्या अर्थी काही घोटाळा आहे, हाही घोटाळा पुन्हा शब्दांशीच निगडीत आहे, आता तो न बोलल्यानं आहे. रागाचा शब्द जरी ऐकायला मिळाला, तरी बरं वाटतं. किती उशीर झाला उठायला, काय सुरू आहे घरात, असं कुणी म्हटलं तरी बरं वाटतं. शेवटी त्या शब्दांचाच आधार असतो ना ! म्हणजे आता आपण शब्दांचा यथायोग्य वापर क्षणभर बाजूला ठेवू. पण शब्दांचा वापर करण्याची आपल्याला गरज आहे. आता सकाळपासून कटकट करायला लागला तरी आपल्याला शंका येते की, काल काय झालं बाबा एवढं असं याचं, काय ऑफिसमध्ये झालं की, बाहेर झालं - सकाळी उठल्यापासून सगळं बिघडलेलं आहे. कारण अकारण इतके शब्द बोलले जात आहेत. त्याच्यावरून पुन्हा गोंधळच निर्माण होतो. म्हणजे शब्दांचा यथायोग्य वापर - हीच खरी बरोबर वस्तुस्थिती आहे !

सकाळी उठल्याबरोबर किंवा आपल्या व्यवहारामध्ये एकूणच आवश्यक असलेले शब्द वापरता आले तर, मौन होईल. पण वापर करायला वापर करणारा स्तब्ध,सावध नको का? वापर करणारा हवा ना? कुणाकडूनतरी शब्द वापरले जातात, बोलले जातात, त्यामुळं असं होतं. बोलले गेले, न बोलले गेले, चुकीचे बोलले गेले - सगळ्यामुळं घोटाळाच आहे. जर समजा आपल्याला लहानपणापासून किंवा जेव्हा कळायला लागतं तिथंपासून शब्दांचा जर योग्य सराव असेल तर, त्याचा आपल्याला हळूहळू मौनाकडं जायला उपयोग होईल.

मौनाबद्दल एकंदरीतच बरेच घोटाळे आहेत. खरं सांगायचं तर,शब्द

बोलणं आणि मौन यांचा वरवरचा संबंध आहे, फारसा संबंध नाही. ते कसले कसले मंगळवार, पांढरा बुधवार असे वार असतात ना, तसा एखाद्याचा मौनाचा वार असतो. अशी कल्पना असते की, मौन पाळणं म्हणजे न बोलणं होय. तर त्या मौनाच्या वारी तो नक्की काय करणार ? खरं तर उपास करणार त्याप्रमाणंच असतं ते मौन ! उपासाच्या दिवशी लोक चार प्रकार करून उलट अधिक खातात की नाही, तसा तो मनातल्या मनात खूप प्रकार करून बोलणार. ज्या दिवशी तो मौनात असतो, म्हणजे काय असतं तर आपल्या दृष्टीनं, व्यवहाराच्या दृष्टीनं तो शब्दांचा काही उच्चार केल्याचं आपल्याला ऐकू येत नाही. म्हणजे उच्चार करत नाही, असं म्हणणंसुद्धा धाडसाचं वाटतं. पण त्याच्याकडून काही शब्द ऐकू येत नाहीत म्हणजे त्याचं आज मौन आहे. अनेकदा दिवसभर काही बोलले नाहीत, ही खूप चांगली गोष्ट असते ! असं आठवड्यातून एखादा वार ठरवून आपण काही बोलायचं नाही असं ठरवलं, म्हणजे रागानं नव्हे हं, केवळ एक साधना म्हणून, त्याची इतरांना पूर्वकल्पना देऊन, तर तसं जर घडत असेल तरी चांगलं आहे. नाहीतर एकदम सोमवारी उठून असा मौनाचा वार एकदम सुरू केला, तर घोटाळा होतो.

साधनेमध्येसुद्धा कौशल्य आहे. कृती, कुशलता, सातत्य असं आहेच ना ? साधनेसाठी तर असं कर्मकौशल्य करणं, साधना म्हणून करणंदेखील चांगलंच आहे. ही एक प्राथमिक अवस्था आहे की, आपण शब्द उच्चारले नाहीत आणि ही गोष्ट चांगलीच झाली. पण एक विसरून चालत नाही की, हे सोमवारी चालेल पण आपल्याला मंगळवारी परत बोलावं लागेलच ना ? मग समजा मौनाच्या वारी कोणी एखादा मनुष्य आपल्याकडं आला. त्याला या मौनाची काहीच कल्पना नाही. बेल वाजवली, दार उघडलं, तो येणारा मनुष्य समोर उभा आहे. तर त्या माणसाची पुढं कायकाय प्रतिक्रिया होऊ

शकते, याचं चित्र डोळ्यांसमोर उभं राहू शकतं. मी आलो खरा. पण हे बोलत नाही म्हणजे समजायचं काय, आलेलो त्यांना आवडलं की, नाही आवडलं, यायला नको होतं का, घरात काही प्रॉब्लेम आहे का, काय समजायचं - असं त्या येणाऱ्या माणसाला वाटेल की नाही ?

अशा वेळेला या बसा, एकदोन मिनिटात आलो मी, किंवा आज माझं मौन असतं. त्यामुळं मी जरा कमी बोलेन, असं जर त्या माणसाला सांगितलं, तर त्या माणसाचा काही गैरसमज होण्याची शक्यता नाही. तो म्हणेल, चांगली गोष्ट आहे, कदाचित म्हणेल, काहीतरी नवीन फॅड दिसतं आहे, ठीक आहे, असं म्हणेल फार तर. इतके दिवस वेगवेगळं कायकाय करत होते, आता हे सुरू केलेलं दिसतं आहे !

वस्तुतः शब्द हे आपलं जीवनध्येय साध्य करणारं उत्तम साधन आहे. लहान बाळ रडत असेल तर, त्याला शांत करायला, मोठ्या माणसांना कदाचित निरर्थक वाटणारे काहीकाही शब्दसुद्धा ती आई उच्चारत असते. असले निरर्थक शब्द ऐकताना अनेक मोठ्या माणसांना गंमत वाटते, चुकीचं वाटतं. पण मोठी माणसं आपणपण लहान होतो, तेव्हा असंच बोललं जात होतं, तेव्हा आपणपण हसलो होतो, हे विसरतात. म्हणून असे ते शब्द वापरल्यावर ते मूल हसतं, बोलतं, शांत होतं.

म्हणजे जिथं जीवन व्यवहार सुरू होतो, तिथंसुद्धा त्या शब्दांची गरज आहे. जिथं परमेश्वर ओंकारस्वरूप आहे, नामस्वरूप आहे - तिथपर्यंतसुद्धा शब्दांची गरजच आहे. तर आपलं जीवनाचं जे ध्येय असेल, ते बाळाला शांत करणं असू देत किंवा परमेश्वराचं स्वरूप आठवणं असू देत, तर ते साध्य करण्यासाठी शब्दांसारखं उत्तम साधन नाही. कारण शेवटी काहीतरी आत निर्माण होणार आणि ते कोणाला तरी पोचवावं लागणार, असं होणार नाही का कोणाचं ? 'पदोपदी राघव स्मरण करा' असं म्हणताना

आपल्यासमोर 'राम' हा शब्द आला, तर रामाची काहीतरी प्रतिमा उभी राहते ना, म्हणजे त्या शब्दामध्ये रामाची प्रतिमा उभी करण्याचं सामर्थ्य आहे !

आपल्या साध्या व्यवहारात दुकानात गेलो आणि नुसती दहा रुपयांची नोट दुकानदारापुढं केली, तर त्यांना काय कळणार - यांना दहा रुपयाची कुठली वस्तू हवी आहे, तर काय हवं आहे, हे सांगण्याचा साधा व्यवहार आहे ना ? त्यासाठीसुद्धा काय हवं आहे, ते शब्दात सांगावं लागतं. म्हणजं जीवनाची सर्व प्रकारची ध्येयं साध्य करण्यासाठी शब्दासारखं उत्तम माध्यम किंवा साधन नाही. म्हणजे ही एक वस्तुस्थिती झाली.

दुसऱ्या बाजूला शब्दांनी माजवलेले गोंधळ जर लक्षात घेतले - ते मला असंअसं बोलले, ते मी अजून विसरलो नाही, मला ते खूप लागलं, त्यानं अशा भाषेत कशाला बोलायला पाहिजे होतं, त्याऐवजी त्यानं असं बोललं असतं तर चाललं असतं की नाही, असं सगळीकडं आपापल्या व्यवहारामध्ये, व्यवसायामध्ये, गिऱ्हाईकाशी बोलताना होत असतं ना, म्हणजे तीच शब्दशक्ती योग्य किंवा अयोग्य, चांगल्या किंवा वाईट अशा अर्थानं वापरली जाऊ शकते ना ? सर्वसाधारण प्रत्येकाकडं ही शब्दांची शक्ती दिली आहे. आता एखाद्याच्या वाट्याला, व्यंग म्हणून बोलता येत नाही, अशी कमतरता-उणीव आली असेल तर, ती गोष्ट वेगळी आहे. पण बाकीची सुखं, दुःखं, आनंद, व्यवहार हे सर्व करण्यासाठी त्याला एवढी शब्दाची शक्ती दिली ना, मग तिचा परिचय आपण अगदी जेवढा लवकर करून घेता येईल, तेवढा करून घ्यावा.

मग त्याची तपं वगैरे सगळं पुढं आहे ते ! पण काहीतरी करावं लागेल कारण ती शक्ती आहे, त्याअर्थी तिचा वापर मला अधिकाधिक चांगला करायचा आहे. कारण 'परमेश्वर' हासुद्धा एक शब्दच आहे. श्री

निसर्गदत्त महाराजांचं शब्दाच्या बाबतीतलं म्हणणं लक्षात ठेवायला हरकत नाही. ते म्हणत की, ज्यावेळेला शब्दांत सांगायची स्थिती ही आत्यंतिक सत्य असते, तळमळीची असते, त्यावेळेला शब्दाच्या वापराचीसुद्धा गरज लागत नाही. मनुष्याला मनापासून समजा एखाद्याचं प्रेम आहे, मग तिथं शब्दांची गरज नसते. खरंतर इतकं सहज, मनापासून आणि प्रामाणिक जगणं असावं. पण हे गरजेचं असलं, आनंद देणारं असलं, तरी थोडं कठीण आहे.

व्यवहारात इतकं सगळं मनापासून जवळजवळ काहीच नसतं. मग मनापासून नसेल तर, मग थोडं सांगावं लागतं की - आहे, प्रेम आहे, ती माया, वात्सल्य अगदी मुलाबद्दल असलं तरीसुद्धा त्याला सांगावं लागतं की, मला तुझ्याबद्दल प्रेम आहे, वात्सल्य आहे. इथंपर्यंत शब्दांची मदत आपल्या व्यवहाराला लागू राहते. अशा शब्दांची गरज लागते. प्रपंचाचं स्वरूप आणि आपली कुवत ओळखून, त्यासाठीच ते साधन आपल्याला दिलं. फक्त प्रश्न आहे की, मी त्याचा वापर कसा करतो.

म्हणून ही शब्दशक्तीची जाणीव जर लवकर झाली तर, मग लक्षात येईल की, जेव्हा जे सांगायचं ते पूर्ण मनापासून असतं, त्यावेळी शब्दांची गरज राहत नाही. तसंच, आणखी एक लक्षात येतं की, शब्द वापरताना त्यामध्ये शब्द धरून बसल्यामुळं शब्दांचा घोटाळा जास्त झालेला आहे. अनेक वेळेला माणसं शब्द धरून बसलेली असतात. कुठले तरी, कुणीतरी, कुणाबद्दल तरी, कधीतरी - वापरलेले शब्द धरून बसतात आणि त्यामुळं घोटाळा जास्त होतो. जसा एखादा काटा सलतो, दुखत राहतो तसा माणसाला वापरलेला शब्द सलत राहतो. वास्तविक, शब्द वापरून झाला, त्याला तेच म्हणायचं होतं की नाही, हेही आपल्याला माहीत नाही, त्याची शब्दसंपत्ती काय होती, ते पण आपल्याला माहीत नाही. तरी आपण ते शब्द धरून बसलेले असतो. वस्तुतः हे समजून घेतलं पाहिजे की, विशिष्ट शब्द

वापरण्याच्या बाबतीत अशा बऱ्याच अडचणी आहेत. शब्द वापरून मला अमूक एक म्हणायचं आहे, पण म्हणायला माझ्याकडं योग्य शब्द नसतील, तर मी जे असतील ते शब्द वापरतो ! पण त्या शब्दांनी काहीतरी घोटाळा होतो. समोरच्या माणसाला तोच अर्थ प्रतीत होत नाही. त्याला दुसरंच काहीतरी जाणवतं. मग असं जर असेल तर, एकतर मला त्याच्याविषयी सावध रहायला लागेल. नसेल तर मला असं असं म्हणायचं आहे, असं तरी सांगेन, त्याच्यापुढं काहीतरी स्पष्टीकरण जोडेन. निदान योग्य शब्दांचा अभ्यास करेन किंवा योग्य शब्द वापरायचा प्रयत्न करेन. असं जर केलं, तर या सबंध वचनाचा संबंध आपल्या व्यवहाराशी आहे आणि आपल्या परमार्थाशीपण आहे, हे लक्षात येईल.

आपण मौन म्हणजे शब्द थांबवणं, उच्चार करायचं थांबवणं असं समजतो. मुळामध्ये मौनाचा अर्थ तसा नाही. मौनात वाचेचा संबंध आहे पण तो अगदी दृश्य स्वरूपाचा आहे. 'वाक्संयम हेतुः मनः संयमः इति मौनम्' अशी मौनाची व्याख्या केलेली आहे. आपण अजून मौनाबद्दल विचार केलेला नाही. मौनाबद्दल आपण अजून जाणून घेतलेलं नाही. तर वाचेचा संयम घडावा या हेतूनं मनाचं संयमन करणं, म्हणजे खरं मौन आहे. त्यात कमी बोला, अमूक बोला, बोलू नका, वगैरे असं काही नाही. आपण मुलाला सांगतो, संयमानं खर्च कर, संयमानं रहा. याचा अर्थ त्यानं काही करूच नये, असं आहे का ? एखाद्यानं समजा म्हटलं आहार-विहार संयमित असावे. म्हणजे आहार, विहार करूच नये, असं नाही. तर ते संयमित करावे. संयमन आलं की, काहीतरी नियमन आलं. मग तो व्यवहार उपयोगी ठरतो, गरजेचा ठरतो आणि आपल्याला त्रास उत्पन्न करत नाही. म्हणून संयम सांगितला आहे. वाचेचं संयमन करावं हा मूळ हेतु आहे. मनाला संयमित करणं, म्हणजे मौन असं म्हटलं आहे. मौन शब्दामध्ये मन जास्त आहे, वाचेचा

फारसा संबंध नाही. म्हणून पूर्वी मुनी ज्याप्रमाणं राहत त्याला मौन म्हटलं आहे. मौन शब्दाचा अर्थ असाही आलेला आहे. पण मुळात व्याख्येचा अर्थ असा आहे की, 'वाक्संयम हेतुः मनः संयमः'. आता ज्याचं मनाचं संयमन नसतं, त्याचे शब्द कसेतरी जातात की नाही ! आणि जर समजा माझ्या मनाचं संयमन असेल, तर शब्द कसेतरी कसे जातील ? ज्याच्या ताब्यात घोड्याचा लगाम नाही, त्याचा घोडा उधळणारच. वाक्संयम हा वाचेचा लगाम आहे. तो ज्याच्या हातात आहे, त्याचे आवश्यक तेच शब्द जातील. आणि ज्याच्या हातात तो लगाम नसेल, त्याचे शब्द कसेही जातील. घोडं ज्याच्या ताब्यात आहे, त्याला जिथं जायचं - तिथं नेण्याचं सामर्थ्य त्या लगामामध्ये, त्या नियंत्रणामध्ये, त्या संयमामध्ये आहे. आणि जर जायचं नाही, तर कुठंही हलायचं नाही. हेही सामर्थ्य त्याच्याकडंच आहे. आपण विनवणीच्या वाणीमध्ये पाहिलं की, 'संत बसती अथवा फिरती, हित जगाचे साधिती' संतांची इच्छा आहे म्हणून ते बसले, त्यांची इच्छा आहे म्हणून ते फिरत आहेत. पण या दोन्ही अवस्थांमध्ये ते जगाचं हितच साधत असतात. ते बसले तरी हित होतं आणि ते फिरले तरीही हितच होतं. तसं न बोललेले शब्दसुद्धा कितीतरी हित करतात, जसे बोललेले शब्द करतात !

आता आपण व्यवहार बघूया. व्यवहारात जे शब्द वापरले गेलेले नाहीत, त्या शब्दांमुळंसुद्धा जगाचं खूप कल्याण झालं आहे. काही सामुदायिक कार्यक्रम असतात, प्रसंग किंवा फंक्शन्स असतात. त्या कार्यक्रमात एखादा काहीतरी बोलून जातो. तर ते बोललेलं कुणालातरी लागतं आणि कार्यक्रमात गोंधळ निर्माण होतो. आता ते जर बोलले नसते, तर खरं बरं झालं असतं. ते न बोलण्यानं त्यांनी हित साधलं असतं की नाही ? न बोललेल्या शब्दांनीसुद्धा जगाचं हित होत असतं. आणि हे जर लक्षात ठेवलं, तर मग मला बोललंच पाहिजे, असं होणार नाही. बोलून हित होतं, हे तर आपण पाहतोच. पण जर

हित होणार असेल तर मी न बोलूनसुद्धा होईल. आपण आपल्या मुलाला रागावतो. त्यात रागानं बोलून जे साध्य होतं, ते काहीकाही वेळेला न बोलूनसुद्धा साध्य होतं. प्रापंचिक माणसांना हा अनुभव असेल की, बोलण्यापेक्षा न बोललेलं जास्त परिणामकारक असतं. हे तर साध्या व्यवहारातलं झालं. पण सगळ्या जगाच्या हिताचा, व्यवहाराचा विचार केला तर, शब्दांच्या वापरानं जेवढं हित झालेलं आहे, त्यापेक्षा जाणीवपूर्वक न बोलण्यानं जास्त हित झालं आहे. यात मुद्दाम होऊन न बोलणं किंवा अबोला असं अभिप्रेत नाही. हितासाठी शब्द बोलले नाहीत, तर त्याचा आपल्याला उपयोग होतो. आपल्याला अशा अर्थानं मौनसाधना शक्य आहे. अजूनही आपण खऱ्या मौनाच्या स्थितीचा विचार केलेला नाही.

एखाद्या मनुष्यानं एखादा शब्द ढिलेपणानं, ढिसाळपणानं वापरला, तर तो शब्द बाकीच्यांकडून लावून धरला जातो. मग बोलणारा मनुष्य खुलासा करतो की, माझ्याकडून चुकीनं तसा शब्द वापरला गेला म्हणून तो मी आता मागं घेत आहे. त्यानं हे तोंडी सांगितलेलं लोकांना पटत नाही. ते रिटन ॲपोलॉजी - लिखित माफी मागतात. शब्द मागे घेतला ते लिहून द्या की, हा शब्द मी चुकीचा वापरला, तो मी मागं घेत आहे. ती रिटन ॲपोलॉजी मिळाल्याचं वर्तमानपत्रात वाचल्यावर मग सगळ्यांना बरं वाटतं. कोर्टात त्याबद्दल खटला दाखल झाला तर कोर्ट म्हणतं, ही हॅज सबमिटेड रिटन ॲपोलॉजी, सोडून द्या त्यांना. ही इज ॲक्विटेड. म्हणजे वापरलेला चुकीचा शब्दच, तोंडी खुलासा केला तोही शब्दच, आणि रिटन ॲपोलॉजी दिली तोही शब्दच. मोठमोठ्या राजकीय, सार्वजनिक लोकांचं असं होतं.

आपलंपण असं होतंच की नाही, मागं घ्या हा शब्द असं म्हटलं जातं-म्हणजे शब्दात काय ताकद आहे, ते कळेल. शब्दाच्या अशा करामती आहेत. एवढं आपल्याला सुरुवातीपासून परिचित झालं तर संतांना मौन

म्हणजे काय अभिप्रेत असेल इथंपर्यंत आपल्याला जायचं आहे, ते जाता येईल. आपल्याला प्रयत्न करता येतील. सगळे प्रयत्न जमतीलच असं नाही. पण तिथपर्यंत जाण्यासाठी आपल्याला काहीतरी धडपड करता येईल.

आपण वचनातल्या 'यथायोग्य' शब्दाचाही विचार करावा. शब्द योग्य असेल आणि तो वापरला गेला नाही, तरीसुद्धा घोटाळा आहे. योग्य शब्द सांगणं आवश्यक आहे. एखाद्या आजाऱ्याला त्याच्या आजाराच्या संबंधात धीर देणारा शब्द असतो. तसंच गुरूंचा हिताचा शब्द असतो. त्या शब्दांनी आपलं समाधान होतं. श्री स्वामीसमर्थांचं वचन आहे की, 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे', किती सुंदर वचन आहे. ते शब्द नुसते आठवले की, मरगळलेला मनुष्य जोरजोरात चालायला लागतो. आपल्याला ते शब्द वापरण्याचं मानसशास्त्र समजत नाही. या सहा शब्दांनी काय होणार, अशी अनेकांची समजूत असते. अहो पण त्याच सहा वजनदार शब्दांनी, तो मरगळलेला मनुष्य जोरात चालायला लागतो ना ! एवढं सामर्थ्य त्या शब्दांमध्ये आहे आणि त्याच्यामागे श्री स्वामी स्वतः उभे आहेत. या शब्दांच्या मागं सामर्थ्य कशानं आलं आहे ? कारण श्री स्वामी खऱ्या मौनात वावरले व मौनातून खाली आल्यावर जे काही म्हणाले त्याला अर्थ आला, सामर्थ्य आलं. खरं मौन शब्दांना सामर्थ्य देतं, हे आपल्या लक्षात येत नाही ! नुसतं जाता येता, मी तुझ्या पाठीशी आहे, असं म्हटल्यानं काही होणार नाही. त्याच्यामागं मौनाच्या सामर्थ्याची कल्पना, वाचेचं तप आणि अभ्यास लागतो. म्हणून ऋषींच्या शब्दांना आजपण अर्थ आहे. 'द्वितीयात् वै भयम्' हे ते हजारो वर्षांपूर्वी बोलले की, दोनपणामुळं भय निर्माण होतं. उपनिषदांमध्ये अशी असंख्य वचनं आहेत की, जी आपण आजपण वापरतो. उदा. सत्यमेव जयते ! सत्याच्याच शेवटी विजय होईल. ऋषी अखंड मौनात वावरणारे असल्यामुळं जेव्हा केव्हा त्यांनी वाचा वापरायची ठरवली,

त्यावेळेला ते म्हणाले, सत्यमेव जयते. ते आजही खरं आहे. इतकं शब्दाला सामर्थ्य येऊ शकतं आणि हे आपल्या लक्षात आलं, तर मौन पाळणाऱ्याच्या शब्दाला सामर्थ्य का येतं, हे कळेल.

या मौनाची साधी सुरुवात म्हणजे आठवड्यातून एका वारी व्यवहारानं एक किंवा दोन तास मौन पाळावं. वृत्यंतरप्रकाश या पुस्तकात मौनाच्या प्रयोगाचं विवरण केलं आहे. ते वाचूनही आपल्याला उलगडा होऊ शकतो. आपण मुलाला म्हणतो की, देवासारखा गप्प बैस हं. म्हणजे सगुणाचं, देवाचंसुद्धा मौन हा एक प्रकार आहे. आणि तो मुलगा देवासारखा गप्प बसला की, आपल्याला बरं वाटतं. देवाच्या गप्प बसण्यामध्ये सर्व अर्थ व्यक्त होतात. म्हणून त्या गप्प बसण्याला देवपणाचा अर्थ आहे. पांडुरंग नुसता उभा आहे. तर त्याच्यात सर्व अर्थ आहे. तो सर्व सामर्थ्यानिशी शांतपणे लक्ष ठेवून आवश्यक त्या कृतीच्या तयारीसह उभा आहे. त्या उभं राहण्यात आणि मौन पाळण्यात - तुमच्या कल्याणापर्यंत, हितापर्यंत, आशीर्वादापर्यंत लागणाऱ्या सर्व शक्तीपर्यंत - असा सर्व अर्थ आहे. कारण देवाकडं अकल्याण संभवतच नाही, कल्याणच संभवतं. त्यामुळं तुम्हाला लागणाऱ्या मदतीपासून, आशीर्वचनापासून सर्व, त्या मौनामध्ये गृहीत धरलं आहे. त्या अर्थानं खरं देवासारखं असायला पाहिजे. आपल्याला कटकट झाली, कामात अडचण आली म्हणजे जे आपण मुलाला गप्प बस म्हणतो, ते वेगळं आहे, व्यावहारिक सोय आहे. पण इथं देवाचं, सगुणाचं मौन अभिप्रेत आहे. खरं मौन आहे, ते मनामध्ये आहे. वाक्संयम हेतुः मनः संयमः हे करण्यानं माणसाला एकदा का मौन साधलं, तर मग बाकीची जी मौनं म्हटली जातात-शब्दांचं, कृतीचं, भावाचं, विचारांचं-अशी मौनं आपोआप साध्य होतात. आपल्याला त्याचीच गरज आहे.

श्री सहस्रबुद्धे महाराजांचं साधं वाक्य आहे. ते म्हणतात की, एकदा

अभ्यास कळल्यावर टिवटिव सोडून द्यावी, त्याचं नाव विश्वास-श्रद्धा होय. आता फक्त कृती आहे. आता एखाद्याची गुरूवर श्रद्धा आहे, तर गुरूनं काय 'सांगितलं' ते समजणं आणि श्रद्धेनं करणं, एवढं पुरेसं आहे. आता यातसुद्धा बोलण्याला योग्य ते महत्त्व दिलं आहे. कळेपर्यंत बोलावं लागेल की नाही ? तर बोलावं लागेल ! विचारावं लागेल की नाही, तर विचारावं लागेल. पण आता ते कळल्यानंतर मग जे काही आपण बोलणार आहोत ते सोडून द्यावं, म्हणजे ती खरी श्रद्धा म्हणायची. श्रद्धेची व्याख्या करतानासुद्धा शब्दांचं स्थान श्री बाबा महाराजांनी बरोबर दाखवून दिलं आहे. कळून घेण्यासाठी शब्द आहेत, हे त्यांनाही मान्य आहे. म्हणून ते म्हणाले, एकदा अभ्यास कळला की झालं. कळून झालं की, कृती असं अभिप्रेत आहे. ते ज्यांना जमलं त्यांना शब्दशक्तीचा बरोबर उलगडा झालेला आहे. मग ही टिवटिव काय आहे, तर अनेक लोक हा अभ्यास कळला तरी कृतीऐवजी त्यावर बोलत बसलेले असतात, मग परिणाम होत नाही आणि त्याचा दोष ते गुरूलाच देतात. म्हणून टिवटिव सोडून द्यावी आणि कामाला लागावं, असं ते पुढं म्हणाले.

श्री ज्ञानेश्वरीच्या सतराव्या अध्यायात तपं सांगितलेली आहेत. त्यामध्ये वाचेचं तप सांगितलं आहे. 'अनुद्वेगकरं वाक्यं, सत्यं,प्रिय,हितं् च यत्' असं वाचेचं तप सांगितलं आहे. अनुद्वेगकरम् वाक्यम् म्हणजे कोणाच्या मनाला उद्वेग होणार नाही, असं बोलावं. आता हे असं कोणाला उद्वेग न होणारं बोलणं किती कठीण आहे आणि श्रीमहाराजांनी साध्या भाषेत सांगितलं की, कोणाचं मन दुखवू नये. दोन्ही एकच आहे. मनाला उद्वेग होऊ नये. पण म्हणून त्याच्या मनाला बरं वाटावं, म्हणून खोटं बोलायची परवानगी नाही. सत्य आहे तेही सांभाळायचं आणि मनाला त्रासही होता कामा नये. असं बोलायचं म्हणजे बोलण्याची - शब्दांची तपश्चर्याच करावी लागेल, होय की

नाही ? कारण घरामध्ये एकतर सत्य तरी बोलावं लागतं नाहीतर प्रिय तरी बोलावं लागतं !

भाजी चांगली झाली नाही, भात चांगला झाला नाही, स्वयंपाक चांगला झाला नाही, असं कसं म्हणता येईल ? कारण त्याचा पुढं आपल्याला त्रास होईल, होय की नाही ? स्वयंपाक खूप छान झाला असंच म्हणावं लागतं ना, की दुसरं काही म्हणता येतं ? तर ते तसं म्हणता येत नाही. म्हणजेच सत्य किंवा प्रिय असं यातलं काहीतरी एक म्हणता येतं, ही अडचण आहे. म्हणूनच ते जमण्यासाठी करायच्या प्रयत्नांना वाचेची तपश्चर्या म्हटलं आहे. तपश्चर्या एवढ्यासाठीच म्हटलं की, तपश्चर्या करणाऱ्याच्या बाजूनं काहीतरी तापणं, काहीतरी सोसणं त्यात अभिप्रेत आहे. तप या शब्दातच मुळात तापणं आहे, सोसणं आहे. तो मनुष्य ते सोसतो आहे. म्हणजे सत्यही सांभाळू शकतो आणि प्रियपण सांभाळू शकतो आहे. आता आपआपल्या प्रपंचात किंवा आपल्या अनुभवांवरून ही कसरत कशी सांभाळायची ते आपणच ठरवायचं आहे.

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी याचं व्याख्यान फार सुंदर केलं आहे. ते करताना श्री ज्ञानेश्वर महाराज काय म्हणत आहेत की, व्यवहारात बोलावं तर लागेलच. व्यवहार सगळा बोलण्यावर चालला आहे. सुरुवातीलाच आपण बघितलं की, शब्दजनित विश्वरहाटी आहे. पण त्याच बोलण्याची गुणवत्ता बदलता येते, ही तपश्चर्या आहे. तपश्चर्या म्हणजे बोलणं थांबवणंही नाही. बोलणं थांबवणं, ही त्यासाठी सुरुवात आहे. मी आधी शब्द आवरले, मग त्यात योग्य होते तेच बाहेर सोडले, त्यासाठी मनाला आवर घालावा लागला, म्हणजे थोडक्यात तपश्चर्याच झाली. मी सुरुवातीला बोलणं आवरलं हे बरोबर आहे. पण नंतर त्याची गुणवत्ता बदलली. म्हणजे शब्दांची गुणवत्ता कशी बदलते, तर आकार आणि वजन हे दोन्ही न बदलता लोखंडाला

परिसाचा स्पर्श झाला की, त्याचं सोनं होतं की नाही ? श्री ज्ञानेश्वर महाराजांचं सांगणं असं एकदम परफेक्ट असतं. काहीही बदल न करता लोखंडाच्या तुकड्याचं सोन्याच्या तुकड्यात रूपांतर करता येतं. तर माणसाला वाचेचं तप करून त्याची वाणी अशी सोन्याची वाणी नाही का बनवता येणार ? आपल्याला सोन्याची वाणी आणि लोखंडाची वाणी यांमधला फरक बरोबर कळतो. तपाचा परिसस्पर्श आपल्या बोलण्याला झाला, तर वाणी सोन्यासारखी होऊ शकते.

दुसऱ्या उदाहरणात श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, आपण झाडाच्या मुळाला पाणी घालतो आणि ते घालता घालता बाजूला जे गवत उगवतं त्यालापण पाणी मिळतं. तसं आपलं बोलणं असं असावं की, एकाचं हित करता करता, चार लोकांचं हित व्हावं. हे किती सोपं आहे. आपण गवताला काही पाणी घातलं नाही, पण ते गवत कोणा प्राण्याला चारा म्हणून उपयोगी पडतंच की नाही? 'अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रिय हितम् च यत्' यावरून श्री ज्ञानेश्वर महाराजांना काय म्हणायचं आहे, ते आपण आपल्या पद्धतीनं तिथून हुडकून घ्यायला काही हरकत नाही. तिसरं एक उदाहरण त्यांनी गंगेच्या पाण्याचं दिलं आहे. त्यासाठी त्यांनी अमृतगंगा हा शब्द वापरला आहे. एकाच गंगेचं पाणी, ते एकाच वेळेला एखाद्या माणसाची तहान भागवतं, तेच पाणी दुसऱ्याला अमर व्हायला उपयोगी पडतं. तर तिसऱ्याला तेच पाणी पापमुक्त करतं. आपली वाणी ही गंगेच्या पाण्यासारखी आहे, तिच्यामुळं इतक्या प्रकारची हितं माणसाला आपल्या वाणीनं साधता येणं शक्य आहे, हे त्यांनी दाखवून दिलं आहे.

'अमंत्रम् अक्षरम् नास्ति योजकस्त्र दुर्लभः' असं म्हटलं आहे ना ? प्रत्येक शब्दाला मंत्राचं सामर्थ्य येऊ शकतं. पण त्यासाठी आपणच चांगले योजक असलं पाहिजे. शब्दाचं एक सामर्थ्य म्हणून शब्दांची उपासना

करावी. तसं शब्दशक्तीकडं बघावं. ते कळलं तर आपल्या लक्षात येईल की, शब्द बोलताना कितीतरी शक्तींचा व्यय होत असतो. ज्यांना व्याख्यान किंवा प्रवचन करण्याची सवय आहे, त्यांना माहीत असेल की, व्याख्यानानंतर - म्हणजे शब्दांच्या सलग वापरानंतर मनुष्याच्या अंगातली उष्णता वाढते, मनुष्य बोलतो त्यावेळेला कितीतरी शक्तींचा ऱ्हास होत असतो. बोलणारा दमतो, पण ऐकणारा दमत नाही. उलटा तो ऐकल्यावर फ्रेश होतो. एखादा आपल्याला ऐकवत सुटला, तर शेवटी तो दमतो. आपण नाही दमत. म्हणजे त्याच्या शक्तीचा व्यय होतो.

आपल्याला हे कळलं आणि त्या शक्तीची आपल्याला गरज आहे, हे समजलं, तर योग्य तेवढेच शब्द वापरले जातील आणि त्याच्या शक्तीचा संचय होईल. जे बोललं जातं आहे, त्याची किंमतही वाढेल. माणसाचं बोलणं असं असावं की, त्यानं बोलावं म्हणून इतर लोक त्याची वाट बघत आहेत. सोन्यासारखं बोलणं म्हणजे आणखी वेगळं काय असायचं !

अशी ही शब्दांची उत्तम शक्ती मानवाला जबरदस्त सामर्थ्य म्हणून लाभली आहे. बाकीच्यांना फार कमी प्रमाणात हे सामर्थ्य मिळालं आहे. म्हणून तरी आपण त्याचा अभ्यास करावा, त्यामुळं शब्दांची आणि मौनाची साधना होईल. त्यामुळं यशही मिळेल आणि शेवटी हे लक्षात ठेवावं की, भगवंत मौनरूपी आहे, आपल्या मौनाच्या अभ्यासामुळं भगवंताशीसुद्धा तादात्म्य होता येईल, तोसुद्धा मिळेल ! आणखीन् काय हवं !

।। श्रीराम ।।

(संतछायेतील शनिवार साप्ताहिक उपासना : दि. २२/११/२००८ च्या निरूपणावर आधारित)

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

चिंतनक्षण : वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

संतछाया